CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित


आजचा सामना
चेन्नई वि. कोलकाता
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : चेन्नई


लातूर | मंगळवार, १४ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ३७ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


विनम्र अभिवादन



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती.

विचारपुष्प



आपल्या इतिहासातून आपण एक महत्त्वाचा धडा शिकला पाहिजे. आपल्याकडे बुद्धी, शौर्य, ताकद, साधनसामग्री, नीतिमत्ता यांची कमतरता नव्हती. तरी आपण मोगल व नंतर इंग्रजांच्या आक्रमणास बळी पडलो. पराजित झालो. याचे कारण आपण आपल्या युद्धनीतीत कालानुरूप योग्य व आवश्यक ते बदल केले नाहीत.

**- श्रीकांत जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचार प्रमुख

# यंदा चातकाला प्रतीक्षाच

● सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमानाची शक्यता ● भारतीय हवामान विभागाचा पहिला अंदाज

### अल-निनोचा परिणाम

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

भारतीय हवामान विभागाने सोमवारी जाहीर केलेला पर्जन्यमानाचा पहिला अंदाज काळजी वाढवणारा आहे. अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे.

साधारणपणे १ जूनच्या सुमारास केरळ या दक्षिण राज्यात दाखल होणारा आणि सप्टेंबरच्या मध्यापर्यंत परत जाणारा मान्सून यावर्षी दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, असे हवामान विभागाने म्हटले आहे. सध्या कमकुवत ला-नीनासारखी परिस्थिती सामान्य स्थितीत बदलत आहे. पण, जूननंतर अल-निनो विकसित होण्याची दाट शक्यता आहे, असे भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा म्हणाले.

अल-निनो ही एक हवामानविषयक घटना आहे, मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील समुद्राचे तापमान सामान्यपणे जास्त वाढते, तेव्हा अल-निनोचा प्रभाव वाढतो. समुद्राचे तापमान सामान्यपेक्षा जास्त वाढल्यामुळे सामान्यतः आग्नेय आशिया आणि जगाच्या इतर भागांमध्ये उष्ण आणि कोरडे हवामान असते.

पूर्वी बहुतेक अल-निनो वर्षांमध्ये भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडायचा. यामुळे अनेकदा दुष्काळ पडून पिकांचे नुकसान व्हायचे आणि प्रशासनाला काही धान्यांच्या निर्यातीवर मर्यादा घालण्यास भाग पडायचे. इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या महागाईशी झुंज देत असलेली आशियातील तिसऱ्या सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेतील कृषी उत्पादन आणि विकासाबाबत चिंता वाढली असताना हा अंदाज समोर आला आहे. मान्सून भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तो शेतीला पाणी देण्यासाठी आणि जलाशये भरण्यासाठी आवश्यक असलेल्या पावसापैकी ७० टक्के पाऊस देतो. (वृत्तसंस्था)



### तीन वर्षांत प्रथमच सरासरीपेक्षा कमी

**२०२६ मध्ये सरासरीपेक्षा कमी मान्सून हा मागील तीन वर्षांतील पहिलाच असेल आणि पीक उत्पादन, महागाई व एकूण आर्थिक वाढ यावरील त्याच्या परिणामांसाठी धोरणकर्ते आणि बाजारपेठांकडे लक्ष ठेवून असतील. भारतीय हवामान विभाग मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनचा सुधारित अंदाज जाहीर करण्याची शक्यता आहे.**

### काही भागांत जास्त पावसाची शक्यता

**देशाच्या बहुतांश भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल. ईशान्य, वायव्य आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतातील काही भागांमध्ये सामान्य ते सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाच्या व्याख्येनुसार, चार महिन्यांच्या हंगामासाठी ८७ सेमीच्या (३५ इंच) ५० वर्षांच्या सरासरीच्या १६ ते १०४ टक्के पर्जन्यमानाला सामान्य मानले जाते.**

# जागतिक बाजाराचे निघणार 'तेल'

## होर्मुझमध्ये अमेरिकेची नाकाबंदी सुरू

◆ **कैरो, १३ एप्रिल**

इराणची सर्वच बंदरे आणि तटवर्ती भागांत सोमवारपासून अमेरिकेने नाकाबंदी सुरू केली. इराणी वेळेनुसार सायंकाळी साडेसहा वाजतापासून इराणी बंदरांवरून आणि तटवर्ती भागांतून येणाऱ्या किंवा जाणाऱ्या सर्वच देशांच्या जहाजांसाठी नाकाबंदी लागू करण्यात आली, अशी घोषणा अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने केली. या नाकाबंदीमुळे जागतिक बाजाराचे तेल निघणार आहे.

अमेरिकी नाकाबंदीमुळे दररोज २० लाख बॅरल तेल बाजारात उतरणे शक्य होणार नाही. २० लाख बॅरल्स म्हणजे जवळपास ३१ कोटी लिटर कच्चे तेल. इराणमधून जाणारी जहाजे रोखल्याने जागतिक बाजारातून तेलाचा एक प्रमुख स्रोत कमी होईल. इराणने मार्चमध्ये दररोज जवळपास १८.४ लाख बॅरल कच्चे तेल निर्यात केले. एप्रिलमध्ये आतापर्यंत दररोज १७.१ लाख बॅरल्सची निर्यात केली. या तुलनेत २०२५ मध्ये वर्षाची सरासरी निर्यात १६.८ लाख बॅरल्स होती, अशी माहिती केप्लरच्या डेटातून समोर आली आहे.

केप्लर ही प्रमुख डेटा आणि ॲनालिटिक्स कंपनी आहे, जी जागतिक व्यापारात कच्चे तेल, शुद्धीकरण झालेली उत्पादने, एलएनजी, एलपीजी, नैसर्गिक वायूसारख्या वस्तूंचा रिअल डाईम डेटा, ॲनालिटिक्सची माहिती देते.

२८ फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू होण्यापूर्वी इराणचे तेल उत्पादन अचानक वाढले होते. या महिन्याच्या सुरुवातीपर्यंत १८ लाख बॅरलपेक्षा जास्त तेल जहाजांमध्ये भरले होते. (वृत्तसंस्था)

### ट्रम्प यांचा इशारा



**इराणी बंदरांची नाकाबंदी सुरू होताच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला आहे. नाकाबंदी तोडून पुढे जाणारे जहाज समुद्रात उडवले जाईल, असे ट्रम्प यांनी म्हटले. मादकपदार्थांप्रमाणेच नाकाबंदीचे उल्लंघन करणाऱ्या जहाजांवर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.**

### साथ देण्यास ब्रिटनचा नकार

**डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराणची बंदरे आणि तटवर्ती भागाची नाकाबंदी करण्याच्या योजनेस पाठिंबा देण्यास ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी नकार दिला. जलवाहतुकीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी भागीदारांच्या व्यापक आघाडीसोबत काम करणे आवश्यक आहे, या भूमिकेचा त्यांनी पुनरुच्चार केला. त्यांनी परिसरात सुरुंग शोधक जहाजे आणि ड्रोनविरोधी संरक्षण प्रणाली असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.**

### 'या' बंदरांवर परिणाम

**अमेरिकी नाकाबंदीचा परिणाम इराणच्या ११ पैकी दक्षिणेतील आठ बंदरांवर होणार आहे. यात खार्ग आयलंड, बंदर अब्बास, असलूयेह, चाबहार, बूशहर, बंदर महशहर, बंदर जास्कचा प्रामुख्याने समावेश आहे.**

## खरातच्या ११ मालमत्तांवर ईडीचे छापे

◆ **नाशिक, १३ एप्रिल**

भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटीनंतर आता ईडीही सक्रिय झाले आहे. सात अधिकाऱ्यांचा समावेश असलेले ईडीचे पथक खरातच्या नाशिकमधील तृप्तबाला निवासस्थासह ११ मालमत्तांची सोमवारी सकाळी ६ वाजेपासून झाडाझडती घेत आहे. या छापेमारीत ईडीच्या हाती महत्त्वाचे पुरावे लागल्याचे सांगण्यात येत आहे.

या कारवाईत ईडीचे अधिकारी ६० कोटींच्या व्यवहाराप्रकरणी सुमारे शंभरहून अधिक जंगम आणि स्थावर मालमत्तांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करत आहे. (वृत्तसंस्था)

# आमच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ करू नका : चीन

◆ **बीजिंग, १३ एप्रिल**

अमेरिका आणि चीनमधील तणाव पुन्हा वाढला आहे. पाकिस्तानातील शांतता चर्चा अपयशी ठरल्यानंतर दोन्ही देशांनी परस्परांवर टीका करणे सुरू केले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी करण्याची घोषणा केली. त्यावर इराणने अमेरिकेला तेलाबाबत इशारा दिला. आमच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ करू नका, असा इशारा चीनने अमेरिकेला दिला आहे.

इराणच्या मुद्यावर डोनाल्ड ट्रम्प मोठ्या प्रमाणावर निर्णय घेत आहेत. त्याचा फटका केवळ इराणलाच नव्हे, तर चीनलाही बसत आहे. चीन इराणला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करीत असल्याच्या गुप्तचर माहितीनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी ५० टक्के शुल्क लादण्याची धमकी चीनला दिली.

या धमकीनंतर चीन उघडपणे इराणच्या पाठीशी उभा राहिला. होर्मुझची नाकेबंदी करण्याबाबत अमेरिकेने घोषणा केल्यानंतर चीनने इराणचे समर्थन केले. चीनने अमेरिकेला या मुद्यावर इशाराही दिला. जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी चीन कटिबद्ध आहे आणि मध्यपूर्वेतील स्थितीकडे आमची नजर आहे, असे ट्रम्प यांनी उचललेल्या पावलावर प्रतिक्रिया देताना चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून यांनी सांगितले.

होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून आमची जहाजे सातत्याने प्रवास करीत आहेत. इराणसोबत आमचे व्यावसायिक आणि ऊर्जा करार आहेत. आम्ही त्यांचा सन्मान करू आणि आमच्या अंतर्गत बाबींमध्ये कुणी ढवळाढवळ करू नये, अशी आम्हाला अपेक्षा आहे, असे डोंग जून यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांना अखेरचा निरोप

**मुंबई, १३ एप्रिल**

भारतीय संगीतसृष्टीतील दिग्गज गायिका आशा भोसले यांच्यावर सोमवारी शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात आला. अखेरचा निरोप देताना एक हृदयस्पर्शी दृश्य पाहायला मिळाले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी उपस्थितांनी त्यांच्या अमर गाण्यांद्वारेच त्यांना श्रद्धांजली वाहिली.

पारंपरिक शांततेऐवजी, अनेक गायक आणि उपस्थितांनी आशा भोसले यांच्या गाजलेल्या गीतांचे गायन केले. त्यामुळे संपूर्ण परिसर त्यांच्या आवाजाने आणि आठवणींनी गहिवरून गेला. 'जिंदगी एक सफर है सुहाना' आणि 'उड जाएगा हंस अकेला' यांसारखी गाणी सादर करत



त्यांच्या संगीत प्रवासाला अनोखी मानवंदना देण्यात आली. या गाण्यांमुळे उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि प्रत्येकजण त्यांच्या आठवणीत हरवून गेला. आशा भोसले यांनी आपल्या कारकिर्दीत हजारो गाणी गात भारतीय संगीतविश्वावर अमिट ठसा उमटवला. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराला मान्यवर, कलाकार, चाहत्यांची उपस्थिती होती.

**मान्यवरांकडून श्रद्धांजली**

तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठविलेल्या पुष्पचक्राचे अर्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सोमवारी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत त्यांच्या राहत्या घरी पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सुशील कुमार शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, प्रफुल पटेल, अरविन्द सावंत, आमदार आदित्य ठाकरेसह अनेकांनी श्रद्धांजली अर्पण केली.



## १३५ वी जयंती

सोलापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पुतळा परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.
(छाया : केवल तिवारी)

# परतवाड्यात लव्ह जिहाद

## मुलींना जाळ्यात ओढून ३५० व्हिडीओ व्हायरल



खासदार बोंडे व शिवराय कुळकर्णी यांच्या नेतृत्वात भाजपाचे शिष्टमंडळ

### खासदार अनिल बोंडे यांची तक्रार

◆ **अमरावती, १३ एप्रिल**

परतवाडा शहरातील मोहम्मद अयान व मोहम्मद जोहान या युवकांनी अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, ब्लॅकमेल करून लैंगिक अत्याचार केल्याचे आणि ३५० पेक्षा जास्त अश्लील व्हिडीओ व्हायरल केल्याचे धक्कादायक प्रकरण खासदार डॉ. अनिल बोंडे व भाजपा प्रवक्ता शिवराय कुळकर्णी यांनी उघडकीस आणले. सोमवारी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांची भेट घेऊन सविस्तर लेखी तक्रार व पेन ड्राईव्हमध्ये फोटो व व्हिडीओ देण्यात आले आहे. हा लव्ह जिहादचा प्रकार आहे का, या दिशेने तपास केला जात आहे.

खा. बोंडे यांनी तक्रारीत नमुद केले की, अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उर्दू भाषेत व्हॉट्सॲप व स्नॅपचॅट ग्रुप तयार केले जात आहेत. या ग्रुपमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना शिक्षणाच्या नावाखाली समाविष्ट केले जाते. त्यानंतर त्यांचे नंबर काही मुस्लीम तरुणांना दिले जातात. हे तरुण संपर्क साधून मैत्री करतात. सुरुवातीला सामान्य गप्पा करतात आणि नंतर अश्लील लिंक, व्हिडीओ व मॅसेज पाठवून ब्लॅकमेलिंगचे जाळे विणतात. हे अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केले जात आहेत.

परतवाड्यातील मोहम्मद अयान याने ९० हून अधिक मुलींना जाळ्यात ओढले. त्याने त्यांच्यासोबत मुंबई, पुणे येथे जाऊन ३५० पेक्षा जास्त अश्लील व्हिडीओ तयार करून ते व्हायरल केले. वेश्याव्यवसायात ढकलण्यासाठी मुलींना धमकावले. व्हिडीओ व्हायरल करण्याची व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमुद आहे.

**पोलिसांवर संताप, आरोपी फरार**

खासदार बोंडे यांनी पोलिसांच्या निष्क्रियतेवर तीव्र संताप व्यक्त केला. तीन दिवसांपासून व्हिडीओ व्हायरल होत असताना पोलिसांनी कारवाई का केली नाही? असा सवाल त्यांनी एसपींना केला. आरोपी कुटुंबासह परतवाड्यातून फरार झाल्याचेही त्यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### ...अन्यथा बुधवारी आंदोलन

**खासदार बोंडे इशारा दिला की, गुन्हे दाखल होऊन आरोपींना अटक न झाल्यास बुधवारी एसपी कार्यालयासमोर आंदोलन छेडले जाईल. मुलींचे आयुष्य सुरक्षित करणे ही प्राथमिकता आहे.**

# शेअर बाजारात पुन्हा मोठी घसरण

◆ **मुंबई, १३ एप्रिल**

मागील सत्रात दिसून आलेल्या दमदार सुधारणेनंतर सोमवारी भारतीय शेअर बाजारावर दबावाचे सावट पाहायला मिळाले. अमेरिका आणि इराण यांच्यातील अलीकडील चर्चा कोणत्याही कराराविना फिस्कटल्याने बाजारात ही घसरण झाली. वाढत्या भूराजकीय चिंतेमुळे आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या मोठ्या वाढीमुळे बाजाराची सुरुवात मोठ्या घसरणीने झाली. सुरुवातीला निफ्टी २३,६०० च्या खाली गेला होता; मात्र सत्राच्या उत्तरार्धात त्यात काही प्रमाणात सुधारणा होऊन तो २३,८०० च्या वर स्थिरावला.



दिवसअखेर सेन्सेक्स ७०२.६८ अंकांनी, म्हणजेच ०.९१ टक्क्यांनी घसरून ७६,८४७.५७ वर बंद झाला. तसेच निफ्टी २०७.९५ अंकांनी, म्हणजेच ०.८६ टक्क्यांनी घसरून २३,८४२.६५ वर पोहोचला. क्षेत्रनिहाय कामगिरीचा विचार करता पॉवर, डिफेन्स आणि टेलिकॉम वगळता इतर सर्व क्षेत्रे तोट्यात राहिली. एफएमसीजी, ऑटो, आयटी, एनर्जी आणि ऑईल अँड गॅस क्षेत्रात प्रत्येकी सुमारे १ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली.

निफ्टीमध्ये एचडीएफसी लाईफ, अदानी एंटरप्रायजेस, आयसीआयसीआय बँक, एनटीपीसी आणि टाटा मोटर्स (पॅसेंजर व्हेइकल्स) हे सर्वाधिक नफा मिळवणारे शेअर्स ठरले. तर मारुती सुझुकी, आयशर मोटर्स, रिलायन्स इंडस्ट्रीज, बजाज फायनान्स आणि इंटरग्लोब एव्हिएशन यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकात प्रत्येकी सुमारे ०.५ टक्क्यांची घसरण झाली असली, तरी त्यांनी मुख्य निर्देशांकाच्या तुलनेत चांगली कामगिरी केली. सोमवारी जागतिक संकेतांमुळे निफ्टीमध्ये मोठी घसरण झाली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या बंदरांवर नाकेबंदी करण्याचे आदेश दिले. (तभा वृत्तसेवा)

## किडनी प्रकरणातील सूत्रधाराला अटक

◆ **कानपूर, १३ एप्रिल**

अवैध किडनी प्रत्यारोपण प्रकरणाच्या चौकशीत मोठे यश मिळवत पोलिसांनी सूत्रधाराला सोमवारी अटक केली. रोहित असे या सूत्रधाराचे नाव असून, तो दोन आठवड्यांपासून अटक टाळत होता.

रोहित इंटरमिजिएट उत्तीर्ण असून, तो स्वतःला डॉक्टर भासवायचा. त्याला लखनौ येथून अटक करण्यात आली. अटक टाळण्यासाठी तो गोवा,काठमांडू, मनाली आणि शिमला येथे फिरला, असे पोलिसांनी सांगितले.

# नारी शक्ती वंदन विधेयक ऐतिहासिक

## संसद इतिहास घडवण्याच्या तयारीत : पंतप्रधान मोदी

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

नारी शक्ती वंदन अधिनियम लागू करण्यासाठी संसदेत आणले जात असलेले घटनादुरुस्ती विधेयक २१ व्या शतकातील ऐतिहासिक असे विधेयक असून हे विधेयक पारित करीत संसद इतिहास घडवणार असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

विज्ञान भवनात आयोजित नारी शक्ती वंदन कार्यक्रमाला पंतप्रधान मोदी संबोधित करत होते. नारी शक्तीला समर्पित अशा या विधेयकामुळे भुतकाळातील परिकल्पना आणि भविष्यातील स्वप्नांची पूर्तता होणार आहे. गेल्या कित्येक दशकांपासून संसद तसेच राज्य विधानसभांना ज्याची प्रतिक्षा होती, ते आता प्रत्यक्षात येणार आहे, असे मोदी म्हणाले.



नवी दिल्ली येथे झालेल्या नारी शक्ती वंदन कार्यक्रमाला उपस्थित पंतप्रधान नरेंद्र मोदी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता

सामाजिक न्यायाच्या कल्पनेवर भर देतांना मोदी म्हणाले की, देश समतावादी भारताची कल्पना करतो, ज्याठिकाणी सामाजिक न्याय ही फक्त घोषणा नाही तर आपल्या कार्यसंस्कृतीचे अभिन्न अंग आहे.

२०२३ मध्ये नवीन संसदभवनात नारी शक्ती वंदन विधेयक पारित करण्यात आले, त्याचवेळी या विधेयकाची २०२९ पासून अंमलबजावणी करण्यावर सहमतीही दर्शवण्यात आली होती, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, महिलांची लोकशाहीतील भागिदारी अधिक मजबूत करण्यासाठी या विधेयकाची योग्यवेळी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे.

हे ऐतिहासिक स्वरुपाचे विधेयक संवाद, सहयोग आणि समन्वयातून पारित व्हावे, असा आमचा प्रयत्न आणि प्राधान्य आहे, असे स्पष्ट करत मोदी म्हणाले की, यामुळे संसदेचीही प्रतिष्ठा उंचावणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### महिलांजवळ व्यापक अनुभव

**स्थानिक स्वराज संस्थात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत लाखो महिलांजवळ व्यापक अनुभव आहे, त्यामुळे मोठ्या आणि व्यापक आव्हानाचा अनुभव घेण्यासाठी त्या उत्सुक आणि तयार आहे, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, नारी शक्ती वंदन विधेयक पारित झाल्यानंतर या महिलांना जीवनात मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या सर्वांची पंचायतपासून संसदेपर्यंतची यात्रा सुगम होणार आहे.**

## महत्वाचे...



### उत्कृष्ट आयटीआय पुरस्काराने प्राचार्य प्रदीप हरिदास यांचा सन्मान

**बार्शी, दि. १३ एप्रिल-**
येथील संत विसोबा खेचर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रदीप हरिदास यांना सन २०२३-२०२४ या वर्षासाठी उत्कृष्ट आयटीआय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा मुंबई येथील शासकीय तांत्रिक प्रशाला येथे पार पडला. यावेळी कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते प्रदीप हरिदास यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यास व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे सतीश सूर्यवंशी, विभागाच्या मुख्य सचिव मनीषा वर्मा तसेच रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सन्मानामुळे विविध स्तरांतून प्राचार्य प्रदीप हरिदास यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### सांगोला महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**सांगोला, दि. १३ एप्रिल-**
सांगोला महाविद्यालयात थोर भारतीय समाज सुधारक क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन आय.क्यु.ए.सी.को-ऑर्डीनेटर डॉ. राम पवार, कार्यालयीन प्र.अधीक्षक विलास माने यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.एम.डी.वेदपाठक, बाबासो इंगोले यांनी केले.




### एस.के. फाऊंडेशनच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देखावा

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
एस.के. फाऊंडेशनच्यावतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गुरुनानक चौकात देखावा करण्यात आला. देखाव्याचे उद्घाटन फाऊंडेशनचे संस्थापक रविकांत कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नितीन भिसे, विश्वास घोडकुंबे, जीवन शिंदे, सुहास म्हात्रे, सागर सोनवणे, गौतम गायकवाड, गणेश डोलारे, लुकांस जंगम, किरण माने, सलमान बागवान, चाँद शेख, नितीन कोळेकर, सचिन बनसोडे उपस्थित होते.

### श्री स्वामी समर्थांची रुद्राक्ष माळ, पादुकांचे दर्शन घेण्याची बुधवारी संधी

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**



श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्य तिथीनिमित्त श्री स्वामी समर्थांची रुद्राक्ष माळ आणि त्यांच्या चैतन्य पादुकांचे दर्शन घेण्याची संधी सोलापूरकरांना मिळणार आहे. बुधवारी सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत जुनी पोलीस लाईन, मुरारजी पेठ येथील लोकमंगल ऑक्सी पार्क जवळील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरात दर्शन सोहळा होणार आहे. श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ गुरु मंदिर (श्री बाळप्पा मठ) व विश्व फाउंडेशन शिवपुरी अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांनी धारण केलेली पवित्र रुद्राक्ष माळ व गुरु मंदिरातील चैतन्य पादुकांचे दर्शन सोहळ्यास भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे.

### विशेष कार्यकारी अधिकारीपदी विठ्ठल व्हनमाने

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**



जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सामाजिक कार्यकर्ता विठ्ठल व्हनमारे यांची निवड विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आली. उच्चशिक्षीत व सामाजिक कार्यकर्ता म्हणून होत असलेल्या विठ्ठल व्हनमाने यांची निवड विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आली आहे.

### मंथन परीक्षेत गॅलॅक्सी स्कूलचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**
बाणेगांव येथील गॅलॅक्सी पब्लिक स्कुलने फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय परीक्षेचा निकल १०० टक्के लागल असून हे एक अभिमानाची बाब आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक आणि संपूर्ण संस्थेचा गौरव वाढला आहे. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि शिस्तबद्ध अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले. शिक्षकांचे मार्गदर्शन, योग्य नियोजन आणि नियमित सराव यामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरी करता आली. या यशाबद्दल शाळेचे प्रोजेक्ट डायरेक्टर स्वप्नील राऊत यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भीमजयंतीनिमित्त अवघे सोलापूर सजले

- नभांगणाहून नटले भुवन, पुनवेचेही गेले मी पण !
- चंद्र लाजला लपु लागला, असा भीम जन्माचा सोहळा भुमीवरी आजला ! !
- मध्यरात्री प्रज्ञासूर्यास जनसागर झाला नतमस्तक;
- विद्युत रोषणाईने उजळला मंडळ परिसर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
नभांगणाहून नटले भुवन, पुनवेचेही गेले मी पण ! चंद्र लाजला लपु लागला, असा सोहळा भुमीवरी आजला ! दीप मंडपी झगझगणारे, या तेजाने दिपले सारे ! म्हणती खाली पाहू नका रे ! आड ढगाच्या लपले सारे

बिजली बाईला हेवा वाटला ! असा भीम जन्माचा सोहळा !! अगदी याच प्रमाणे सोलापूर शहरात भीम जयंती सप्ताहास उत्साही वातावरणात मध्यरात्रीपासून प्रारंभ झाला. मध्यरात्रीपासूनच प्रज्ञासूर्यास अभिवादनासाठी जनसागर लोटला होता.

विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरात विविध शेकडो मंडळांच्या वतीने मध्यरात्री १२ वाजता डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना सजवलेल्या आकर्षक अशा मंडपामध्ये करण्यात आली. त्रिशरण, पंचशील सामदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. शहरात विविध भागांमध्ये विद्युत रोषणाईचा लखलखाट दिसून आला. जय भीमच्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.

**मनोभावे जनसागर झाला नतमस्तक !**

महिलांसह अबाल वृद्ध अनुयायांचे जथेंच्या जथें विश्व भूषण डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी मध्यरात्रीपासूनच येत होते. बोलो रे बोलो, जय भीम बोलो, ताकत से बोलो, जय भीम बोलो, हिम्मत से बोलो, जय भीम बोलो, जोर से बोलो, जय भीम बोलो असा नारा देत हातात निळा झेंडा घेऊन भीम अनुयायी डॉक्टर आंबेडकर चौकाकडे येत होते. डॉक्टर आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास मनोभावे जनसागर नतमस्तक झाला. निळ व गुलालांची मुक्त उधळण करण्यात आली. उत्साही वातावरणात भीम जयंती सप्ताह प्रारंभ झाला. दरम्यान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती विश्वस्त व उत्सव समितीच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मध्यरात्री १२ वाजता अभिवादन करण्यात आले. मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्ते आणि अबालवृद्ध भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावर्षी दिनांक १४ ते १९ एप्रिल यादरम्यान भीम जयंती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. रविवार दि. १९ एप्रिल २०२६ रोजी भीम जयंती सप्ताहाची भव्य अशा विराट मिरवणुकीने सांगता होणार आहे. सुमारे ४५० मंडळांनी आकर्षक सजवलेल्या व विद्युत रोषणाईने नटलेल्या मंडपामध्ये डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना मध्यरात्री केली.

### मिलिंद नगरात आतिषबाजी कार्यक्रम

मिलिंद नगर येथील भीमशक्ती सेना तरुण मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यंदाही अतिशबाजीचा कार्यक्रम पार पडला. हे शोभेचे दारू काम पाहण्यासाठी महिलांसह आबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती.गेल्या ३५ वर्षापासून हा आतिषबाजीचा सोहळा आयोजित करण्यात येतो. आज मध्यरात्री मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर आतिषबाजीचा कार्यक्रम पार पडला. विविध प्रकारचे शोभेचे दारू काम पाहून भीम अनुयायी मंत्रमुग्ध झाले.. डोळे दीपवणारे मनोहारी आतिषबाजी पाहायला मिळाली. हलगीच्या कडकडाटाच जय भीम चा जयघोष करत हा सोहळा पार पडला. यावेळी मार्गदर्शक विशाल माने, आतिश बनसोडे, अध्यक्ष गौरव कांबळे उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने मध्यरात्री प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्रिशरण पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली.



## सलग १८ तास अध्ययनातून प्रज्ञासूर्यास अभिवादन

### डॉ. वै. स्मृ. शा. वैद्यकीय महाविद्यालयात स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
अभ्यास हीच खरी आदरांजली हा संदेश देत डॉ. वै. स्मृ. शा. वैद्यकीय महाविद्यालय येथे सलग १८ तास अध्ययन अभियान व स्पर्धेचे प्रभावी आयोजन करण्यात आले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय संशोधन संस्थेमार्फत सोमवार १३ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता स्पर्धेला प्रारंभ झाला. उपाधिष्ठाता डॉ. चंद्रकांत वाघमारे, बालरोग विभाग प्रमुख डॉ. सुधीर सरवदे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी आयोजक डॉ. औदुंबर मस्के, डॉ. गजानन जत्ती, डॉ. शुक्लधन रोडे, ॲड. रवी गजधाने, सुलभा दातार, अशोक मस्के, विशाल इरागंटी आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेअंतर्गत विद्यार्थ्यांना सकाळी ६ वाजता १७ तासांत पूर्ण होईल असा अभ्यासक्रम देण्यात आला. त्यानंतर रात्री १२ वाजता त्याच अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेतील गुणांबरोबरच विद्यार्थ्यांच्या शिस्तीचाही विचार करून अंतिम निकाल जाहीर केला जाणार आहे. स्पर्धेसाठी विशेष आचारसंहिता तयार करण्यात आली असून प्रत्येक विद्यार्थ्याला प्रारंभी १०० गुण देण्यात आले आहेत. अंतिम बक्षीसासाठी शिस्तीचे उर्वरित गुण आणि परीक्षेतील गुण यांची एकत्रित गणना करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या उपक्रमाचे पर्यवेक्षण मंदाकिनी तांबे, डॉ. हेमलता रोकडे, डॉ. जयश्री खिस्ते, डॉ. सचिन बंदीछोडे, डॉ. वृषाली वानखडे, डॉ. कृष्णप्रिया सामलेटी, डॉ. प्रशांत शिरुरे, डॉ. अंकुर गुणावत, डॉ. संचित खरे, डॉ. एम. एम. पिरजादे व विरेश महाजनी यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संपत्ती तोडकर, प्रशासकीय अधिकारी संजय देशमुख व तलवार, ग्रंथपाल श्रीमती अर्चना नाचरे व रमेश चाटे यांनी परिश्रम घेतले.

### अर्चिता यादव 'सर्वोत्तम उत्कृष्ट पदवीधर विद्यार्थी'

## 'डब्ल्यूआयटी'चा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता, परिश्रम आणि सर्वांगीण विकासाचा गौरव करणारा वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा ४०वा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात व दिमाखात पार पडला.

यावेळी कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग शाखेची अर्चिता यादव हिने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठीचा 'सर्वोत्तम उत्कृष्ट पदवीधर विद्यार्थी' हा बहुमान पटकावून आपल्या उल्लेखनीय यशाची नोंद केली.

याचबरोबर विविध अभियांत्रिकी शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगमधून कु. रिया फर्सुले, मेकॅनिकल ॲण्ड ऑटोमेशन इंजिनिअरिंगमधून स्वदेश लोहाडे, सिव्हिल इंजिनिअरिंगमधून कु. मोनिका दोंता, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमधून कुशल तापडिया तसेच इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमधून रितेश पाटील यांना 'उत्कृष्ट पदवीधर विद्यार्थी' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील हेक्सावेअर टेक्नॉलॉजीजचे असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट तसेच डब्ल्यू. आय. टी.चे माजी विद्यार्थी रणजित आडकर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान डॉ. सचिन गेंगजे यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आशा थळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पी. एस. जोशी, ईश्वरम आकुडे आणि कु. श्रावणी कदम यांच्या स्वागतपर निवेदनाने झाली. विद्यार्थिनी साक्षी सागर हिने प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर समारोप विद्यार्थिनी अनिका वल्लाकट्टी हिच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## बसवप्रेमींनी मध्यरात्री दीड वाजता केले महात्मा बसवेश्वर पुतळ्याचे पूजन

### पूजनास सर्वधर्मीय युवा वर्गाचा मोठा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारूढ पुतळा नूतनीकरणासाठी चबुतऱ्यावरून हलवण्यात आला होता. बसवजयंतीपूर्वी म्हणजेच रविवारी रात्री बारा वाजता बसवेश्वर सर्कल येथे पुतळ्याचे आगमन होताच बसवप्रेमींनी एकच जल्लोष केला. मध्यरात्री दीड वाजता पुतळा चबुतऱ्यावर स्थापित केल्यानंतर उपस्थित बसवप्रेमींनी सामूहिक पूजन केले.

पुतळा काढल्यानंतर चबुतऱ्याची परिस्थिती गंभीर बनली होती. ती देखील बसव ब्रिगेडने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर चबुतरा देखील पाडण्यात आला. या सर्व गोष्टीसाठी एक वर्षाचा कालावधी गेला. यंदाची बसव जयंती १९ एप्रिल रोजी आहे. त्यापूर्वी बसवेश्वर महाराजांचा पुतळा स्थापित करा असे प्रशासनाकडे मागणी केली असता प्रशासनाने त्याकडे डोळेझाक केली. वर्षभर कालावधीनंतरही पुतळा पुन्हा बसवेश्वर सर्कल येथे स्थापित न केल्यामुळे २२ बसवप्रेमी संघटनांनी एकत्र येऊन आंदोलनाचा पवित्रा घेतला. एक दिवसीय लाक्षणिक उपोषणानंतर प्रशासनास जाग आली. त्यांनी लागलीच कंत्राटदाराला चबुतरा उभारणीचे काम दिले.

दीड महिन्याच्या कालावधीत चबुतऱ्याची उभारणी करण्यात आली आणि नूतनीकरण झालेला पुतळा चबुतऱ्यावर स्थापित करण्यात आला. त्यावेळी बसवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव महामंडळ उत्सव समिती अध्यक्ष शरणराज केंगनाळकर व जगतज्योती महात्मा बसवेश्वर महामंडळाचे उत्सव समिती अध्यक्ष प्रसाद झुंजे यांच्या हस्ते व नगरसेवक प्रवीण दर्गोपाटील, सुदीप चाकोते, वीरेंद्र हिंगमिरे, बसव ब्रिगेडचे अध्यक्ष अमित रोडगे, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले व राहुल बुऱ्हाणपुरे यांच्या उपस्थितीत महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. पूजनानंतर फटाक्यांची आतिषबाजी, पेपर शॉट व कोल्ड फायर उडविण्यात आले. यावेळी गणेश साखरे, डॉ. प्रकाश घटोळे, केदार वनारोटे, सचिन कुलकर्णी, देविदास चेळेकर, किसन गर्जे, गोपाळ झंवर, प्रेम भोगडे, शिवराज झुंजे, विजयकुमार बिराजदार, सोमनाथ चौधरी, मन्मथ कपाळे, विजयकुमार हेले, बसवराज चाकाई, शिवशरण साखरे, सुनील धरणे, राहुल जत्ती, श्रीकांत कट्टीमनी, परमेश्वर माळगे, राजकुमार सारणे, दत्ता केरे, अविनाश बिराजदार, भरत कुरणे, मळसिद्ध रोकडे, विकास हिरेमठ, शिवराज विभुते, शुभम हंचनाळे, चेतन म्हमाणे, गणेश हक्के, गुरुराज कोनापुरे उपस्थित होते. यावेळी पुतळ्यावर पुष्पवृष्टी देखील करण्यात आली.



## आ. कोठे यांची जिल्हाधिकारी यांच्या समवेत विकासकामांवर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
शहर मध्य विधानसभेचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सोमवारी नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांची सदिच्छा भेट घेऊन शहर जिल्ह्यातील विविध विकासकामांवर चर्चा केली.

याप्रसंगी आमदार कोठे यांनी सोलापुरातील आयटी पार्क, शहरातील दोन उड्डाणपूल, मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्वर महाराजांचे स्मारक तसेच सोलापूर शहरातील कामगारांच्या व सोसायटीचा बी टू चा प्रश्न आदी विषयांवर सकारात्मक चर्चा केली. सोलापूरच्या विविध विकासकामांमध्ये लक्ष घालून कमी कालावधीमध्ये ही विकासकामे आणि सोलापूरकरांच्या मागण्या पूर्णत्वास नेण्याचा विश्वास जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी आमदार कोठे यांना यावेळी दिला.

आमदार कोठे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून शहर जिल्ह्याचा विकास झपाट्याने होत आहे. हा विकासाचा वेग नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या काळात अधिक मोठा होईल, याची खात्री आहे. याप्रसंगी गुरुशांत धुत्तरगावकर आदी उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यात नव्याने रुजू झाल्याबद्दल आमदार देवेंद्र कोठे यांनी नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची मूर्ती आणि सोलापुरी टॉवेल देऊन सन्मानित केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# ३४ लाख मतदार मतदानाला मुकणार

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय, ममता बॅनर्जींना धक्का



◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

पश्चिम बंगालमधील मतदार यादीतून नावे वगळलेल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत आणि ज्यांची अपीले अद्याप प्रलंबित आहेत, त्यांना सध्या मतदानाचा हक्क दिला जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे लाखो मतदारांच्या आशांवर पाणी फेरले आहे. हा निर्णय सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे.

विशेष सघन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान ज्या मतदारांची नावे वगळण्यात आली होती, त्यांना अंतरिम आधारावर मतदान करण्याची अंतरिम परवानगी देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. असे केल्यास संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो, असे न्यायालयाने म्हटले आहे. सुनावणीदरम्यान, तृणमूल काँग्रेसचे नेते कल्याण बॅनर्जी यांनी सांगितले की, अंदाजे १६ लाख अपीले दाखल झाली आहेत. या लोकांना निवडणुकीत मतदान करण्याची परवानगी दिली पाहिजे. यावर न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी सांगितले की, अशा अपीलांची संख्या ३४ लाखांवर पोहोचली आहे. न्यायमूर्ती बागची म्हणाले की, मतदान हा केवळ घटनात्मक हक्क नाही, तर लोकशाहीतील सहभाग दर्शवणारा एक भावनिक हक्क देखील आहे. तथापि, न्यायाधिकरणावर अतिरिक्त भार टाकता येणार नाही आणि योग्य प्रक्रियेचे पालन करावेच लागेल, असेही ते म्हणाले.

**न्यायालयाने फेटाळली मागणी**

याचिकाकर्त्यांची मागणी फेटाळताना मख्यन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले, हे पूर्णपणे अशक्य आहे. असे केल्यास मतदानाचा हक्क निलंबित करावा लागेल. निवडणूक आयोगाने बंगालची मतदार यादी आधीच गोठवली आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष आदेशाशिवाय त्यात नवीन नावे समाविष्ट केली जाऊ शकत नाहीत. राज्यातील २७ लाख प्रकरणे हाताळण्यासाठी एकोणीस अपीलीय न्यायाधिकरणे स्थापन करण्यात आली आहेत. (वृत्तसंस्था)

### ३०-३४ लाख अपील प्रलंबित

**»१३ जणांची याचिका अपरिपक्व ठरवत न्यायालयाने त्यांना प्रथम अपीलीय न्यायाधिकरणाकडे जाण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, त्यांनी प्रकरणाच्या गुणवत्तेवर भाष्य केलेले नाही. दरम्यान, याचिकाकर्त्यांनी आरोप केला आहे की, निवडणूक आयोग योग्य प्रक्रियेचे पालन न करता नावे वगळत आहे आणि अपीलांवर वेळेवर सुनावणी होत नाही. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या वकिलाने सांगितले की, सुमारे ३०-३४ लाख अपील प्रलंबित आहेत.**

## विश्वासच नाही; न्यायाधीशांना हटवा

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

दिल्ली दारू धोरण प्रकरणी सोमवारी उच्च न्यायालयात सुनावणी झाली. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी स्वतःच युक्तिवाद केला. यादरम्यान, त्यांनी न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांना या प्रकरणातून बाजूला करावे, अशी मागणी केली. ते म्हणाले की, ज्या प्रकारे ईडी आणि सीबीआयने आधी साक्षीदारांना अटक केली. त्यानंतर इतरांची नावे घेऊन जबाब नोंदवले. साक्षीदारांच्या जबाबांबाबत न्यायालयाच्या टिप्पणी अशा होत्या, जणू मला दोषी आणि भ्रष्ट मानले गेले आहे. केजरीवाल यांनी न्यायमूर्तींना हटवण्यामागील १० कारणेही सांगितली. तुम्ही खूप चांगला युक्तिवाद केल्याचे यावेळी न्यायाधीशांनी केजरीवालांना उद्देशून म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मीरमधील भदेरवाह येथील प्राचीन सुबार नाग पर्वतावरील नाग बैसाखी यात्रेला सुरुवात झाली आहे. वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल म्हणूनही या उत्सवाकडे पाहिले जाते

## भरधाव ट्रकच्या धडकेत सहा वऱ्हाडी ठार

◆ **हापुड, १३ एप्रिल**

उत्तर प्रदेशातील हापुड येथे रविवारी मध्यरात्री दीड वाजता वऱ्हाडींनी भरलेल्या बसला ट्रकने धडक दिली. या अपघातात पाच वऱ्हाडींसह सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. सात जण गंभीर जखमी आहेत. वऱ्हाड गाझियाबादमधील डासना येथून बुलंदशहरमधील गुलावठी येथे गेले होते.

बसमध्ये एकूण १३ वऱ्हाडी होते. इतर लोक दुसऱ्या गाड्यांमधून मागे येत होते. लग्नानंतर परत येत असताना बस रस्त्याच्या कडेला उभी होती. रस्ता खूप अरुंद होता. याचवेळी समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने बसला धडक दिली. धडकेनंतर रस्त्याच्या उतारावर आधी बस उलटली, यानंतर अनियंत्रित ट्रकही तिच्यावर उलटला. मोठा ट्रक उलटल्याने बस पूर्णपणे चेपली. बसचे छत उखडून वेगळे झाले. वऱ्हाडी आतमध्ये दबले. मागे येणाऱ्या वऱ्हाडींनी पोलिसांना अपघाताची माहिती दिली. बसच्या काचा फोडून काही लोकांना बाहेर काढण्यात आले.

जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा अपघात धौलाना-गुलावठी रस्त्यावर झाला. (वृत्तसंस्था)



# लालूंवरील आरोपपत्र रद्द करण्यास नकार

### सर्वोच्च न्यायालयाचा दणका

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संबंधित नोकरीच्या बदल्यात जमीन प्रकरणात सीबीआयने दाखल केलेला एफआयआर रद्द करण्यास नकार दिला. हे प्रकरण न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि एन. कोटेश्वर सिंग यांच्या न्यायासनासमोर आले. न्यायासनाने या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यास आपली अनिच्छा व्यक्त करत लालू यांना खटल्यादरम्यान पूर्व-मंजुरीचा मुद्दा उपस्थित करण्याचे स्वांतत्र्य दिले.

न्यायासनाने म्हटले की, त्यांच्यासमोर असलेले मुद्दे म्हणजे, पहिला, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७अ ची व्याप्ती आणि दुसरा आहे त्याच तरतुदीचा भविष्यातील वापर आणि कार्यप्रणाली. वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता याचिकाकर्त्याला



हजर राहण्यापासून सूट देण्यात येत आहे. याचिकाकर्त्याला खटल्याच्या सुनावणीच्या वेळी कायदेशीर मुद्दा उपस्थित करण्याची मुभाही देण्यात येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा प्रकारचे प्रलंबित कायदेशीर प्रश्न खटल्याच्या सुनावणीत अडथळा आणू शकत नाहीत. यादव यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी खंडपीठासमोर युक्तिवाद केला की, पूर्वपरवानगीच्या अभावामुळे तपासाला धोका निर्माण झाला आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये अंतिम आरोपपत्र दाखल करण्यात आले आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १९ अंतर्गत दखल घेण्यात आली. त्यानंतर लगेचच कलम १७अ चा मुद्दा उपस्थित करण्यात आला. (वृत्तसंस्था)

### कलम १७अ अंतर्गत मिळते संरक्षण

**»रेल्वेतील नियुक्त्यांवर प्रभाव टाकण्याचे आरोप हे प्रामुख्याने यादव यांच्या रेल्वेमंत्री म्हणून असलेल्या अधिकृत कर्तव्यांशी संबंधित होते. त्यामुळे त्यांना कलम १७अ अंतर्गत संरक्षण मिळते. अंतिम आरोपपत्र दाखल होण्यापूर्वी आक्षेप कसे घेतले जाऊ शकतात, असा प्रश्न सिब्बल यांनी उपस्थित केला. तर याचिकेला विरोध करताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी युक्तिवाद केला की, याचिका उशिरा दाखल करण्यात आली असून तपास आधीच पूर्ण झाला आहे, यावर जोर देत, ही याचिका या टप्प्यावर फेटाळली जाऊ शकत नाही.**

# निवडणुकीतील गैरप्रकार रोखणार का?

### न्यायालयाची केंद्रासह सर्व राज्यांना नोटीस

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्याची मागणी करणाऱ्या एका महत्त्वाच्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, भारतीय निवडणूक आयोग आणि सर्व राज्यांना नोटीस बजावली आहे. निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी मतदान केंद्रांवर मतदारांच्या बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बाहुलीवर आधारित बायोमेट्रिक ओळख लागू करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

प्राथमिक सुनावणीदरम्यान, न्यायालयाने या मुद्द्याची संवेदनशीलता आणि दूरगामी परिणाम अधोरेखित करत सर्व पक्षांकडून प्रतिसाद मागवला. तसेच अशी प्रणाली लागू करण्यासाठी व्यापक कायदेशीर आणि प्रशासकीय बदलांची आवश्यकता असेल तर आगामी निवडणुकांमध्ये ती लागू करणे व्यवहार्य ठरणार नाही, असेही न्यायासनाने स्पष्ट केले. यावर वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा युक्तिवाद केला की, मतदान केंद्रांवर बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बाहुलीचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण केल्यास लाचखोरी, अवाजवी प्रभाव, बनावट ओळख (दुसऱ्याच्या नावावर मतदान), दुहेरी मतदान, फसवणूक आणि इतर निवडणूक गैरप्रकार रोखण्यास मदत होईल.

**प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास होतोय कमी**

या याचिकेत म्हटले आहे की, आयोगाने विविध उपाययोजना करूनही निवडणूक फसवणुकीच्या घटना अजूनही घडतच आहेत. त्यामुळे या प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कमी होत आहे. लाचखोरी, अवाजवी प्रभाव, बनावट ओळख, दुहेरी मतदान आणि फसवणुकीचे प्रकार निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्यावर आणि अखंडतेवर परिणाम करत आहेत, असेही याचिकेत म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### 'एक नागरिक, एक मत'वर भर

**»याचिकाकर्त्यांच्या मते, मतदान केंद्रांवर बायोमेट्रिक पडताळणीचा अवलंब केल्यास केवळ खरे आणि रीतसर नोंदणीकृत मतदारच मतदान करू शकतील, हे सुनिश्चित होईल आणि एक नागरिक, एक मत या तत्त्वाला बळकटी मिळेल. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी अशा बायोमेट्रिक प्रमाणीकरण उपाययोजना लागू करण्याकरिता आयोग संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत आपल्या संपूर्ण अधिकारांचा वापर करू शकतो, असा दावाही याचिकेत करण्यात आला आहे.**

## मुंबईत पुन्हा मनसे स्टाईल

**मुंबई :** ओशिवारा परिसरातील सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची महत्त्वाची शैक्षणिक कागदपत्रे न देण्याच्या प्रकारावरून निर्माण झालेला वाद अखेर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक हस्तक्षेपानंतर निवळला.

## ट्रकने भाविकांना चिरडले; सात जणांचा मृत्यू

◆ **सुरेंद्रनगर, १३ एप्रिल**

गुजरातच्या सुरेंद्रनगर जिल्ह्यात सोमवारी पहाटे भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकखाली चिरडून सात जणांचा मृत्यू झाला आणि चार जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

ही घटना लखतर-विरामगाम महामार्गावर रात्री सुमारे १:३० वाजता घडली. भाविकांचा एक गट पायी राजकोटहून बहुचराजी माता मंदिराकडे जात होता. तेव्हा मागून येणाऱ्या एका ट्रकने सर्वांना चिरडले. या अपघातात सहा भाविक आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका डंपरच्या चालकाचा मृत्यू झाला, असे लखतर पोलीस निरीक्षक योगेश पटेल यांनी सांगितले. मृतांमध्ये चार महिलांचा समावेश असल्याचेही त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

## किमान हमीभावावर उत्तर द्या : सुप्रीम कोर्ट

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

किमान हमीभाव (एमएसपी) निश्चित करताना लागवडीच्या नेमक्या खर्चाबाबत राज्यांच्या प्रस्तावाला महत्त्व देण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकार व इतरांकडून उत्तर मागितले आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख आणि न्या. जॉयमाल्या बागची यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने या याचिकेवर सुनावणी करण्यास सहमती दर्शवली. न्यायासनाने याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्र सरकार, विदेशी व्यापार महासंचालनालय आणि कृषी खर्च व किंमत आयोगाला नोटीस बजावली. देशातील शेतकऱ्यांशी संबंधित हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे, असे विधिज्ञ प्रशांत भूषण यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना सांगितले. (वृत्तसंस्था)

# मोनालिसा फरार...

### कुटुंबीयांचे गंभीर आरोप

◆ **अजमेर/महेश्वर**


प्रयागराज महाकुंभ २०२५ दरम्यान चर्चेत आलेल्या मोनालिसा प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे. तिचा पती असल्याचा दावा करणाऱ्या फरमानचा एक व्हिडीओ समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

या व्हिडीओमध्ये फरमानने लग्नानंतर मोनालिसा अचानक त्याला सोडून पळून गेली असून तो तिचा शोध घेत अजमेरपर्यंत गेला, मात्र ती तेथे सापडली नसल्याचा दावा केला आहे. आता तो जोधपूरकडे रवाना झाल्याचे त्याने सांगितले आहे. कोणाकडेही मोनालिसाबाबत माहिती असल्यास ती कळवावी, असे आवाहनही त्याने केले आहे. या प्रकरणात मोनालिसाच्या कुटुंबीयांनी मात्र फरमानचे सर्व दावे फेटाळून लावत गंभीर आरोप केले आहेत.



मोनालिसाच्या आईच्या म्हणण्यानुसार, तिची मुलगी स्वतःहून पळून गेलेली नसून तिला फरमाननेच गायब केले आहे. हे संपूर्ण प्रकरण पूर्वनियोजित षड्यंत्राचा भाग असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मागील काही महिन्यांपासून त्यांना मुलीशी संपर्क साधता आलेला नाही. सुमारे १५ ते २० दिवसांपूर्वी फरमानने अल्प वेळासाठी फोनवर बोलणे करून दिले होते, मात्र त्यानंतर तिचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. मुलीला बंधक बनवल्याचा आरोप पालकांनी केला. (वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# उरली 'वार्ता विघ्नाची'

इस्लामाबाद येथे पार पडलेल्या अमेरिका-इराण चर्चेचा शेवट निराशाजनक ठरल्याने जागतिक राजकारणातील अस्थिरतेची धोकादायक छाया अधिक गडद झाली आहे. सलग २१ तास चाललेल्या या उच्चस्तरीय बैठकांनंतर कोणताही ठोस करार न होता चर्चा कोलमडल्या. २१ तासांच्या धावपळीनंतर थकलेले आणि निराश झालेले अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनी फारशी माहिती दिली नाही. केवळ तीन प्रश्नांची उत्तरे देऊन ते निघून गेले. इराणबरोबरचा दोन आठवड्यांचा युद्धविराम टिकेल का, होर्मुझ सामुद्रधुनीचे भवितव्य काय किंवा अध्यक्ष ट्रम्प इराणविरुद्धच्या कठोर धमक्यांवर पुढे जातील का, या महत्त्वाच्या मुद्यांवर त्यांनी काहीच भाष्य केले नाही. १६ तासांहून अधिक काळ बंद दरवाज्यांआड चाललेल्या बैठका रविवारी पहाटेपर्यंत लांबल्या. त्यानंतर जेडी व्हान्स इस्लामाबादमधील एका भव्य सभागृहात आले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर थकवा आणि निराशा स्पष्ट दिसत होती. पत्रकार परिषदेसाठी व्यासपीठावर पोहोचल्यावर त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला, तेव्हा चेहऱ्यावरची नाराजीदेखील ते लपवू शकले नाहीत. जागतिक माध्यमांनी त्यांच्या या देहबोलीची नेमकी दखल घेतली आहे. इकडे व्हान्स यांच्याकडून चर्चा निष्फळ ठरल्याची भावना व्यक्त केली जात असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हे मात्र, तेथून हजारो मैल दूर मियामीमध्ये एका क्रीडा कार्यक्रमात उपस्थित राहून त्याचा आनंद घेत होते.

वस्तुतः अमेरिका आणि इराणमधील ही उच्चस्तरीय राजनैतिक भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. संपूर्ण जगाचे लक्ष या चर्चेकडे लागले होते. अमेरिका-इराण संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्था हादरली आहे, आघाड्या कमकुवत झाल्या आहेत आणि संघर्षाचा व्याप वाढला आहे. अशा परिस्थितीत तोडगा काढण्याची जबाबदारी व्हान्स यांच्यावर होती. मात्र, या चर्चेतून काहीच निष्पन्न तर झाले नाहीच, उलट युद्धाचे ढग अधिक गडद झाले आहेत. व्हान्स यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकी शिष्टमंडळ चर्चेतून कोणताच तोडगा न काढता परतले, पण जाताना त्यांनी या अपयशासाठीदेखील इराणलाच जबाबदार धरले. अण्वस्त्रे न बनवण्याची स्पष्ट हमी इराणने द्यावी अशी अमेरिकेची मागणी होती, पण इराणने त्यास तितक्याच स्पष्टपणे नकार दिला. अमेरिका-इराण यांच्यातील चर्चा फोल ठरली ही केवळ राजनैतिक अपयशाची बाब नाही; तर ती येणाऱ्या व्यापक संघर्षाची चाहूल मानावी लागेल. कारण उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी मंडळाकडून या चर्चेकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात होते. युद्धाला विरोध करणारा आणि तुलनेने संयमित भूमिका मांडणारा नेता म्हणून व्हान्स यांची प्रतिमा असल्याने, ते तणाव कमी करण्याचा मार्ग शोधतील अशी आशा होती. प्रत्यक्षात ते कोणतीही प्रगती साधू शकले नाहीत. त्यांच्या वक्तव्यातील निराशा आणि मर्यादित माहिती देण्याची भूमिका, हेच या चर्चेतील अपयशाचे द्योतक ठरते. मुळातच, व्हान्स यांच्यासारख्या व्यक्तींवर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी ही जबाबदारी सोपविली हेच आश्चर्यकारक होते. ट्रम्प यांच्या निकटवर्तीयांमध्ये युद्धाला विरोध करणारे ते प्रमुख व्यक्ती मानले जातात. तरीही अमेरिका-इराण यांच्यातील जवळपास ५० वर्षांतील सर्वात महत्त्वाच्या चर्चेचे नेतृत्व त्यांच्याकडे देण्यात आले आणि चर्चा निष्फळ ठरल्याची विघ्नवार्ता देण्याची जबाबदारीही व्हान्स यांच्या माथी पडली.

तब्बल २१ तासांनंतरही अमेरिका व इराण यांच्यातील ही चर्चा अपयशी ठरण्यामागे केवळ मतभेद कारणीभूत नाहीत, तर परस्पर अविश्वास आणि धोरणात्मक विसंगतीही तितक्याच जबाबदार आहेत. परदेशातील मालमत्ता मुक्त करणे किंवा युद्धविरामाचा विस्तार या इराणने चर्चेदरम्यान समोर ठेवलेल्या अटी अमेरिकेला मान्य नव्हत्या. दुसरीकडे, अमेरिकेची अण्वस्त्रविषयक हमीची मागणी इराणने फेटाळली. या परस्परविरोधी भूमिकांमुळे संवादाचा पूल उभाच राहिला नाही. अमेरिकेच्या नेतृत्वाच्या दृष्टिकोनातील द्वंद्व या दरम्यान उघड झाले आहे, ही एक चिंताजनक बाब म्हणावी लागेल. एका बाजूला चर्चा सुरू ठेवण्याचे संकेत दिले जात असताना, दुसऱ्या बाजूला होर्मुझ सामुद्रधुनीवर नौदल नाकेबंदी जाहीर करण्यात आली. ही कृती आंतरराष्ट्रीय संकेतांनुसार युद्धजन्य मानली जाते. त्यामुळे 'राजनैतिक तोडगा' आणि 'लष्करी दबाव' या दोन टोकांच्या धोरणांचा एकत्रित वापर परिस्थिती अधिक चिघळवू शकतो. या संपूर्ण घडामोडीत अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणाचाही प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. अध्यक्ष ट्रम्प यांची आक्रमक भूमिका आणि 'परिणाम काहीही असो, अमेरिका जिंकणारच आहे', असा त्यांच्याकडून सातत्याने केला जाणारा दावा यातून वास्तवापेक्षा राजकीय संदेश देण्यावर आणि दबावाच्या राजकारणावरच अधिक भर दिसतो. त्याउलट, व्हान्स यांच्यासारखे नेते या युद्धाच्या परिणामांविषयी साशंक आहेत. त्यामुळे अमेरिकन धोरणातील दुभंग भूमिका दिसून येते. ही परिस्थिती जागतिक स्थैर्यावरही परिणाम घडविणारी ठरली, तर त्याची फळे भविष्यात प्रदीर्घ काळ जगाला भोगावीच लागतील, याचीदेखील भीती आहेच!

या संघर्षामुळे ऊर्जा बाजारातील अस्थिरता, आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे आणि विविध देशांतील राजकीय समीकरणांवर होणारा परिणाम, हे सर्व घटक एकत्र येऊन जागतिक अस्थैर्य वाढवू शकतात. विशेषतः विकसनशील देशांसाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक ठरणार आहे. अशा वेळी, इस्लामाबादमधील निष्फळ चर्चांमधून एक बाब स्पष्टपणे अधोरेखित झाली आहे. दोन्ही देशांतील संवादाचा मार्ग अजूनही उघडा असला, तरी तो अधिक कठीण आणि गुंतागुंतीचा झाला आहे. म्हणूनच, युद्धाची छाया गडद होत असताना, संयम, मुत्सद्देगिरी आणि दीर्घकालीन दृष्टिकोन यांची गरज अधिक अधोरेखित होते. कारण, आता हा प्रश्न केवळ अमेरिका किंवा इराणपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो संपूर्ण जगाच्या स्थैर्याशी निगडित आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायानेही अधिक सक्रिय भूमिका घेत, या संघर्षाला आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अन्यथा, इस्लामाबादची ही अपयशी मध्यस्थी शांततेच्या दृष्टीने नव्हे, तर भविष्यातील मोठ्या जागतिक संघर्षाची केवळ प्रस्तावना ठरू शकते. या पृष्ठभूमीवर, पुन्हा चर्चेचा मार्ग स्वीकारून 'अमेरिकेला जागतिक शांतता हवी आहे' याची हमी देणे, किंवा 'संघर्ष अधिक तीव्र करणे' हे दोन पर्याय ट्रम्प यांच्यासमोर दिसतात. रविवारी होर्मुझ सामुद्रधुनीवर नौदल नाकेबंदी जाहीर करून दुसऱ्या पर्यायाकडे झुकत असल्याचे संकेत त्यांनी दिले. ही कृती आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धजन्य मानली जाते. इराणने प्रामाणिकपणे चर्चा केल्यास अमेरिका सहकार्य करेल, अशी ग्वाही सुरुवातीस व्हान्स यांनी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात अनेक अडचणी आल्या. परदेशातील गोठवलेली मालमत्ता मुक्त करणे, युद्धविरामाचा विस्तार लेबनॉनपर्यंत करणे या इराणच्या मागण्यांमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू हे हिजबुल्लाहविरुद्ध लढाई सुरू ठेवण्याच्या भूमिकेत आहेत. याखेरीज, उभय बाजूंनी केल्या जाणाऱ्या काही विधानांमुळे चर्चेतील पारदर्शकता संपून गोंधळ अधिक वाढला. साधरणतः, अशा उच्चस्तरीय भेटी अत्यंत नियोजनबद्ध असतात. मात्र, यावेळी व्हान्स यांच्या टीमकडे तयारीसाठी फार कमी वेळ होता. मुळात ते स्वतः सुरुवातीपासून युद्धाचे विरोधक होते. या युद्धामुळे प्रादेशिक अस्थिरता निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर जीवितहानीदेखील होईल, तसेच अमेरिकेच्या संसाधनांवर ताण येईल, असे त्यांचे मत होते, तरीही त्यांनी सार्वजनिकरीत्या ट्रम्प यांना पाठिंबा दिला. तथापि, या युद्धामुळे ट्रम्प यांचा राजकीय गटही विभागला गेल्याचे उघड झाले आहे. या चर्चेसाठी पाकिस्तानने मध्यस्थाची भूमिका बजावल्याचे स्पष्ट होताच, भारतातील अनेकांना आनंद आवरता आला नाही. जो देश सातत्याने अशांतता माजविण्यासाठी सक्रिय कारस्थाने करतो, त्या देशाने शांततेसाठी पुढाकार घ्यावा ही बाब अनेकांना खटकली नाही. आता मुखभंगाचे दुःख पचवून भविष्यातील विघ्नवार्तांना सामोरे जाण्याची मानसिक तयारी ठेवावी लागेल, एवढाच त्या चर्चेच्या निष्फळतेचा अर्थ आहे.

## तंत्रवेध

# २०३५ नंतर विस्मृतीत जाणाऱ्या वस्तू

**डॉ. दीपक शिकारपूर**

'माझ्याकडे १८८० मधले एक दुर्मिळ पुस्तक आहे!' एखादा संग्राहक अभिमानाने सांगतो. आपल्यालाही त्याचे कौतुक वाटते, कारण इतकी जुनी वस्तू त्याने जिवापाड जपलेली असते आणि पुढच्या पिढ्यांना ऐतिहासिक संदर्भ म्हणून तिचा (कदाचित) उपयोग होणार असतो... 'कदाचित' असे म्हटले कारण चक्रावणाऱ्या वेगाने तांत्रिक प्रगती होण्याच्या या दिवसांमध्ये बदलती जीवनशैली आणि संकल्पनांमध्ये कोण जाणे किती व्यक्तींना अशा संग्राहकांचे आणि त्यांच्याकडल्या वस्तूंचे महत्त्व वाटेल! हे झाले वस्तूंचे उदाहरण. तंत्रज्ञानातील बदलांसोबत संबंधित उपकरणांचे दृश्य रूप आणि कार्यपद्धतीदेखील किती आणि कशी बदलते पाहा. तसेच होणारे सर्वच बदल चांगलेच असतील असेही नाही. परंतु त्या दिशेने प्रवास सुरू आहे हे नक्की!

२०३५ पर्यंतच्या अत्याधुनिक काळात सर्वांत आधी बळी पडणार आहे टपाल आणि तार खात्याचा म्हणजेच पोस्टाचा. गंमत पाहा, फक्त दहा-पंधरा वर्षांपूर्वी हे विधान अतिशयोक्तिपूर्ण वाटले असते. कारण शहरी भाग वगळला तरी खेड्यापाड्यांमधील लोक तोपर्यंत संवादाच्या विविध माध्यमांसाठी पोस्टावर अवलंबून असत. परंतु मोबाईल फोनच्या क्रांतीने हे भाकीत पार उलटे पालटे करून टाकले. शिवाय येणारा जमाना तत्काळ ऊर्फ 'इंस्टंट'चा आहे. मोबाईल फोन, संगणक, इंटरनेटच्या वापराने लगेचच संभाषण आणि संदेशवहन होत असताना उशिराने मिळणाऱ्या टपालसेवेवर कोण अवलंबून राहील? तसेच तंत्रज्ञानाबरोबरच खाजगी कुरियर सेवेने टपाल खात्याचा महसूल बऱ्यापैकी खाल्ला आहे. ही सेवा चालवणे सरकारला न परवडणारे होत चालले आहे, हे तर आपण पाहतोच आहोत. खरे तर, हळूहळू का होईना, पोस्ट ऑफिसचे रूपांतर बँकेमध्ये होऊ लागले आहे. बँकेवरून आठवले, चेकदेखील पोस्टाच्याच वाटेने जात आहे, हे वाचून बहुतेकांना आश्चर्य वाटेल; पण ते खरे आहे. चेकवरील प्रशासकीय प्रक्रिया करण्यामागचा खर्च अनेक बँका आणि वित्तसंस्थांना दिवसेंदिवस न पेलवणारा होत आहे. खुद्द ग्रेट ब्रिटनमध्ये २०२८ पर्यंत धनादेशाला त्याच्या सिंहासनावरून पायउतार करण्याबाबतची योजना कार्यान्वित झाली आहे. 'प्लास्टिक मनी' म्हणजेच विविध क्रेडिट-डेबिट-प्रीपेड कार्ड्स, फोन बँकिंग आणि इंटरनेट याद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारांची संख्या जगभर विलक्षण वेगाने वाढत असल्याचाही हा परिणाम आहे.

या यादीमध्ये पुढचे नाव आहे वृत्तपत्रांचे. अनेक वृत्तपत्रांनी ई-आवृत्त्या सुरू केल्या आहेतच. त्यावर जास्त तत्परतेने ताज्या बातम्या कळण्याची शक्यता असल्याने त्या लोकप्रिय होत आहेत. वैयक्तिक तसेच सार्वजनिक पातळीवरचे छापील पुस्तकांचे साम्राज्य प्रचंड असले तरी त्याला दोन अंगभूत मर्यादा आहेत. पुस्तकांचे वजन आणि त्यांना लागणारी जागा. शिवाय देखभाल आहेच. दोन-तीन हजार पुस्तके सहज घरी बाळगणाऱ्या खऱ्या पुस्तकप्रेमींना या अडचणींचा चांगलाच अनुभव असतो. तसेच नव्या पिढीचे वाचन एकंदरीतच कमी झाले आहे, असेही दिसते. त्यामागची कारणे काहीही असोत.

बरे, आजकाल पुस्तके ऑनलाईन खरेदी करता येतात. 'अमेझॉन'वर मिळणाऱ्या 'किंडल'सारख्या इलेक्ट्रॉनिक साधनामध्ये हजारो पुस्तके मावतात. अशी साधने स्वतःच्या बॅटरीवर सात-आठ दिवसदेखील चालतात. कुठेही बसून कितीही वाचा! बोटांना पाने उलटण्याऐवजी 'पेज डाऊन'चे बटन दाबण्याची सवय लागली की झाले! दूरध्वनीच्या लॅण्डलाईन जोडणीबाबत मात्र कोणाचे दुमत असेल, असे वाटत नाही. जगात तर सोडाच, भारतातदेखील अनेक कुटुंबांमध्ये मुले लहान असल्याने अशांनी लॅण्डलाईन जवळजवळ नाईलाजानेच सांभाळली आहे. काहींनी तर कित्येक वर्षांची दोन पिढ्यांची सवय आहे म्हणूनच बहुधा लॅण्डलाईन ठेवली असावी. मोबाईल फोनच्या सेवेतील तांत्रिक प्रगती, 'नंबर पोर्टेबिलिटी' अशा सुविधांमुळे लॅण्डलाईनचे अस्तित्वच धोक्यात येणार हे उघड दिसते आहे. संगीत अर्थातच नष्ट होणार नाही; परंतु त्याच्या उपलब्धतेचे मार्ग आणि पद्धती बदलतील. खरे तर संगीत उद्योगातील फायदा दिवसेंदिवस कमी होत आहे. पायरसी ऊर्फ अनधिकृत वापर आणि वितरण, हे त्यामागील एक मोठे कारण आहेच. परंतु (जरा वादाचा मुद्दा असलेली) आणखी एक गंभीर बाबदेखील यात समाविष्ट आहे. संगीतातील सर्जनशीलता, उत्स्फूर्तता आणि नवनिर्मिती कमी होत आहे. सध्याच्या 'रिमिक्स'च्या संख्येवरून हे सहज समजून येईल. शिवाय फाईल शेअरिंग आणि सुलभ डाऊनलोडिंगच्या तंत्रामुळे 'सीडी'च्या जमान्यात भरपूर व्यवसाय करणारा संगीतउद्योग, आता आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आला आहे.

इंटरनेटमार्फत मिळणाऱ्या सुविधा आणि त्यांचा प्रसार अनंत असल्याने रेकॉर्ड्स, कॅसेट आणि सीडी असा प्रवास करून आलेला संगीत उद्योग- त्याने स्वतःचीच भविष्यकालीन धोरणे तपासून न पाहिल्याने सध्या तरी जरा गोंधळलेल्या अवस्थेत आहे. याबाबत 'रोलिंग स्टोन्स' या जगप्रसिद्ध वाद्यवृंदाशी संबंधित असलेल्या स्टीव्ह नॉपरने एक पुस्तकही लिहिले आहे. आपल्याकडे दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्या, डीटीएच आदींचे प्रस्थ सध्या वाढत असले तरी जागतिक पातळीवर पारंपरिक अर्थाने टीव्ही पाहणे कमी होत आहे. याची कारणे दोन. एक तर 'लाईव्ह स्ट्रीमिंग'सारख्या तंत्रांमुळे संगणकावर तसेच सेलफोनमार्फत थेट टीव्ही उपलब्ध होण्याचे प्रमाण आणि वेग वाढतो आहे. तसेच कॉम्प्युटर गेम्ससारखे करमणुकीचे इतर प्रकारही संगणकावर मिळत असल्याने त्यापासून दूर जाऊन वेगळे माध्यम वापरण्याची गरज कमी होते आहे. 'नेटफ्लिक्स'सारख्या सुविधेमुळे प्रेक्षकाला काय पाहावे, याबाबतचे निर्णयस्वातंत्र्य मिळू लागले आहे. शिवाय टीव्हीवरील वाढत्या जाहिरातींमुळे मूळ कार्यक्रमाचा एकंदर कालावधी वाढत चालला आहे. बरे, जाहिराती न दाखवण्याने वाहिन्यांची पंचाईत होते. कारण प्रक्षेपणाचा वाढता खर्च. असे हे दुष्टचक्र किती काळ नीट चालते ते पाहायचे!

आता आपल्या ध्यानात आले असेल की भविष्यात संगणक वा तत्सम सुविधा खरेदी करण्याची किंवा सीडीवरचे सॉफ्टवेअर, पुस्तके वा संगीत जवळ बाळगण्याची कदाचित गरजच भसणार नाही. विशिष्ट सेवाशुल्क देऊन आपण क्लाऊडमध्ये मिळणारी सर्व पूरक साधने आणि उपकरणे वापरू शकू. कोणत्याही लॅपटॉप वा हॅण्डसेटमार्फत आपण महाजालात 'ठेवलेल्या' आपल्या वस्तूंपर्यंत 'पोहोचू' शकू. 'मायक्रोसॉफ्ट विंडोज' आणि 'ॲपल मॅक' हे ओएसचे प्रमुख उत्पादक आणि 'गूगल' यांनी एकत्र येऊन, इंटरनेटच्या माध्यमाद्वारे, अशी सेवा पुरवण्याच्या दृष्टीने फार मोठी पावले यापूर्वीच टाकली आहेत. अर्थात यामुळे मानवी मनातल्या 'हे माझे आहे!' या स्वामित्वाच्या कल्पनेला कदाचित तडा जाईल. कारण महाजालावरच्या आपल्या वस्तू प्रत्यक्ष नाही, तर आभासी (व्हर्चुअल) स्वरूपात असतील! आत्तापर्यंतच्या भविष्यकथनात वर्णिलेल्या वस्तू गेलेल्या परवडल्या, असे म्हणण्याची पाळी कदाचित २०३५ पर्यंत येणार आहे. कारण माणसाला सर्वांत हवीशी वाटणारी (आणि अत्यावश्यक असलेली) बाब नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. ती म्हणजे व्यक्तिगत गुप्तता ऊर्फ 'प्रायव्हसी'! तसे पाहिले तर ती आत्ताच जाऊ लागली आहे. दुकानांमध्ये, रस्त्यावर कॅमेरे असतातच. शिवाय संगणकांमध्ये, हॅण्डसेटमध्ये, गाडीमध्ये 'जीपीएस' असते. पण याचीही चिंता करायचे फारसे कारण नाही. स्मृतिभ्रंशासारख्या (अल्झायमर्स) रोगांचे प्रमाणदेखील वाढत असल्याने आपले काय हरवले आहे, तेच बहुधा आपण विसरून जाऊ!

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# घुसखोर रोहिंग्यांवर जनगणनेतून लगाम

भारतासारख्या विशाल, विविधतेने नटलेल्या देशासाठी जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजदाद नसते तर ती राष्ट्राच्या भविष्याचा वेध घेणारी असते. प्रत्येक दहा वर्षांनी होणारी जनगणना ही शासनाच्या धोरणनिर्मितीची कणा मानली जाते. आता आगामी जनगणना २०२७ च्या पृष्ठभूमीवर देश नव्या टप्प्याकडे वाटचाल करीत आहे. या जनगणनेला विशेष महत्त्व आहे कारण ती केवळ आकड्यांची नोंद न राहता डिजिटल युगातील सर्वसमावेशक अचूक गतिमान माहिती संकलनाची प्रक्रिया ठरणार आहे. शहरीकरणाची झपाट्याने वाढ, स्थलांतराचे वाढते प्रमाण, डिजिटल क्रांती, शिक्षणातील बदल, रोजगाराच्या नवीन संधी आणि सामाजिक रचनेतील परिवर्तन या सर्वांचा अचूक अभ्यास जनगणना २०२७ नुसार शक्य होणार आहे. जनगणना ही देशाच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे अचूक चित्र उभे करणार आहे. गेल्या दशकात भारतात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. या सर्व बदलांचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी जनगणना २०२७ अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. जनगणना शासनाच्या सर्व धोरणांचा पाया आहे. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, रोजगार, अन्नसुरक्षा या सर्व क्षेत्रांतील योजना जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित असतात. त्यामुळे अचूक माहिती हीच विकासाची गुरुकिल्ली ठरते. कोविड-१९ महामारीमुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलली गेली. परिणामी, जवळपास १५ वर्षांनंतर ही प्रक्रिया होणार असल्याने तिचे महत्त्व अधिकच वाढले आहे. या कालावधीत लोकसंख्येच्या रचनेत मोठे बदल झाले आहेत.

डिजिटल जनगणनेसमोर काही आव्हानेही आहेत. ग्रामीण भागात इंटरनेटची मर्यादा, तांत्रिक साक्षरतेचा अभाव आणि डेटा सुरक्षिततेचे प्रश्न हे गंभीर मुद्दे आहेत. नागरिकांची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे ही शासनासाठी मोठी जबाबदारी असेल. जातनिहाय जनगणना हा एक महत्त्वाचा आणि वादग्रस्त मुद्दा आहे. अनेक सामाजिक संघटना याची मागणी करीत आहेत, कारण यामुळे मागासवर्गीय घटकांची अचूक स्थिती समजू शकते. ग्रामीण आणि शहरी भागातील तफावत, स्थलांतराचे प्रवाह, बेरोजगारीचे प्रमाण आणि शिक्षणाची स्थिती याचे अचूक चित्र या प्रक्रियेतून समोर येईल. ग्रामीण भागात अजूनही मूलभूत सुविधांची कमतरता आहे. तर शहरांमध्ये लोकसंख्येचा ताण वाढत आहे. या दोन्ही भारतांमध्ये समतोल साधण्यासाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल. युवकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे भारत 'युवा राष्ट्र' म्हणून ओळखला जातो. स्थलांतर हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. भारतात 'रोहिंग्या' हा शब्दही कुणाला माहीत नव्हता. पण या वर्षीच्या जून ते ऑक्टोबर या पाच महिन्यांच्या काळात म्यानमारमध्ये हिंसक दंगली झाल्या. या दंगलीत १५० हून अधिक रोहिंग्या मारले गेले. जवळपास दीड लाखांहून अधिक लोकांना देश सोडून इतरत्र आश्रय घ्यावा लागला. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रासह देशभरात घुसखोरी करून राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्यांची संख्या वाढत चालली आहे. यामुळे महाराष्ट्रात घुसखोरी करून राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्यांवर कारवाई केली जावी अशी मागणी सातत्याने केली जाते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामांवर फेब्रुवारी २०२५ मध्ये मोठी कारवाई केली. तब्बल ८५० एकर क्षेत्रावरील अतिक्रमण प्रशासनाने हटवले आहे. राज्यातील सत्ताधारी भाजपा महायुती सरकारने घेतलेला धाडसी निर्णय आणि महापालिका प्रशासनाने काटेकोर अंमलबजावणी यामुळे अनधिकृत 'भंगार हब' अखेर जमीनदोस्त झाला. रोहिंग्या हा म्यानमारमधील एक मुस्लिम अल्पसंख्यक समुदाय आहे ज्यांना म्यानमार सरकारनुसार 'बंगाली' म्हणून ओळखले जाते. रोहिंग्या नागरिक भारत-बांगलादेश सीमेवरून भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे भारत सरकार राष्ट्रीय सुरक्षेबाबत सतर्क आणि गंभीर आहे. या बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांचे पासपोर्ट रद्द करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पाठपुरावा केला. यात गेल्या वर्षभरात ६२ पासपोर्ट रद्द झाले. यासह संबंधित बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्रदेखील रद्द होण्यासाठी पोलिसांनी पाठपुरावा केला. बुलढाणा जिल्ह्यातील मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या जळगाव जामोद संग्रामपूर याशिवाय मलकापूर व धाड परिसरात बनावट जन्म दाखल्याच्या आधारावर रोहिंग्यांची नोंद आढळली आहे. या संदर्भात प्रहार संघटना, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सतत पाठपुरावा करून प्रसार माध्यमांना माहिती दिली आहे. जनगणनेच्या आधारे घुसखोर रोहिंग्यावर लगाम लागणार आहे. बनावट जन्म प्रमाणपत्र घेऊन अनेक बांगलादेशी व रोहिंगे हे महाराष्ट्रात राहत आहेत. त्यांना पुढे होणाऱ्या जनगणनेतून बाद करून त्यांच्या देशात हाकलता येईल.

९८८१७१७८२८

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# नाशिक कॉर्पोरेट जिहाद

नाशिक शहरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत उघडकीस आलेले कॉर्पोरेट जिहाद प्रकरणाने भारत हादरून गेला आहे. लव्ह जिहादच्या धोक्यावर सातत्याने आवाज उठवला जात असताना व धर्मांतरणविरोधी कायद्याची चर्चा असताना आता कॉर्पोरेट जिहादच्या रूपाने धर्मांतराचा आणि लैंगिक शोषणाचा नवा पैलू समोर आला आहे. यावरून हा कायदा किती महत्त्वाचा आहे आणि त्यातील तरतुदी आणखी कडक करण्याची गरज आहे, हे स्पष्ट होते. नाशिकच्या मुंबई नाका परिसरातील एका मल्टिनॅशनल कंपनीत महिला कर्मचाऱ्यांवर विनयभंग, लैंगिक आणि मानसिक अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी आतापर्यंत गुन्हे दाखल झाले असून, सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे. पीडित महिला १८ ते २६ वयोगटातील असून, २०२२ पासून हे प्रकार सुरू होते अशी माहिती आहे.

या कंपनीतील एचआर मॅनेजरकडून धर्मांतरासाठी जबरदस्ती केली जात होती. नमाज पठन करायला लावणे, मांसाहार करायला लावणे, हिंदू देवतांबाबत आक्षेपार्ह शब्दांत बोलणे, मुलींना लज्जास्पद वागणूक देणे, मुलींशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे असे संतापजनक प्रकार घडले. मुंबई नाका पोलिस ठाण्यात धार्मिक भावना दुखावल्याचा, विनयभंगाचे आणि धार्मिक भावना दुखावत विनयभंगाचे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. आठ महिला आणि एका पुरुषाने या प्रकरणी तक्रार केली आहे. आरोपींनी बळजबरीने धर्मांतराचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. संशयित आरोपींसोबत डोक्यावर गोल टोपी घातलेले धर्मांतरित तरुणाचे फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत. २५ मार्च २०२६ रोजी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी गुप्त तपास सुरू केला होता.

जुलै २०२२ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान दानिश शेख, तौसिफ अख्तार, निदा खान यांनी कर्मचारी महिलेच्या धार्मिक भावना दुखावल्या. तौसिफने धमकावून शारीरिक संबंध ठेवले. इतरांनी ऑफिस लॉबीमध्ये विनयभंग केला. मे २०२३ ते १९ मार्च २०२६ या काळात रझा मेमन, शाहरुख कुरेशी यांनी ऑफिसमध्ये विनयभंग केला. कंपनीच्या एचआर विभागाकडे तक्रार करूनही एचआर अधिकाऱ्यांनी या कृत्याला पाठिंबा दिला. शफी शेखने ऑफिसच्या मीटिंगमध्ये एकटक पाहून पीडितेच्या वैयक्तिक



आयुष्यात संतती नसल्याबद्दल विधान केले आणि जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. मे ते डिसेंबर २०२५ मध्ये तौसिफने तरुणीच्या खाजगी आयुष्याबद्दल गोष्टी विचारल्या आणि इतर युवतींना धर्माबाबत बोलून त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या. तौसिफ अख्तार, दानिश शेख आणि रझा मेमन यांनी एका तरुणाला त्याच्या धर्मातील देवाबद्दल अपशब्द बोलून विशिष्ट धर्माचे धार्मिक विधी करायला सांगितले. जबरदस्तीने मांसाहार करायला लावला. त्याच्या धर्मपरिवर्तनाचा प्रयत्न केला आणि त्याच्या धर्मातल्या महिलांबाबत अश्लील शेरेबाजी केली. आसिफ अन्सारी आणि शफी शेख या संशयितांनी युवतीचा विनयभंग केला.

ही घटना समोर आल्यानंतर एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो की प्रत्येक वेळी हिंदूंच्या अंधश्रद्धेवर टीका करणारे, त्यांच्या सण-उत्सवांना आणि परंपरांना हिणवणारे अंधश्रद्धा निर्मूलनवाले, पुरोगामी विचारवंत आणि काँग्रेससारखे पक्ष या कॉर्पोरेट जिहादवर गप्प का आहेत? जेव्हा हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात, त्यांच्या श्रद्धांवर आघात होतो, तेव्हा हेच गट लगेच सक्रिय होतात आणि वैज्ञानिक दृष्टिकोन किंवा धर्मनिरपेक्षता या नावाखाली हिंदू धर्माला लक्ष्य करतात. मग, येथे महिलांवर होणारे अत्याचार, धर्मांतराची सक्ती, त्यांना अंधश्रद्धा वाटत नाही का? अत्याचार वाटत नाही का? की हे प्रकार त्यांच्या पुरोगामी व्याख्येत बसत नाहीत? धर्मांतराची सक्ती करणे, महिलांचा विनयभंग करणे आणि त्यांना विशिष्ट धार्मिक आचरण करण्यास भाग पाडणे, हे कोणत्याही सभ्य समाजात स्वीकारार्ह नाही. तरीही, या घटनेवर तथाकथित पुरोगाम्यांकडून अपेक्षित तीव्र प्रतिक्रिया उमटलेली नाही. त्यांचे हे मौन त्यांच्या दुटप्पीपणाचे आणि विशिष्ट विचारसरणीला पाठीशी घालण्याच्या वृत्तीचे द्योतक आहे. हिंदूंच्या बाबतीत अंधश्रद्धा आणि धार्मिक कट्टरता शोधणारे हेच लोक, जेव्हा दुसऱ्या धर्मातील व्यक्तींकडून असे गंभीर गुन्हे घडतात, तेव्हा मात्र व्यक्तिगत स्वातंत्र्य किंवा कायदा सुव्यवस्था यासारख्या सबबी देत मूग गिळून बसतात. हे ढोंगी पुरोगामित्व आता समाजासमोर उघड झाले आहे.

काँग्रेस पक्षाची या प्रकरणातील भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात आहे. लव्ह जिहाद असो वा कॉर्पोरेट जिहाद, काँग्रेस नेहमीच अशा प्रकरणांवर संदिग्ध भूमिका घेताना दिसते. मतांच्या राजकारणासाठी जिहाद्यांना पाठीशी घालण्याचा आरोप त्यांच्यावर सातत्याने होत असतो. या प्रकरणातही, महिलांवर झालेले अत्याचार आणि धर्मांतराच्या सक्तीवर काँग्रेसने ठोस भूमिका घेऊन पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित होते. परंतु, त्यांच्याकडून तशी कोणतीही सक्रियता दिसत नाही. हेच जर एखाद्या हिंदू व्यक्तीने केले असते, तर काँग्रेसने लगेच भगवा दहशतवाद किंवा हिंदुत्ववादी कट्टरता असे लेबल लावून गदारोळ केला असता. लव्ह जिहाद पाठोपाठ आता कॉर्पोरेट जिहादचा हा प्रकार समोर आल्याने, या जिहादी प्रवृत्तींना किती काळ पाठीशी घातले जाणार आहे, हा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे. केवळ कायद्याची अंमलबजावणी करून हे प्रकार थांबणार नाहीत, तर यामागे असलेल्या विचारसरणीवर आणि त्यांना अप्रत्यक्षपणे समर्थन देणाऱ्या शक्तींवरही प्रहार करणे आवश्यक आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा आणि धार्मिक स्वातंत्र्याचा मुद्दा हा कोणत्याही राजकारणापेक्षा मोठा आहे. या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, या घटनेकडे केवळ एक गुन्हेगारी कृत्य म्हणून न पाहता, यामागे दडलेल्या धार्मिक आणि वैचारिक भूमिका लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. हा संघटित गुन्हा आहे. आणि या संघटित गुन्ह्यात जगभरातील जिहाद्यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा विचार केवळ याच प्रकरणाबाबत करू नये, उलटपक्षी इतर गुन्हे, ज्यांचा या गुन्ह्याशी संबंध नसला तरी जिहादी वृत्ती हे 'कॉमन' मानून यास संघटित जिहादी गुन्हा म्हणून पाहिले पाहिजे. तर, आता धोक्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे आणि पुरोगामित्वाच्या नावाखाली चाललेला हा ढोंगीपणा आता थांबायला हवा.

writerjayeshmestry@gmail.com

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३५ वी जयंती. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ. आंबेडकरांची जगभर ओळख आहे. त्यांचे दलितोद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंधपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषितज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहासतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीतिज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ. आंबेडकर यांचे आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास 'मूकनायक'पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारतपर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे त्यांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. मूकनायक पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. १९२४ मध्ये डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. त्यांची लेखणी झुंझार, क्रांतिकारी आणि प्रभावी होती. पत्रकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार**/पुणे

## वाचक पत्रे

### वर्धेतील अतिक्रमण आणि नगरसेवक

वर्धा एकेकाळी सुटसुटीत शहरवजा गाव होते. या गावाची रचना फार सुंदर आहे. दोनच मोठे आणि महत्त्वाचे रस्ते असलेल्या वर्धेत अनेक चौक आहेत. जवळपास सर्व रस्ते एकमेकाला सहज मिळतात. सहज आणि सोप्या शहराला आता गेल्या आठ दहा वर्षांत अतिक्रमणाची लागण झाली आहे. सर्वत्र अतिक्रमण पाहायला मिळते. फक्त बाजारपेठेतच नाही तर संपूर्ण वस्त्यांमध्ये अतिक्रमण झालेले दिसत आहे. सरकारी यंत्रणा मजबूत असतानाही त्यावर थातुरमातुर कारवाई करून शांत होते. शासकीय अधिकारी अतिक्रमणाबाबत गंभीर नसल्याने अतिक्रमणाची जबाबदारी वर्तमान नगरसेवकांना दिली पाहिजे किंवा त्यांच्या वॉर्ड वा प्रभागात झालेल्या अतिक्रमणासाठी नगरसेवकांनाच जबाबदार धरले पाहिजे. ही जबाबदारी नगरसेवकांना दिल्यास कदाचित अतिक्रमणाच्या विळख्यातून शहराची सुटका होईल.

**नंदकिशोर भुतडा**/वर्धा

### पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था, स्तुत्य उपक्रम

उन्हाळा सुरू होताच सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागते. वाढत्या तापमानामुळे मानवासोबतच पशु-पक्ष्यांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागते. अशा वेळी अनेक समाजसेवी संस्था आणि संवेदनशील नागरिक झाडांवर जलपात्रे ठेवून मुक्या जीवांसाठी पाण्याची व्यवस्था करतात. सकाळ-संध्याकाळ त्या पात्रांमध्ये पाणी भरून एक सामाजिक बांधिलकी जपली जाते. अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरातही अशाच प्रकारची जलपात्रे झाडांवर ठेवण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, या पात्रांचा उपयोग केवळ पक्षीच नव्हे तर वानरेही करताना दिसत आहेत. तहानेने व्याकुळ झालेली वानरे या जलपात्रांतील पाणी प्राशन करून आपली तृष्णा भागविताना दिसणे, ही केवळ दृश्य अनुभूती नसून निसर्गाने दिलेला एक महत्त्वाचा संदेश आहे. यावरून स्पष्ट होते की, सातत्याने चाळिशी पार करणाऱ्या तापमानामुळे वन्यजीव आणि पक्ष्यांची अवस्था किती बिकट होत आहे. आपण जर वेळेवर अशा जीवांसाठी पाण्याची व्यवस्था केली, तर अनेक निष्पाप जीव तडफडून मरण्यापासून वाचू शकतात. आज 'पाणी वाचवा' हा नुसता घोषवाक्याचा विषय राहिलेला नाही; तर ती काळाची गरज बनली आहे.

**प्रा. डॉ. सुहास उगले**/अकोला

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# व्यावसायिक गॅस वाढल्याने गॅस वितरण प्रणाली सुरळीत

## ● सिलेंडरचा अजिबात तुटवडा नाही ● नागरिकांना घरपोच सेवा देणार

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल -**

सोलापूर शहर-जिल्ह्यात सध्या व्यावसायिक सिलेंडरचा कोठेही तुटवडा नाही. सद्यपरिस्थितीत आखाती युध्दाचा युध्दविराम झाल्यामुळे गॅस वितरणाची परिस्थिती सुधारत आहे. व्यावसायिक गॅसच्या वाढत्या उपलब्धतेमुळे हॉटेल व्यावसायिक यांना देखील सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत आहे. यामुळे आगामी आठवड्यात अजून गॅस वितरण प्रणालीमध्ये मोठी सुधारणा होण्याचे संकेत आज (दि. १३) जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्तिकीयन यांनी मध्यंतरी (१० एप्रिल) जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी व HPCL, BPCL, IOCL सेल्स ऑफिसर यांची आढावा बैठक घेऊन जिल्ह्यातील घरगुती व व्यावसायिक एलपीजी याच्या वितरणाबाबत आढावा घेतला. सदर आढावा बैठकीमध्ये पुढील प्रमाणे चर्चा करणेत आली. केंद्र शासनाने शिल्लक व्यवसाय गॅस सिलेंडरच्या वाटपाचे राज्य शासनास अधिकार दिले आहेत. त्यास प्राधान्यक्रमानुसार व्यावसायिक सिलेंडर करिता ७०% ची



मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित कंपनीने गॅस पुरवठा देण्यास सुरुवात केलेली आहे. ज्या व्यावसायिकाकडे कमर्शियल कनेक्शन नाही त्यांनी जवळच्या एजन्सीकडे जाऊन व्यावसायिक सिलेंडरची नोंदणी करावी.

सध्या व्यावसायिक सिलेंडरचा कोठेही तुटवडा नाही. सद्यपरिस्थितीत आखाती युध्दाचा युध्दविराम झाल्यामुळे गॅस वितरणाची परिस्थिती सुधारत आहे. व्यावसायिक गॅस उपलब्धतेमुळे हॉटेल व्यावसायिक यांना देखील सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत आहे. शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनेप्रमाणे घरगुती एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत करणेकामी सोलापूर जिल्हयातील सर्व गॅस एजन्सींना त्यांचे एजन्सीसमोर खालीलप्रमाणे फलक लावणेबाबत सूचना करणेत आली. यामध्ये गॅस एजन्सी अथवा गोडाऊन मधून गॅस सिलेंडरची विक्री करण्यात येत नाही, सर्व ग्राहकांना सिलेंडर घरपोच पुरविण्यात येत आहे, ग्राहकांनी एजन्सी अथवा गोडावून समोर रांगा लावू नयेत, गॅस सिलेंडरचे वितरण केवळ ऑनलाईन बुकींग नंतर OTP प्रणालीद्वारेच करण्यात येते. राज्यात तसेच एजन्सीमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा आहे, यामुळे ग्राहकांनी कृपया अफवांवर विश्वास ठेवू नये असेही आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केले आहे.

---

## - जाहीर समन्स -

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**निशिगंधा सहकारी बँक लि, पंढरपूर** — **अर्जदार**
विरूध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) — जाब देणार

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ११३२/२०२५-२६ | २१००५१/- | १<br>३ | प्रतिक संतोष कुंभारे<br>रा. परिचारक बिल्डर ऑफिस, पंत नगर, पंढरपूर ता. पंढरपूर जि.सोलापूर<br>अमित अर्जुन शेरकर<br>रा.के.बी.पी. कॉलेज जवळ, गट न१०४/२. प्लॉट नं.१०६ शिवकिर्ती नगर, पंढरपूर ता. पंढरपूर जि सोलापूर |
| २ | ११४८/२०२५-२६ | ९४५९०/- | २<br>३ | विमल प्रभाकर झिंजुर्टे<br>रा. मातोश्री निवास, तिरंगा नगर, लिंक रोड, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर<br>ओंकार सुनिल वाळुजकर<br>रा.घर नं.३९७९/२, सखुबाई कन्या प्रशालेच्या जवळ, पंढरपूर ता. पंढरपूर जि सोलापूर |
| ३ | ११४९/२०२५-२६ | ११२६१८/- | १<br>२<br>३ | जावीद महमंद आतार<br>रा. कुंकू कारखाना मागे, शिवाजी नगर, गोपाळपूर, ता. पंढरपूर जि.सोलापूर<br>सचिन महादेव आसबे<br>रा आसबे गल्ली, गोपाळपुर, ता. पंढरपूर जि. सोलापूर<br>राजा महमंदहनीफ आतार<br>रा. कुंकू कारखाना मागे, शिवाजी नगर, गोपाळपूर, ता. पंढरपूर जि.सोलापूर |

कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. २८/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.१३/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**सही/-**
**उपनिबंधक,**
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्
को. ऑप असोसिएशन लि, सोलापूर

---

## जाहीर नोटीस

आमचे अशील बिस्मिल्लाह म. इक्बाल शेख, रा. घर नं. ९१/९२, कुमठा नाका, संजय नगर, सोलापूर यांनी दिलेल्या अधिकारावरून या जाहीर नोटीशीने तमाम लोकांना विशेषतः ता. द. सोलापूर व ता. उ. सोलापूर येथील लोकांना कळविणेत येते की,

डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ३९४/२ यापैकी "का. गोदूताई परूळेकर विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., तालुका दक्षिण सोलापूर" मधील घरकुल क्र. ब-४/१ असे असून ही घरकुल या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही मुळतः मुळ सभासद राबियाबी सलीम शेख यांना संस्थेकडून रितसर अलॉट झालेली होती, मात्र दरम्यान राबियाबी सलीम शेख यांनी त्यांचे कौटुंबिक हॉस्पिटल खर्च भागविणेकरिता सदर मिळकत त्यांनी कमरुन्निसा महिबुबसाब शेख यांना दि. २३/०३/२००८ रोजी स्टॅम्प नं. ७०८७ ने कब्जापावती करारपत्राने विक्री केलेली असून त्यानंतर कमरुन्निसा महिबुबसाब शेख यांनी आमचे अशील बिस्मिल्लाह म. इक्बाल शेख यांना कायम खरेदीने देऊन त्याप्रमाणे दि. ०६/१०/२०२० रोजी स्टॅम्प क्र. ६९२७ ने कब्जापावती करारपत्र लिहून दिलेले आहे, तेव्हापासून आजतागायत सदरची मिळकत आमचे अशिलांच्या मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून त्यावर इतरांचा कोणाचाही कब्जे वहिवाट नाही. सबब, सध्या आमचे अशिलांना सदर मिळकत रितसर संस्थेकडून स्वतःच्या नावाने ट्रान्सफर करण्याची आहे, परंतु मुळ सभासद राबियाबी सलीम शेख हे दि. ११/०९/२००९ रोजी मयत झालेले असून त्यांचे पती कै. सलीम शेख हे सुद्धा यापूर्वीच निधन पावले आहे, तरी त्यांना वारसदार असून मात्र ते सोलापुरात नसून ते कुठे आहेत त्याचा थांगपत्ता नाही. त्यामुळे आमचे अशिलांनी सदर संस्थेस असे हमीपत्र लिहून दिले आहे की, "सदर मिळकत नोटरी कब्जापावतीद्वारे संस्थेमध्ये त्यांच्या नावाने ट्रान्सफर करून मिळावी, त्यानंतर मयत सभासद राबियाबी सलीम शेख यांचे कायदेशीर वारसदार म्हणून कोणीही कायदेशीर मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध सांगण्यास आल्यास त्याची संपूर्णतः निवारणा आमचे अशील हे स्वतःचे पदरखर्चाने दूर करून देणार आहेत". अशा प्रकारचे हमीपत्राद्वारे व नोटरी कब्जापावतीद्वारे व वरील परिस्थितीचा विचार करून वर नमूद संस्था / सोसायटी सदर मिळकत आमचे अशिलांचे नावे रितसर संस्थेमध्ये ट्रान्सफर करण्यास तयार झाले आहे.

तेव्हा सदरचे आमचे अशिलांचे नावाची वरील घरकुलच्या संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डला नोंद होण्यास कोणाचेही हरकत अथवा तक्रारी असल्यास त्याबद्दल त्यांनी खालील नमूद पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत-तक्रार कळवावी. या मुदतीत कोणाचेही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास वर नमूद मिळकत आमचे अशिलाचे नावाने वरील संस्थेमध्ये रितसर ट्रान्सफर करण्यात येईल, त्यानंतर त्याबाबत कोणाचेही, कसलेही प्रकारचे तक्रार-हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिली. तारीख दि. १३/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. जगदीश व्ही. कोंडी**
B.S.L.,LL.B,M.S.W
ॲडव्होकेट व नोटरी
रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर-४१३००२.
मो. नं. ९८६०२०५०७८
अशील तर्फे ॲडव्होकेट

---

## जाहीर नोटीस

चंद्रपूर शहरातील लोकांना सदरहू जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, श्रीमती बिना विलासचंद्र बाचा यांचे सोलापूर येथील निर्मल अपार्टमेंट, बुधवार पेठ, सोलापूर येथील फ्लॅट नं. ७ चे रजिस्टर्ड खरेदीखत क्र. ३३४३/१९९८ चा मुळ दस्त दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दुपारी दीड चे सुमारास गांधी चौक ते जटपुरा वॉर्ड चंद्रपूर येथे पडून गहाळ झालेला आहे. तरी, सदर दस्त कोणासही आढळल्यास त्यांनी श्रीमती बिना बाचा, राहणार फ्लॅट नं. ३० सिव्हील लाईन वॉर्ड चंद्रपूर येथे आणून द्यावे. सदर गहाळ झालेल्या दस्ताची चंद्रपूर पोलीस स्टेशन गहाळ नोंदणी रजिस्टरला १०१/२००६ प्रमाणे दिनांक ०४/०२/२०२६ रोजी नोंद झालेली असून सदर दस्ताचा कोठेही दुरुपयोग होऊ नये याकरिता प्रस्तुतची जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(ॲड. आकाश प्याटी)**
ॲडव्होकेट
रा.७ हिल्स अपार्टमेंट, रूपवती ब्युटी पार्लर,
क वॉर्ड, नागपूर रोड, चंद्रपूर

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी नगरपरिषद ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, डी. सोलापूर सब. डी. व तालुका बार्शी पैकी बार्शी म्युनिसिपल हद्दीतील बिनशेती गट नंबर ९७८/९८०/९८२/९९० मधील प्लॉट नं. २९ याचे क्षेत्र ८७.०१ चौ. मी. याची चतु:सिमा पुर्वेस :- प्लॉट नं. १४, दक्षिणेस:- प्लॉट नंबर २८, पश्चिमेस:- ०९.०० मीटर रुंदीचा रस्ता, व उत्तरेस:- प्लॉट नंबर ३० आहे, तसेच गट नंबर ९७८/९८०/९८२/९९० मधील प्लॉट नं. ८८ याचे क्षेत्र १२२.४२० चौ. मी. याची चतु:सिमा पुर्वेस :- प्लॉट नं. ८९, दक्षिणेस:- लगत गट नंबर, पश्चिमेस:- प्लॉट नंबर ८७ आहे, व उत्तरेस:- ०९.०० मीटर रुंदीचा रस्ता, ही खुली प्लॉट जागा श्री दत्तात्रय भगवान राऊत, किसन अंबऋषी राऊत व विष्णू अंबऋषी राऊत यांचे मालकीच्या असून हक्कपत्री त्यांचे नाव दाखल आहे. सदरच्या मिळकती ह्या आमचे पक्षकार यांनी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकती ह्या निर्वेध व निजोखमी असल्याचा निवार्ळा खरेदी देणार यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. आमचे पक्षकार यांनी सदर जागेची बाजार भावाने होणारी योग्य ती किंमत देऊन खरेदी घेण्याचे ठरविले असून तसा करार खरेदी देणार व आमचे पक्षकार यांचे दरम्यान झालेला आहे व इसारदेखील दिलेला आहे.

तरीदेखील वर नमूद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास उदा. साठे-करार, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, पोटगीहक्क, वारसाहक्क, फेडपत्र, भाडेपट्टा, टाच, बोजा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्याची शाबिती संबंधिताने ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन सात दिवसात कागदपत्रांनिशी आमचे ऑफीसमध्ये येऊन तशी आमच्या पक्षकाराची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलेही लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असून सदर मिळकतीशी कोणाचाही कसलाही कायदेशीर हक्क-हितसंबंध नाही, व असल्यास त्याने तो स्वतः होऊन सोडून दिलेला आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून कोणाचीही, कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. मुदतबाह्य तक्रारीचा विचार केला जाणार नाही. कोणाचीही फसवगत होऊ नये म्हणून सर्वांच्या माहितीकरिता हे जाहिर प्रसिद्धीकरण केले असे. ता. १३/०४/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रवीण पी. करंजकर**
'रघु - कुल', कर्मवीर नगर,
पाटील प्लॉट, बार्शी. ४१३४११
मो. नं. ९८२२०६५६६१

---

**महानगरपालिकेचा मोठा निर्णय**

# हद्दवाढ भागातील गुंठेवारी प्रकरणांना मिळणार गती

### १६ ते ३० एप्रिलदरम्यान प्रभागनिहाय विशेष शिबिरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

शहराच्या हद्दवाढ भागातील प्रलंबित गुंठेवारी प्रकरणे आणि नोटरी नोंदणी प्रक्रियेला गती देण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १६ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत प्रभागनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी जाहीर केले आहेत.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नगररचना विभाग, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय आणि भूमी अभिलेख विभाग यांच्या संयुक्त सहभागातून हा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमामुळे हद्दवाढ क्षेत्रातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. शहरात विविध १७ ठिकाणी हे शिबिर घेण्यात येत आहे.या विशेष शिबिरांमध्ये नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत मिळकतधारकांकडून आवश्यक अर्ज व कागदपत्रे स्वीकारली जाणार आहेत. तसेच चुकलेले मुद्रांक शुल्क भरण्यासंदर्भातील अर्ज मुद्रांक विभागाकडे पाठविणे, तसेच गुंठेवारी मोजणीसाठीचे अर्ज भूमी अभिलेख विभागाकडे सादर करण्याची प्रक्रिया शिबिरस्थळीच पूर्ण केली जाणार आहे.

यासोबतच अर्जदारांची माहिती व संपर्क क्रमांक नोंदवून संबंधित प्रकरणांचा पुढील पाठपुरावा देखील करण्यात येणार आहे. शिबिरांचे सुरळीत आणि यशस्वी आयोजन होण्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवून प्रतिनिधींची उपस्थिती सुनिश्चित करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे हद्दवाढ भागातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गुंठेवारी प्रकरणांना गती मिळणार आहे.

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ममतापूर तालुका बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि सोलापूर सब डि व ता. बार्शीपैकी मौजे ममतापूर येथील घरजागा ग्रामपंचायत मिळकत नं. ३४६ याचे क्षेत्र १०८९.०० चौ. फूट याचे चौ. मी. १०१.२० यांसी चतु:सिमा पुर्वेस - निवृत्ती सोपान यांची जागा, दक्षिणेस - गोरख शेळके, पश्चिमेस - २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस - आप्पा नागू जाधव येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही रुपाली तानाजी गायकवाड यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्री त्यांचे नांवे नोंद आहे. रुपाली तानाजी गायकवाड हे सदरची मिळकत आपला मुलगा श्री. तेजस तानाजी गायकवाड यांच्या नांवे हस्तांतरीत करुन सदर मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणत्याही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. - गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आपल्या मुलाच्या नांवे खरेदीखताने अथवा बक्षीसपत्राद्वारे अथवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करतील. सदरचा हस्तांतरणचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसतग होऊ नये, म्हणून ही खरेदीपूर्व/हस्तांतरणपूर्व जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक १३/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी
मो. नं. ९८२२०६५६६१

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः फताटेवाडी परिसरातील लोकांस या जाहिर नोटीसीने कळिवण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी सोलापूर जिल्हा परिषदेच्या हद्दीतील मौजे फताटेवाडी येथील गावठाण मधील जागा यांसी ग्रामपंचायत अ.क्र. ३१२ यांसी मिळकत नं. २९५ याचे एकूण क्षेत्र ९०० चौ.फुट अथवा ८३.६१ चौ.मी. यांसी चतु:सिमा :- पूर्वेस :- रस्ता, पश्चिमेस :- रस्ता, दक्षिणेस:- मिळकत नं. २९४ महमद गिरगांवकर यांची जागा, उत्तरेस :- मिनाक्षी गोपीनाथ राठोड यांची जागा.

वर वर्णन केलेली मिळकत ही सौ. कावेरी मेघशाम चव्हाण रा. फताटेवाडी यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी आहे असा निवार्ळा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे व सदरची मिळकत आमचे अशिल यांना किंवा त्यांनी सांगितील त्यांना कायम स्वरुपी खूषखरेदी देण्याचे त्यांनी मान्य व कबूल केले आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांनी वरील मिळकत खरेदी घेण्याचे ठरवून व्यवहारा प्रित्यर्थ इसारा रक्कम देवून तसा करार केलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. तथापि सदर मिळकतीत कोणाचा, गहाण, दान, लिज, बक्षीस, पोटगी, वहिवाट अगर तत्सम कोणत्याही कसलाही इतर हक्क हितसंबंध असल्यास तो ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ (आठ) दिवसाचे आंत आमचे अशिलांचे निदर्शनास कागदपत्रासह खालील पत्त्यावर आणून द्यावा. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व यदाकदाचित तशी असल्यास ती त्यांनी जाणिवपूर्वक सोडून दिली आहे असे समजून सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी अशी आहे अशी खात्री गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतीची जबाबदारी आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. १३/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. रेश्मा विवेक शाक्य**
बी.एस.एल., एलएल.बी., एलएल.एम.
रा. ३२ विद्यानगरी, नविन आर.टी.ओ.
ऑफिस जवळ, विजापूर रोड, सोलापूर
मो.नं. ७३५०२९५५०३
**(अशिल - कोमल प्रविण चव्हाण)**

---

## विक्री अधिकारी यांचे कार्यालय, बार्शी

**श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. बार्शी**
**पत्ता -** ७३९/७/१७ पाटील प्लॉट निकिता हॉटेल शेजारी, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर पिन -४१३४११
**संपर्क - ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६ / ९९०५३७५९५९**

जा.क्र. कायदा विभाग/१०/२०२६-२७ — दिनांक - ०९/०४/२०२६

### स्थावर मालमत्ता विक्रीसाठी विक्री सूचना

(बहुराज्यीय सहकारी संस्था नियम २००२ मधील नियम ३७ (११) व या मधील इतर तरतुदी पहा)

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ व नियमामधील तरतुदीनुसार कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकाऱ्याने जप्त केलेली स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहिर सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदार / जामीनदारांना नोटीस देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सदर कायद्यांतर्गत कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकारी यांनी कर्जदाराकडून / जामीनदारांकडून थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्वतःच्या नावाने असलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यात आला आहे. मालमत्ता जशा व जेथे आहेत तशा आणि ज्या परिस्थितीत आहेत तशा आणि ज्ञात व अज्ञात बोजा सह त्याची जाहिर लिलावाने विक्री करण्यात येत आहे. खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव सदर अधिनियम व त्या खालील नियमामधील अटी व शर्ती व नियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल. खाली स्थावर मालमत्तेचा तपशील, लिलाव विक्रीची तारीख, वेळ व ठिकाण देण्यात येत आहे. लिलाव खालील अटी व शर्तीवर करण्यात येईल.

| कर्जदार / जामीनदार /तारण मिळकतदार यांचे नाव पत्ता | दिनांक : १६/०२/२०२६ अखेर येणे बाकी | मिळकत क्रमांक | तारण स्थावर मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत | लिलावाचे ठिकाण, लिलाव तारीख, लिलाव वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| रमेश मुरलीधर बेळे मौजे -बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर | ७,९६,२१०/- दिनांक - ०९/०४/२०२६ अखेर येणे बाकी ८,३६,६०५/- | नगर भूमापान क्र. ७२४/२/० | २ मजली घर (Plot Area - 109.67 sqm & Built Up Area - 2110 SqFt) | रू. ४६,४४,३००/- | तारीख - ३० एप्रिल २०२६ वेळ - सकाळी ११.०० ठिकाण - संस्थेचे कार्यालय, के. टी. ट्रॅक्टर्स (कुबोटा) शोरुम बिल्डिंग, दुसरा मजला, लातूर रोड, बार्शी, जि. सोलापूर |
| निलेश चंद्रभान खळदकर मौजे बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | ७,९६,२१०/- | गट नं. - ५४४/३/३५ | | | |
| विनायक गजानन देशपांडे मौजे- बार्शी, जि. सोलापूर | ७,९६,२१०/- | गट नं. - ८९९/२/१ /३६ | | | |

सहदुय्यम निबंधक वर्ग - २ बार्शी
यांच्या मुल्यांकन प्रमाणपत्राप्रमाणे
जमिनीचा शासन दराप्रमाणे बाजार भाव दर रु. ३६,५३,६२२/-

खाजगी / संस्था नियुक्त मूल्यांकनकार
सूरज भारत गायकवाड B.E.(CIVIL), M.E (STRUCTURE) यांनी या मालमत्तेत बाजार भावाप्रमाणे दिलेली आजची किंमत बाजारभाव दर रु. ४६,४४,३००/-

तसेच दिनांक २३/०३/२०२६ रोजी लिलावाची तारीख नेमलेली होती परंतु लिलावाच्या दिवशी एकही इच्छुक बोलीदार लिलावाच्या वेळी उपस्थित राहीला नाही व कर्जदार यांचे वारस यांनी लेखी अर्ज देवुन थकीत रक्कम भरण्याबाबत मुदत मागीतली त्याप्रमाणे मुदत दिली परंतु मुदतीत थकीत रक्कम भरलेली नाही तात्पुरता स्थगित ठेवण्यात आला होता परंतु तुम्हाला नैसर्गिक न्यायतत्वावर मुदत देवुन देखील थकीत रक्कम भरली नाही. त्यामुळे तुमच्या मिळकतीचा पुन्हा लिलाव काढण्यात येणार आहे.

बहुराज्यीय सहकारी अधिनियम २००२ व नियम २००२ नुसार विक्रीसाठी वैधानिक २१ दिवसाची विक्री सूचना गहाणखत करणार / कर्जदारांना लिलावापूर्वी पुढील व्याजासह एकुण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जात आहे. तसे न झाल्यास वरील वेळापत्रकानुसार जप्त केलेली मालमत्ता विकली जाईल.

**सूचना** : सर्वांना असे ही सुचित करण्यात येते की, धनको / उपरोक्त संस्थेचे विक्री अधिकारी यांनी कर्जदार व जामीनदार यांना (ज्यांच्या मालमत्ता लिलावाने विक्री करावयाच्या आहेत त्यांना) नोंदणीकृत पोस्टाने नोटीसा पाठविल्या आहेत. ज्यांना नोटीस प्राप्त झाली. त्यांनी इतर कर्जदार व जामीनदार यांना त्याची कल्पना द्यावी. त्याच प्रमाणे व्यापक प्रसिद्धी म्हणुन ही नोटीस नामांकीत दैनिकांमध्ये देखील प्रकाशित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**: १) लिलावात भाग घेणाऱ्यांना / लिलाव बोली बोलणाऱ्यांना लिलाव सुरु होण्यापूर्वी राखीव किंमतीच्या १०% अनामत रक्कम भरावी लागेल. २) स्थावर मालमत्तेच्या राखीव किंमती पेक्षा कमी रक्कमत विक्री केली जाणार नाही. ३) ज्या व्यक्तीच्या नावे लिलाव पूर्ण होईल / जो व्यक्ती सर्वापेक्षा जास्त बोली बोलेल त्या व्यक्तीस लिलाव बोलीच्या २५% रक्कम लिलावाच्या नंतर त्याच दिवशी ताबडतोब भरावी लागेल किंवा बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील तरतुदीनुसार कालावधी दिला जाईल. लिलाव बोलीची बाकी राहिलेली ७५% रक्कम व मुद्रांक शुल्काची रक्कम विक्री कायम केलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत भरावी लागेल. न भरल्यास खरेदीदाराने भरणा केलेली २५% रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अशा परिस्थितीत खरेदीदाराचा संबंधित मालमत्तेवर कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. ४) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना स्थावर मालमत्तेची पाहणी संस्थेच्या कामकाजाच्या दिवशी आठवड्यातून दोन दिवस मंगळवार व बुधवार या दिवशी दुपारी ३ ते ४ च्या वेळेत करता येईल, त्याकरिता आमच्या शाखेचे शाखाधिकारी श्री. सूरज उत्तरेश्वर कुंभार मो.नं ९८८१९२६२९६, ८८०५३७५९५९ यांच्याशी संपर्क साधावा. ५) कोणतीही पूर्व सूचना न देता, लिलाव, विक्री स्थगित व रद्द करण्याचे अधिकार, विक्री अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. ६) वरील मालमत्तेवरील शेतसारा, नगर परिषद कर, लोकल कर, लाईट बिल व इतर करांची जबाबदारी खरेदीदारावर राहील. ७) स्थावर मालमत्तेची विक्री 'जेथे आहे, जशी आहे, जशा परिस्थितीत आहे तशी' या तत्त्वावर करण्यात येणार आहे. जर या मालमत्तेवर काही बोजा असेल तर त्यासह ही विक्री करण्यात येईल. ८) यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या अनुमोदनानंतर पूर्ण केला जाईल. ९) लिलाव प्रसंगी मोबाईल वापरण्यास प्रतिबंध राहील, तसेच बयाणा रक्कम भरलेल्या भागधारकांनाच प्रवेश देण्यात येईल. नियमांचे उल्लंघन, आर्थिक क्षमता, लिलावाच्या वेळी गोंधळ घालणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे इ. कारणास्तव कोणत्याही क्षणी लिलाव तहकूब करण्याचा अधिकार विक्री अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

**बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ अंतर्गत वैधानिक सूचना :-**

कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे अशी ही संधी देण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संस्थेची एकूण थकबाकी लिलावाची बोली बोलण्यापूर्वी अदा करावी. त्यात ते अयशस्वी झाल्यास तसेच थकबाकीच्या वसुलीसाठी विक्रीच्या रकमेतून वसूल न झाल्यास शिल्लक रक्कम जर असेल तर कर्जदार / जामीनदार यांच्याकडून शिल्लक पूर्ण येणे बाकी व पुढील व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल, याची नोंद घ्यावी.

टिप:- अधिक माहितीसाठी विक्री अधिकारी श्री. नवनाथ गुणवंत भोसले मो.नं. ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६
पत्ता : के. टी. ट्रॅक्टर्स (कुबोटा) शोरूम बिल्डिंग, दुसरा मजला, लातूर रोड, बार्शी. जि. सोलापूर. पिन - ४१३४११ यांच्याशी संपर्क करावा.

दिनांक : ०९/०४/२०२६
ठिकाण : बार्शी

**सही/-**
विक्री अधिकारी
(कलम - ९७ मधील तरतूदी प्रमाणे नियुक्त)
श्री भगवंत मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि, बार्शी

प्रतिलिपी : कर्जदार, जामीनदार, सर्व संबंधीतांना व नोटीस बोर्डवर डकवण्यासाठी
१) रमेश मुरलीधर बेळे (कर्जदार) रा. व्हनकळस प्लॉट, अलिपुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२) निलेश चंद्रभान खळदकर (जामीनदार) ४०६३, पाटील चाळ तुळजापूर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
३) विनायक गजानन देशपांडे (जामीनदार) नाना शेंडगे यांच्या घराजवळ, शेंडगे प्लॉट, उपळाई रोड, बार्शी
४) तहसिलदार - तहसिल कार्यालय, बार्शी जि. सोलापूर
५) बार्शी शहर पोलिस स्टेशन, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
६) मंडळ अधिकारी कार्यालय, अलिपुर रोड, बार्शी
७) ग्राम महसूल अधिकारी (तलाठी सज्जा कार्यालय) अलिपुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
८) उप-अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, बार्शी अलिपुर रोड, बार्शी.



## महत्त्वाचे

### फलंदाजांच्या एक पाऊल पुढे राहू इच्छितो : कृणाल

**मुंबई** : मी उसळी मारणारा चेंडू टाकण्याचे आधीच नियोजन करीत नाही; उलट आपल्या अंतप्रेरणेनुसार व फलंदाजांच्या एक पाऊल पुढे राहून चेंडू टाकू इच्छितो, असे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा फिरकी गोलंदाज-अष्टपैलू कृणाल पांड्या म्हणाला. इंडियन प्रीमियर लीगच्या सामन्यात आरसीबीने मुंबई इंडियन्सचा १८ धावांनी पराभव केला. या सामन्यात कृणालने चार षटकांत २६ धावांत एक बळी अशी अत्यंत किफायतशीर गोलंदाजी केली. आरसीबीने उभारलेल्या ४ बाद २४० धावांच्या विशाल धावसंख्येला प्रत्युत्तर देताना, मुंबई इंडियन्सला ५ बाद २२२ धावांपर्यंतच मजल मारता आली. एक गोलंदाज म्हणून, मला माझ्या कौशल्याच्या आणि मानसिक तयारीच्या बाबतीतही फलंदाजांच्या एक पाऊल पुढे राहायचे आहे. वेगवेगळ्या व नवीन गोष्टी करून पाहण्यापासून मी कधीच मागे हटलो नाही. कारण इम्पॅक्ट प्लेयर नियमामुळे, पूर्वीच्या काळात ६ किंवा ७ क्रमांकावर अष्टपैलू खेळाडू असायचे व फलंदाजीचा बाजही काहीसा वेगळा होता. पण आता ८ व्या क्रमांकावरही शुद्ध फलंदाज फलंदाजीला येत आहेत, असे कृणाल म्हणाला. ■

### हार्दिक पांड्या, टिम डेव्हिडला दंड

**नवी दिल्ली** : इंडियन प्रीमियर लीगमधील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व मुंबई इंडियन्स यांच्यातील २० व्या सामन्यानंतर, टिम डेव्हिड आणि हार्दिक पांड्या यांना आयपीएल आचारसंहितेच्या वेगवेगळ्या उल्लंघनांसाठी शिक्षा करण्यात आली आहे. आयसीसी कडून खेळणाऱ्या डेव्हिडला लेव्हल १ च्या गुन्ह्यासाठी त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आणि त्याला एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला. सामन्यादरम्यान डेव्हिडने पंचांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून नियमाचे उल्लंघन केले. या फलंदाजाने आपला गुन्हा कबूल केला आणि सामना रेफरीने दिलेली शिक्षा स्वीकारली. दरम्यान, त्याच सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. ■

# ईशान किशनची झंझावाती खेळी


## राजस्थान रॉयल्सविरुद्ध सनरायझर्स हैदराबाद ६ बाद २१६

◆ **हैदराबाद, १३ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी येथे राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात कर्णधार ईशान किशनने केलेल्या झंझावाती खेळीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादने मर्यादित २० षटकांत ६ बाद २१६ धावा उभारल्या आणि राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी २१७ धावांचे लक्ष्य ठेवले.

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने गत आरसीबीविरुद्धच्या सामन्याप्रमाणे पहिल्याच चेंडूवर सनरायझर्स हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्माला थर्ड मॅन रवी बिश्नोईकडून झेलबाद केले.

आयपीएलमध्ये पहिल्याच षटकात, पहिल्याच चेंडूवर बळी घेण्याची आर्चरची ही चौथी वेळ आहे. यापूर्वी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्धच्या सामन्यात त्याने पहिल्याच चेंडूवर फिल सॉल्टला जुरेलकडून झेलबाद केले. मोहम्मद शमीच्या नावावर सर्वाधिक (पाच) बळी आहेत. यावर्षी टी-२० मध्ये अभिषेक सात वेळा शून्यावर बाद झाला, त्याच्या शून्यावर बाद होण्याच्या घटनांची संख्या कोणत्याही खेळाडूसाठी सर्वाधिक आहे.




नंतर ट्रॅव्हिस हेडच्या मदतीसाठी कर्णधार ईशान किशन खेळपट्टीवर आला. हेडने ईशान किशनसोबत दुसऱ्या गड्यासाठी ४० चेंडूंत ५५ धावांची भागीदारी करून आपल्या सनरायझर्स हैदराबादला एक भक्कम पाया रचून दिला. रियान परागच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी हेडने १८ चेंडूंत १८ धावा केल्या. हैदराबादने सात षटकांत २ बाद ५६ धावा केल्या.

पुढे ईशान किशनने आपल्या लौकीकानुसार फलंदाजी करीत हैदराबादच्या धावसंख्येला आकार दिला. दरम्यान, हेनरिक क्लासेनची उत्तम साथ मिळाल्यामुळे ईशानने आपले अर्धशतकही पूर्ण केले, पुढे शतकामध्ये परिवर्तित करण्याच्या प्रयत्नात असतानाच त्याला संदीप शर्माने आपल्याच गोलंदाजीत त्याचा झेलबाद करून रोखले. ईशान किशनने अवघ्या ४४ चेंडूंत ९१ धावांची खेळी केली, यात त्याने ८ चौकार व ६ षट्कार खेचले. त्याने क्लासेनसोबत ८८ धावांची भागीदारी केली. त्यावेळी हैदराबादने १३.२ षटकांत ३ बाद १४३ धावा केल्या. पुढे क्लासेनने नितीश कुमार रेड्डीच्या साथीने संघाला १६२ धावांवर पोहोचवले, तेव्हा तुषार देशपांडेने क्लासेनला रियान परागकडून झेलबाद केले. क्लासेनने २६ चेंडूंत एक चौकार व ३ षट्कारांसह ४० धावांची भर घातली. नंतर जोफ्रा आर्चरने नितीश कुमारच्या रुपाने आपला दुसरा बळी टिपला. नितीश कुमारने १३ चेंडूंत २८ धावांची भर घालून संघाला दोनशे धावांच्या जवळपास आणले. डावाच्या अखेरीस झटपट धावा काढण्याच्या नादात अनिक वर्मा (६) धावबाद झाला, मात्र सलील अरोराने हर्ष दुबेच्या साथीने सनरायझर्स हैदराबादला मर्यादित २० षटकांत ६ बाद २१६ धावा रचून दिल्या. सलील अरोराने १३ चेंडूंत २ चौकार व २ षट्कारांसह नाबाद २४ धावांची खेळी केली. राजस्थान रॉयल्सकडून जोफ्रा आर्चरने २ बळी, तर संदीप शर्मा, तुषार देशपांडे, रियान परागने प्रत्येकी एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# चेन्नई केकेआरला तळाशी ठेवण्यास उत्सुक

◆ **चेन्नई, १३ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या हंगामात मंगळवारी एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) व कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

गत सामन्यातील अत्यंत आवश्यक विजयातून मिळालेला आत्मविश्वास कायम ठेवण्याचा सीएसकेचा प्रयत्न असेल. दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर सीएसकेने या हंगामातील आपला पहिला विजय नोंदविला. या सामन्यात सूर गवसलेल्या संजू सॅमसनने ५६ चेंडूंत ११५ धावांची शानदार शतकाचा व उत्कृष्ट गोलंदाजीचा समावेश होता.

पुन्हा तंदुरुस्त झालेल्या डेवाल्ड ब्रेविसमुळे सीएसकेला आपल्या गोलंदाजीच्या संयोजनात बदल करण्याची संधी मिळाली, त्यामुळे संघाला दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २१२ धावांचा बचाव करणे शक्य झाले.

**सॅमसनने केली वचनपूर्तता**

डावखुरा वेगवान गोलंदाज गुर्जपनीत सिंगने आपल्या आयपीएल पदार्पणात सर्वांना प्रभावित केले. जेमी ओव्हर्टननेही उत्कृष्ट कामगिरी केली व चार बळी मिळविले. डावखुरा फिरकी गोलंदाज अकील होसेनने पॉवरप्लेमध्ये गोलंदाजीला एक नवीन आयाम दिला. फलंदाजीत सॅमसनने सीएसकेसाठीच्या आपल्या पदार्पणाच्या हंगामात अखेर धावा जमवल्या आहेत. मात्र, सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाडला अद्याप आपली चमक दाखवता आलेली नाही.





**केकेआर पहिल्या विजयासाठी आतुर**

दुसरीकडे, केकेआर संघ या हंगामातील आपल्या पहिल्या विजयासाठी अत्यंत आतुर झाला आहे. लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात त्यांनी विजयाच्या अगदी उंबरठ्यावर मजल मारली होती; मात्र, मुकुल चौधरीने केलेल्या एका अप्रतिम व धडाकेबाज खेळीमुळे अजिंक्य रहाणे व त्याच्या संघाला विजयापासून वंचित राहावे लागले. ऑस्ट्रेलियन अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीनने लखनौविरुद्धच्या सामन्यात या हंगामात पहिल्यांदाच गोलंदाजी केली; मात्र, दोन षटकांत २८ धावांत१ बळी घेतले, त्यामुळे त्याची गोलंदाजी काहीशी महागडी ठरली. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**चेन्नई सुपर किंग्स वि. कोलकाता नाईट रायडर्स**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### धोनीच्या पुनरागमनाचे संकेत



**पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे महेंद्र सिंह धोनी काही आठवडे संघाबाहेर असेल असे स्पर्धेच्या सुरुवातीलाच अशी घोषणा करण्यात आली होती. गत सामन्यात, सीएसकेच्या या महान खेळाडूचे संघात पुनरागमन लवकरच होणार असल्याचे संकेत गायकवाडने दिले होते; त्यामुळे केकेआरविरुद्धच्या सामन्यात तो खेळतो की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.** ■

# मनोज कुमार जागतिक मुष्टियुद्धाचा पहिला भारतीय तांत्रिक अधिकारी

**नवी दिल्ली** : लेफ्टनंट कर्नल मनोज कुमार हा वर्ल्ड बॉक्सिंग या खेळाच्या आंतरराष्ट्रीय नियामक संस्थेचा खंडिय तांत्रिक प्रतिनिधी म्हणून पात्रता मिळवणारा पहिला भारतीय अधिकारी ठरला आहेत.

भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने (बीएफआय) या घडामोडीला दुजोरा दिला असून, राजेंद्रन रविंद्रननेही वर्ल्ड बॉक्सिंगची कॉन्टिनेंटल परीक्षा उत्तीर्ण केल्याचे जाहीर केले आहे. भारतीय बॉक्सिंग रिंगच्या आत व बाहेरही आपली छाप पाडत आहे. कर्नल मनोज कुमार व राजेंद्रन रविंद्रन या दोघांचेही वर्ल्ड बॉक्सिंगमधील त्यांच्या अलीकडील नियुक्त्या आणि यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन, असे बीएफआयने आपल्या समाज माध्यम खात्यांवर नमूद केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय टी-२० महिला क्रिकेटपटू होणार 'मालामाल'

● **आयसीसीकडून विक्रमी बक्षीस रकमेची घोषणा**
● **महिला टी-२० विश्वचषक विजेत्यांना मिळणार २.३४ दशलक्ष डॉलर्स**

◆ **दुबई, १३ एप्रिल**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) २०२६ च्या महिला टी-२० विश्वचषकासाठी ८,७६४,६१५ अमेरिकन डॉलर्सच्या विक्रमी बक्षीस निधीची घोषणा केली आहे. ही रक्कम २०२४ च्या स्पर्धेच्या तुलनेत १० टक्क्यांनी अधिक आहे.

ही रक्कम दोन वर्षांपूर्वी संयुक्त अरब अमिरातमध्ये झालेल्या स्पर्धेत सहभागी १० देशांमध्ये वाटण्यात आलेल्या ७,९५८,०७७ डॉलर्सपेक्षा जास्त आहे; याचे मुख्य कारण म्हणजे, ही स्पर्धा प्रथमच १२ संघांपर्यंत विस्तारली जात आहे. २०२६ च्या स्पर्धेत यजमान इंग्लंडसह ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, भारत, आयर्लण्ड, नेदरलॅण्ड, न्यूझीलंड, पाकिस्तान, स्कॉटलंड, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका आणि वेस्ट इंडीज हे संघ सहभागी होतील.



विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेटपटू

विजेत्या संघाला पुन्हा एकदा २,३४०,००० डॉलर्स मिळतील, तर उपविजेत्या संघाला १,१७०,००० डॉलर्स दिले जातील.

उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या संघांना ६,७५,००० डॉलर्स मिळतील आणि गट साखळी फेरीतील प्रत्येक विजयासाठी ३१,१५४ डॉलर्सचे बक्षीस दिले जाईल. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व १२ संघांना किमान २,४७,५०० डॉलर्सचे बक्षीस मिळण्याची हमी देण्यात आली आहे, असे आयसीसीने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)




# जिल्हा कराटे, ज्युडो व तायक्वांदो स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलचे वर्चस्व

## ३७ सुवर्ण, १४ रौप्य व ६ कांस्य पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

स्टुडंट्स ऑलम्पिक असोसिएशनच्या जिल्हास्तरीय कराटे, ज्युडो व तायक्वांदो स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलच्या खेळाडूंनी ३७ सुवर्ण, १४ रौप्य व ६ कांस्य पदकांची कमाई केली.

खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे स्टुडन्ट ऑलम्पिक सोलापूरचे सचिव नागेश शेट्टीकर, राज्याचे सचिव सुनील शिंदे व रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी आदींनी अभिनंदन केले.

यातून राज्य स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंची २ व ३ मे रोजी राजीव गांधी इंडोर स्टेडियम येथे होणाऱ्या स्पर्धेत भाग घेतील.

**खेळाडूंची कामगिरी :**

**तायक्वांदो : सुवर्ण :** बिंदूप्रिया कुने, अथर्व स्वामी, भावेश कुने, अजिंक्य गायकवाड, प्रथमेश मच्छा. **रौप्य :** श्रावणी गवळी, अंजनी राऊत, वैभवी अळगुंडगी, कार्तिक महांकाळ, विघ्नेश पुरड, सिद्धार्थ कुचन. **कांस्य :** तेजल रच्चा, श्लोक कटकम, स्वरा धोत्रे.

**कराटे : सुवर्ण:** श्वेता वंगारी, पल्लवी बिनगुंडी, श्रद्धा इपनप्पली, सई गोरे, भाग्यश्री मनीकोंडा, संध्या पुजारी, प्रवलीका कामूर्ती, संकल्प गोंड्र, सर्वेश गुल्लापल्ली, अथर्व बुरबुरे, सम्राट लक्का, श्रीयुग मोगे. **रौप्य :** आराध्या मासरेड्डी, भविष्या सिंदम, योगिता कुचन, तुषार हबीब, वेदांत सोमा, आरुष जेलजे. **कास्य :** स्वप्नाली जमादार, सुशांत कुचन, प्रज्वल जगताप.

**ज्युडो : सुवर्ण :** कोमल मनीकोंडा, वेदश्री गुडूर, दर्शनी सोमा, वर्षा अळगुंडगी, मान्यता रोहिटे, आदिती नल्ला, नव्या कुस्मा, जानवी म्हेत्रे, श्रद्धा सरवदे, गौरी माळी, योगिता सरवदे, सोनाक्षी माडे, दुर्वा रोहिटे, भावना गड्डम, ममता मंडल, ममता अलशेट्टी, चरण ठाकूर, वैभव माडे, श्रेयश जाधव, श्रवण भोसले. **रौप्य :** श्रावणी मिस्किन, कैवल्य जगताप

# खेळाडूंमध्येच नवीन भारताचा आत्मा : मांडविया

## पदकविजेत्या पॅरा तिरंदाजांचा सत्कार




◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

जागतिक पॅरा तिरंदाजी मालिकेतून विजेते म्हणून परतलेल्या भारतीय पथकाचे मी अभिनंदन करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश बदलत आहे. देश प्रगतीपथावर अग्रेसर आहे. एका नव्या भारताची उभारणी होत आहे. खेळाडूंमध्येच या नव्या भारताचा आत्मा वसलेला आहे, असे प्रतिपादन क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी केले.

सोमवारी येथे जागतिक पॅरा तिरंदाजी मालिकेतील पदक विजेत्यांचा क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

बँकॉक येथे पार पडलेल्या २०२६ जागतिक पॅरा तिरंदाजी मालिकेमध्ये भारताने आपल्या वर्चस्वपूर्ण कामगिरीची यशस्वी सांगता केली. ◂(वृत्तसंस्था)

# आर. वैशाली संयुक्तपणे आघाडीवर, दिव्या पिछाडीवर

### कॅण्डिडेट्स बुद्धिबळ

◆ **सायप्रस, १३ एप्रिल**

आपली आघाडी वाढवण्याची संधी गमावल्यानंतर भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. वैशालीवर आता दडपण असेल. ती जेव्हा येथील कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत (शेवटच्या आधीच्या फेरीत) चीनची माजी विश्वविजेती झोंगयी टॅन हिच्याशी दोन हात करेल.



वैशाली व झू या दोघीही प्रत्येकी सात गुणांसह संयुक्तपणे आघाडीवर आहेत, तर असाउबायेवा व मुझीचुक ६.५ गुणांसह त्यांच्या अगदी जवळ आहेत. रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिना व कॅटेरिना या जोडीचे गुण ५.५ आहेत, तर भारताची दिव्या देशमुख व टॅन या पाच गुणांसह आणखी काहीशा पिछाडीवर आहेत.

वैशालीला १२ व्या फेरीत धक्का बसला. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना तिला चीनच्या जिनर झू हिच्याकडून पराभव पत्करावा लागला. या विजयासह झू आता गुणतालिकेत वैशालीच्या बरोबरीने अव्वल स्थानी पोहोचली आहे. स्पर्धेतील शेवटच्या विश्रांतीच्या दिवसानंतर वैशालीला पुन्हा एकदा नव्याने सज्ज व्हावे लागेल. ही स्पर्धाच चीनची विद्यमान विश्वविजेती वेनजुन जू हिच्याविरुद्ध लढणाऱ्या आव्हानाचे (चॅलेंजरचे) भवितव्य निश्चित करणार आहे. या दोघीही आघाडीवर असलेल्या खेळाडूंच्या तुलनेत केवळ अर्ध्या गुणाने पिछाडीवर आहेत, त्यामुळे स्पर्धेचा शेवट अत्यंत रोमांचक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# कुर्डुवाडीत अत्याधुनिक इनडोर राइफल शूटिंग रेंजची सुरुवात

## सुवर्णपदक विजेते यशवंत शिंदे यांचे हस्ते उद्घाटन

**कुर्डूवाडी, दि. १३ एप्रिल-**

आदिशक्ती शिक्षण संस्थेच्या वतीने आदर्श सैनिक स्कुलमध्ये उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक १० मीटर इंडोर राइफल शूटिंग रेंजचे उद्घाटन जी. व्ही.माळवणकर, चँम्पियन सुवर्ण पदक विजेते यशवंत संजयमामा शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे, आर्किटेक्ट अजित पवार, सचिव दयानंद सुरवसे, एम.डी. पूजा सुरवसे, नगरसेवक प्रतिनिधी हरिचंद्र कांबळे, उद्योजक सिद्धेश्वर पाटील, प्रिन्सिपल बी. डी. राऊत, कोच आकाश गुजरे आणि क्रांती मॅडम यांची उपस्थिती होती.



क्रीडा क्षेत्रातील आव्हाने आणि संधी याविषयी श्री. शिंदे यांनी मार्गदर्शन करत कॅडेट्सना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविण्यासाठी प्रेरित केले. विविध राज्यांतून येऊन एकत्र राहण्याची संधी ही मोठी ताकद आहे. प्रत्येक राज्याची संस्कृती, परंपरा आणि विचार जाणून घेत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा.

यानंतर त्यांनी संस्थेतील रोबोटिक्स लॅब, लायब्ररी, पीसीबी लॅब, फुटबॉल, बास्केटबॉल ग्राउंड आणि हॉर्स टेबलची पाहणी करून संस्थेच्या आधुनिक सुविधा व शैक्षणिक दर्जाबद्दल समाधान व्यक्त केले.

# सरकार 'टॉप्स' योजनेत सुधारणा करणार

### अधिक पदके मिळवून देणाऱ्या खेळांवर लक्ष

◆ **नवी दिल्ली, १३ एप्रिल**

केंद्र सरकारची प्रमुख टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीममध्ये (टॉप्स) मोठी सुधारणा होणार आहे. निवडक खेळाडूंचे त्रैमासिक मूल्यांकन करण्याबरोबरच जलक्रीडा व सायकलिंगसारख्या जास्त पदके मिळवून देणाऱ्या खेळांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचा विचार केला जात आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी सांगितले.

सध्या, खेळाडूंचे मूल्यांकन सहामाही केले जाते व टॉप्सच्या कोअर व डेव्हलपमेंटल गटांमध्ये एकही सायकलपटू नाही, तर डेव्हलपमेंटल गटाच्या यादीत केवळ एक जलतरणपटू आहे.



टॉप्स योजनेतील खेळाडूंची संख्या सध्या ३९९ आहे (कोअर ५१, कोअर पॅरा ६२, डेव्हलपमेंट १६६, टार्गेट एशियन गेम्स ग्रुप ५७, हॉकी ६३). मागील वर्षीच्या २४५ च्या तुलनेत यात लक्षणीय वाढ झाली आहे, असे त्यांनी नमूद केले.

पुढील लक्ष्य २०३२ पर्यंत टॉप्स खेळाडूंचा समूह ३ हजार खेळाडूंपर्यंत वाढविणे आहे, यात कोअर टू डेव्हलपमेंट गुणोत्तर १:५ राखले जाईल. २०३६ पर्यंत ही संख्या ५००० खेळाडूंपर्यंत वाढवली जाईल, असे त्यांनी सांगितले.

**जलक्रीडा, सायकलिंग व रोइंगकडे धोरणात्मक बदल**

या विस्तार योजनेमागे जलक्रीडा, सायकलिंग, रोइंग आणि जिम्नॅस्टिक्स हे खेळ प्रमुख असतील. ऑलिम्पिक खेळांमध्ये या खेळांमधून मोठ्या संख्येने पदके मिळत असल्यामुळे, सरकार या खेळांवर लक्ष केंद्रित करण्याच्या योजनेबद्दल वृत्तसंस्थेने जानेवारीमध्ये वृत्त दिले होते. जलक्रीडा, ज्यामध्ये जलतरण, डायव्हिंग, वॉटरपोलो, कलात्मक जलतरण व ओपन वॉटर स्विमिंगचा समावेश आहे, २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये ३६ खेळांमध्ये मिळणाऱ्या एकूण ३५० हून अधिक पदकांपैकी ५५ पदके देईल, परंतु भारताला यापैकी एकही पदक मिळण्याची शक्यता नाही. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पाटबंधारे विभागाच्या गलथान कारभारामुळे पिके जळाली; शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१३ एप्रिल-**

वेळापूर-माळखांबी मायनर नीरा कॅनॉलवरील पिके जळाली आहेत. नीरा उजवा कालवा विभाग फलटण मार्फत चालू उन्हाळा हंगाम १ मार्च ते ३० जूनपर्यंत शेती सिंचनासाठी जाहीर प्रकटन करून लाभधारक शेतकऱ्यांना पाणी मागणी करण्याबाबत कळवल्यावरून अनेक शेतकऱ्यांनी रोखीने पाणी पट्टी भरून रीतसर पाणी मागणी केलेली आहे चालू उन्हाळा हंगामासाठी पहिले आवर्तन दि. ४ मार्चपासून सुरू करण्यात आले आहे. कालव्याला ४१ दिवस झाले आहेत.

पंढरपूर, सांगोला, माचनूर उपविभाग माळशिरस, फलटण या सर्व विभागांना प्राधान्याने पाणी सोडण्यात आले आहे. माचनूर विभागातील वेळापूर शाखा अंतर्गत क्षेत्रास मुद्दाम उशिरा व कमी दाबाने पाणी सोडण्यात आले आहे. शेजारी माळशिरस विभागातील खंडाळी ब्रांचला सुरुवातीला पूर्ण दाबाने पाणी देऊन महाळुंग व खंडाळी शाखे अंतर्गतचे सिंचन ४ मार्च ते २३ मार्चपर्यंत १९ दिवसांतच पूर्ण केले आहे. वेळापूर शाखा अंतर्गत वितरिका क्रमांक चार वरील डी फोर कॅनलला २३ मार्च पासून पाणी देण्यात आले आहे. मात्र वितरिका क्रमांक चार वरील माळखांबी मायनर फाट्याला पाणी सोडण्याबाबत गेली पंधरा दिवस झाले तरी ही शेतकऱ्यांनी



विनंती करून नही दिनांक ११ एप्रिल रोजी मुद्दाम कमी दाबाने पाणी सोडले आहे माळखंबी मायनर कॅनल वरील सिंचन होण्यास २५ ते ३० दिवस लागणार असल्याने हेड कडील पिके पाण्याअभावी जळून पूर्ण नष्ट होणार आहेत व मुळातच पाणी उशिरा सोडल्याने व उन्हाची तीव्रता वाढल्याने सध्या पिके जळाली आहेत आत्ता पाणी देऊनही उपयोग होणार नाही उलट वेळापूर शाखेंतर्गत असणाऱ्या डि फोर कॅनलला पाणी सोडून २२ दिवस झाले आहेत. डि फोर कॅनलवरील १०० पेक्षा जास्त शेतकरी सायपन द्वारे बेकायदेशीर पाणी वापर करीत आहेत तसेच विहरी मध्ये तळ्यामध्ये पाणी सोडून भरून घेत आहे त्याकडे पाटबंधारे विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याचे लक्ष नसून त्यांच्याच कृपेने कालव्यालगतचे शेतकरी बेकायदेशीर पाणी वापर करत आहेत. यावेळी शाखाधिकारी यांना समक्ष बेकायदेशीर पाण्याची परिस्थिती दाखवली ते मूग गिळून गप्प बसत आहेत.

उलट माळखांबी मायनरला डिफोर बरोबर पाणी देणे गरजेचे असताना सदर कॅनलला पाणी लवकर न दिल्या मुळे माळखांबी मायनर क्षेत्रातील पिके पाण्याअभावी जुळून जाऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, रोखीने पाणीपट्टी भरून रितसर पाणी मागणी करुन माळखांबी मायनर शेतकर्यांना पाणी देण्याबाबत गेली १२ ते १३ वर्ष वेळापूर पाटबंधारे खाते अन्याय करत आहे. प्रत्येक निवडणुकीच्या काळात लोकप्रतिनिधी अन्यायाबाबत अश्वासन देऊन दिशाभूल करतात मात्र निवडणूक झाल्यानंतर येरे माझ्या मागल्या प्रमाणे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडतात व दिलेली आश्वासने विसरतात माळखांबी मायनर कॅनलवरील अन्याय बाबत शेतकरी विनंती अर्ज उपोषणे निवेदन सर्व प्रकारे विनंती करूनही शेतकऱ्यांना आश्वासनाशिवाय काय मिळत नाहीअसे सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महादेवभाऊ ताटे यांनी पाण्याबाबतचे व्यथा सांगताना व्यक्त करुन महादेव ताटे म्हणालेकी पाटबंधारे खात्याचा सततच्या अन्यायाविरुद्ध व संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध मी न्यायालयात दात मागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## अवैध सावकारीवर सहकार विभागाचा 'सर्जिकल स्ट्राईक'

### सोलापुरात महिलेविरुद्ध गुन्हा; बापूजी नगरात छापा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

शहरातील अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी सहकार विभागाने कठोर पावले उचलत बापूजी नगर परिसरात छापा टाकून एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे खाजगी सावकारीच्या वाढत्या प्रकारांवर प्रशासनाने लक्ष केंद्रीत केल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड व उपनिबंधक डॉ. प्रगती बागल यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार विभागाच्या पथकाने ही कारवाई केली. पथक प्रमुख राजू नरहरी ढोणे, सहाय्यक सहकारी अधिकारी स्वप्निल वट्टे व के. बी. जमादार यांनी अर्जदार गुरुगंगा बनसोडे यांच्या तक्रारीवरून ९ एप्रिल रोजी बापूजी नगर, स्लॉटर हाऊस परिसरात छापा टाकला.

झडतीदरम्यान श्रीमती लक्ष्मी मौलाली गाडे यांच्या निवासस्थानी अवैध सावकारीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे आढळून आली. तपासात संबंधित महिला कोणतीही वैध परवाना न घेता सावकारी व्यवसाय करत असल्याचे निष्पन्न झाले.या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत कलम ३९ व ४१ नुसार सदर बझार पोलिस ठाण्यात १० एप्रिल रोजी शासकीय फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

शहरात अवैध सावकारीच्या वाढत्या प्रकरणांमुळे नागरिकांचे आर्थिक शोषण होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर अशा प्रकारांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### हत्तूर येथे ऊसतोड कामगार नोंदणी नेत्र तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**हत्तूर, दि. १३ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सहकार क्षेत्रात योगदान देणाऱ्या हत्तूर येथील श्री स्वामी समर्थ परिवाराच्या वतीने लिं. यशवंत कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ २६७ ऊसतोड कामगारांसाठी मोफत नोंदणी करण्यात आले. त्यामुळे या कामगारांना शासनाकडून विविध योजनांचे लाभ मिळण्यास मदत होणार आहे. तसेच २७३ जणांची त्यांची नेत्र तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले. हत्तूर येथील राजेंद्र कुलकर्णी यांनी श्री स्वामी समर्थ बँक, पतसंस्था, सहकारी संस्था स्थापन केली असून या संस्थेच्या माध्यमातून आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला गेला. शिबिराची सुरुवात समर्थ कुलकर्णी यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर परिवाराचे प्रमुख राजेंद्र कुलकर्णी, सरपंच ज्योती कुलकर्णी, प्रा. सिद्राम म्हेत्रे, बम्मनिंगय्या स्वामी, भीमाशंकर कनपवडीयर, सिकंदर नदाफ, ज्योत्यप्पा सिनेवडीयर, बाबुराव नारायणे, बशीर शेख, सिद्धाराम कानडे, बनसिद्ध पटेवडियर, भीमाशंकर छप्पेकर, महादेव कांबळे, गनी शेख, शिवानंद हावडे पाटील, विठ्ठल हतूरे, प्रकाश निबंर्गी, वासु नाईकवाडे, शिवानंद निरवणे, भीमाशंकर कुलकर्णी, महातप्पा सिताफळे उपस्थित होते.



### लष्कर मध्यवर्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाच्यावतीने महात्मा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

लष्कर मध्यवर्ती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. जुनी मिल कंपाऊंड येथील त्यांच्या पुतळ्यास महामंडळाचे अध्यक्ष रमेश कसबे व नगरसेवक नरसिंह आसादे यांच्या हस्ते हार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी अंबादास मोतेकर, अंबादास मरेड्डी, विश्वजीत लिंगराज, कुमार नंदा, कृष्णा मुकारे, लखन गायकवाड, पंकज ढसाल, अभिजीत भंडारे, दत्ता कोपलवार, हणमंतु भंडारे, दुर्गादास कोलूर उपस्थित होते.



### जागृत मारुती देवस्थानच्यावतीने चार हजार जणांना महाप्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**

शेळगी रोड येथील जागृत मारुती देवस्थानच्या वतीने हनुमान जन्मोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी पहाटे पाच वाजता पाळणा व मूर्तीस अभिषेक करण्यात आले. तद्नंतर चार हजार जणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी व औषध मोफत देण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात पुराणिक स्वामी यांनी मूर्तीस अभिषेक करुन केली. महात्मा बसवेश्वर ब्लड बँक व आधार हॉस्पिटलच्या स्टाफकडून सेवा देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मल्लिकार्जुन तोटद व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## 'घटस्फोट', 'लग्नाळूंच्या अपेक्षा' एक सामाजिक वास्तवावर चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १३ एप्रिल-**

आधुनिक जीवनशैलीमुळे घटस्फोट घेण्यामध्येही वाढ झाली आहे. तसेच 'अपेक्षांमुळे' लग्न जुळत नसल्याने लग्नाळूंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. 'सध्या' लग्न म्हणजे एकप्रकारे इव्हेंट' झाल्यासारखे वाटते.

पद्मशाली समाजासह इतर समाजातही ही एक सामाजिक गंभीर वास्तव प्रश्न कुठेतरी थांबला पाहिजे या हेतूने श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघम आयोजित आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्याने शनिवार दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ठीक ५.३० वाजता कन्ना चौक जवळील पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या विणकर सभागृहात चर्चासत्राचे (मंथन) आयोजन केले आहे.

या चर्चेत भाग घेण्यासाठी पद्मशाली समाजातील सूज्ञ, प्रतिष्ठित, बुद्धीजीवी आणि ज्यांच्याकडे अनुभवाचे भांडार असलेल्या बंधू- भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले मत व्यक्त करावे. चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी पुणे येथून काही समाज बांधव येत आहेत. ज्यांना या चर्चासत्रात सहभागी होण्याची इच्छा असूनही येऊ शकत नाहीत किंवा वेळ जमत नसेल त्यांनी वर्षा रबर स्टँप, १३०४ भद्रावती पेठ, सोलापूर-५. या पत्त्यावर थोडक्यात लिहून पाठवावेत. असेही आयोजकांच्या वतीने कळवण्यात आले.

## सरपंच पदासाठी कोळेगावला सात तर लो. मोहितेवाडीला चार अर्ज

**माळशिरस, दि.१३ एप्रिल-**

तालुक्यातील कोळेगाव व लोंढे मोहीतेवाडी ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी तर कोळेगाव, पानीव, इस्लामपूर प्रत्येकी एका सदस्यासाठी पोटनिवडणूक होत असून आज अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसा अखेत कोळेगाव थेट सरपंच पदासाठी सात अर्ज, लोंढे मोहीतेवाडी थेट सरपंच पदासाठी चार अर्ज, कोळेगाव एका सदस्य जागेसाठी तीन अर्ज, पानीव एका जागेसाठी एकच अर्ज, तर इस्लामपूर एका जागेसाठी दोन अर्ज दाखल झाले आहे. पानीव एका सदस्य जागेसाठी एकच अर्ज असल्याने हि जागा बिनविरोध होणार आहे. अर्जाची छाननी १५ एप्रिल तर माघार १७ एप्रिल रोजी असून माघार नंतर या पोटनिवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार असून मतदान २८ एप्रिल तर मतमोजणी २९ एप्रिलला होणार असल्याची माहिती तहसीलदार सुरेश शेजूळ यांनी दिली यावेळी निवडणूक विभागाचे दशरथ माळी उपस्थित होते.

## इंटरनेट केबलचे नियमबाह्य खोदकाम जीवावर बेतले

### ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. १३ एप्रिल-**

इंटरनेट केबल टाकण्यासाठी मुंबई येथील एका खासगी कंपनीकडून करमाळा तालुक्यात नियमबाह्य व बेकायदेशीर रस्ता खोदण्याचे काम सुरू असून, या बेफिकीर ठेकेदारामुळे निमगाव हवेली येथील ॲड. बालाजी इंगळे गंभीररीत्या जखमी झाले आहेत. डांबरी रस्त्यावर मुरूम टाकल्याने त्यांची मोटारसायकल स्लिप होऊन हा अपघात झाला असून, ते अजूनही शुद्धीवर आलेले नाहीत. हायवे रस्त्यावर असलेल्या मुरूमा मुळेच हा अपघात झाला असल्याचा आरोप मकाई साखर कारखान्याचे संचालक सतीश निळ यांनी केला आहे.

सदरचा अपघात दि. ५ एप्रिल रोजी करमाळा सालसे रोडवरील वायकुळे पाटील वस्ती जवळ घडला आहे. मुरूमावरून मोटार सायकल स्लिप होऊन खोदलेल्या चारीत गेली काही प्रत्यक्षदर्शींनी सतीश निळ यांना सांतगीले आहे. अपघातापासून इंगळे बेशुद्ध अवस्थेत असून बार्शी येथील भगवंत हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर सतिश निळ यांनी जिल्हाधिकारी सोलापूर, तहसीलदार करमाळा व पोलीस निरीक्षक करमाळा यांना निवेदन दिले आहे. संबंधित ठेकेदाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. गुन्हा दाखल न झाल्यास पूर्व भागातील ग्रामस्थांसोबत तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसू, असा इशारा निळ यांनी दिला आहे. ठाकरे गटाचे युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी देखील अनेक वेळा या नियमबाह्य कामांबाबत आवाज उठवला होता. संबंधित विभागाकडे तक्रारीही केल्या होत्या. मात्र वारंवार या ठेकेदारांना पाठिशी घातले जात आहे, आज हे नियमबाह्य काम व प्रशासनाची खाबुगिरी एका वकिलाच्या जीवावर उठली आहे. आत्ता तरी प्रशासन जागे होणार का? लोकांचे जीव यांच्या लेखी इतके स्वस्त आहेत का? असा संतप्त सवाल फरतडे यांनी विचारला आहे.

## बोधीवृक्ष फाऊंडेशनतर्फे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**

बोधीवृक्ष फाऊंडेशन मार्फत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध समाजपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पार्क चौक येथे सर्वधर्म समभाव कार्यक्रमांतर्गत We are Indiand, Firstly and Lastly या थिमवर सामाजिक ऐक्य समभाव कार्यक्रम व सेल्फी पॉइंटचे अनावरण सकाळी ९ ते दुपारी १२ पर्यंत. बोधीवृक्ष फाऊंडेशनच्या सदस्यांचे मरोणोत्तर नेत्रदान : १४ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे या नेत्रदान अभियानात सहभागी होण्यासाठी सुकन्या रामनवर (९५५२२८७३०) या क्रमाकांवर संपर्क साधावा. दि. १५ ते १७ एप्रिल या कालावधीत विविध जयंती उत्सव मंडळांना भेटी देवून महापुरुषांच्या जीवनावर आधारित प्रश्न मंजूषा घेवून बक्षीस स्वरुपात शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

१७ एप्रिल रोजी बोधीवृक्ष फाऊंडेशनच्या ग्रीन बँक, रोपवाटिका उद्घाटन सामरंभ जुळे सोलापुरातील ओम गर्जना चौकात होणार आहे.



## आयडीई बूटकॅम्पचा समारोप

### विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना नवी दिशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल -**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे आयोजित पाच दिवसीय 'इनोव्हेशन, डिझाईन अँड एंटरप्रेन्योरशिप (IDE) बूटकॅम्प२०२६ चा शुक्रवारी उत्साहात समारोप झाला. ६ ते १० एप्रिल दरम्यान झालेल्या या बूटकॅम्पमध्ये विद्यार्थ्यांच्या नवकल्पना आणि स्टार्टअप संकल्पनांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल यांच्या पुढाकारातून, वाधवानी फाऊंडेशन आणि SBI फाउंडेशन यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या बूटकॅम्पसाठी सिंहगड संस्थेची राष्ट्रीय स्तरावर 'नोडल सेंटर' म्हणून निवड करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सौरभ निर्मले यांनी विद्यार्थ्यांना नवकल्पनांच्या माध्यमातून समाजातील समस्यांवर उपाय शोधण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे डॉ. व्ही. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी स्टार्टअप संस्कृती आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली.

वाधवानी फाउंडेशनच्या मास्टर ट्रेनर पल्लवी बिरादार यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमास कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, संशोधन संचालक प्रा. एस. एच. पवार आदींची उपस्थिती होती. बूटकॅम्पमध्ये विद्यार्थ्यांनी सामाजिक व औद्योगिक समस्यांवर आधारित विविध प्रकल्प सादर केले.

यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. सुनील शाखापुरे व डॉ. मुदस्सर नाईकवाडी यांनी संयोजनाची धुरा सांभाळली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**निवड झालेले प्रकल्प**

फिक्स फर्स्ट (श्री रामकृष्ण कला व विज्ञान महाविद्यालय, कोयंबतूर), फिजिओ बडी व इकोब्रिक (वालचंद तंत्रज्ञान संस्था, सोलापूर), रूरल रिअल्ट (सार्वजनिक अभियांत्रिकी महाविद्यालय, सूरत) आणि मत्स्य एआय (आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्था, पुणे) या पाच प्रकल्पांची पुढील स्पर्धे साठी निवड करण्यात आली.

## निधन वृत्त...

### विजय खडतरे

**सांगोला, दि. १३ एप्रिल-**



सांगोला शहरातील खडतरे गल्ली येथील रहिवासी विजय रमेश खडतरे (वय-५०) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी दुपारी राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, चुलते, चुलती, बहीण, पुतणे असा मोठा परिवार आहे.

### जालिंदर बनकर

**करकंब, दि. १३ एप्रिल-**



बार्डी (ता. पंढरपूर) येथील जालिंदर गोविंद बनकर (वय ७०) यांचे खासगी रुग्णालयात उपचार चालू असताना अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, दोन मुले, तीन मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. सरपंच कै. सुगरण माळी यांचे ते पती होत.

### गोरख कांबळे

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**



येथील रमापती चौकातील रहिवासी गोरख शंकर कांबळे यांचे सोमवारी अल्प आजाराने निधन झाले आहे. मृत्यू समयी ते ७५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून नातवंडे असा परिवार आहे. श्रमिक पत्रकार संघातील कर्मचारी प्रशांत कांबळे यांचे ते वडील होत.

## हन्नुर येथे बैलगाडा शर्यतीचा थरार

### १२६ बैलजोड्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ एप्रिल-**

हन्नुर (ता.अक्कलकोट) येथे बळीराजाच्या आवडीचा व अंत्यत जिव्हाळ्याचा बैलगाडा शर्यतीचा थरार संपन्न झाला. राज्यभरातून १२६ बैलजोडयांनी सहभाग घेतला. हन्नुर केसरीचा मानकरी सुमारे आडीच लाखाचे पहिले बक्षिस श्री सिध्देश्वर ग्रुप तोळनुर किरण पाटलांच्या सर्जाने व परभणीच्या सुंदरने पटकाविला. दुसरा क्रमांक तात्यासाहेब कचरे कचरेवाडी, अमोल पष्टे बदलापूर : तिसरा क्रमांक कलप्पा पुजारी हन्नुर चौथा क्रमांक अक्षय काका सिध्द माळशिरस : पाचवा क्रमांक बाळासाहेब शिंदे पंढरपूर, सहावा



क्रमांक बाबू ड्रायव्हर चप्पळगाव यांनी पटकाविला. आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ठ बैलगाडा शर्यतीचे आयोजन करणारे पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी सलग पाचव्य ावर्षी अक्कलकोटवासीयांना उत्कंठावर्धक बैलगाडा शर्यत थरार अनुभवण्याची संधी देत आहेत. तालुकावासीयांतून आनंद व्यक्त होताना दिसत आहे. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक बहाल करण्यात आले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी व बंधू उपसभापती सागर कल्याणशेट्टी गोवंश संवर्धनाचे मोठे कार्य करीत आहेत. बैलगाडा शर्यतीसाठी मोठी बक्षीसे मैदान उत्कृष्ट नियोजन राज्यातून बैलगाडा शर्यतीकरिता मिळळणारा प्रतिसाद व शेतकऱ्याप्रती त्यांची असलेली आत्मियता खरोखरच त्यांचे कार्या नंबरवन आहे, असे गौरवोद्गार भाजपा कार्यकारणी सदस्य शहाजी पवार यांनी यावेळी काढले.

आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, शहाजी पवार, जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, अंजली बाजारमठ, नगरसेवक बिज्जू प्रधाने, संयोजक सागर कल्याणशेट्टी उपस्थित होते. स्पर्धेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून बैलगाडा शौकीन हन्नूरमध्ये दाखल झाले होते.

संभाजीनगर, धाराशिव, सातारा, पुणे, मुंबई, दापोडा-भिवंडी, परभणी, माळशिरस, सांगोला, बुलढाणा, पंढरपूर, माढा, मोहोळ येथून १२६ बैलजोड्यांनी सहभाग घेतला होता. उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांची शेतकऱ्यांप्रती असलेले मोठे प्रेम आत्मियता यामुळे सलग पाच वर्ष उत्कृष्ठ नियोजनद्वारे ही स्पर्धा राबवित आहेत. शेतकऱ्याच्या उन्नतीसाठी अधुनिक शेती कृषी प्रदर्शन भरवावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.





























**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मेंदूविकार तपासणी शिबिरात ७६ रुग्णांवर मोफत उपचार

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, दिव्यांग सक्षमीकरण व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने थे दिव्यांगजनांसाठी मेंदूविकार अहमदपूर तालुक्यातील किनगाव आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यात ७६ जणांवर उपचार करण्यात आले. तसेच तीन महिन्यांच्या औषधींचेही वाटप करण्यात आले.

संवेदना प्रकल्प हरंगुळ (बु) यांच्या सहकार्याने व जिल्हा परिषदेचे सीईओ राहुलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. उद्घाटन मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. देवाशिष रूईकर, माजी जिल्हा परिषद सदस्य त्र्यंबक गुट्टे, प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जाधव, डॉ. विठ्ठल घुगे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यवस्थापक बसवराज पैके यांची उपस्थिती होती.

शिबिरात लातुरातील मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. देवाशिष रुईकर यांनी रुग्णांची तपासणी करुन उपचार केले. शिबिरात ११० दिव्यांग रुग्णांची तपासणी करण्यात आली.



## विविध वृत्त...

### पत्नीवर तलवारीने हल्ला

लातूर : स्वतःच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत आरोपी पतीने पत्नीच्या डोक्यात तलवारीच्या चपट्या बाजूने डोक्यात मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना लातूरजवळील कळंब रेल्वे गेटजवळील विकासनगर भागात रविवारी (दि.१२) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास घडली.

आरोपी शंकर वसंत श्रीमंगले (वय ४२ रा. सेलू जवळगा, ता. रेणापूर हा. मु. कळंब रेल्वे गेट, विकास नगर, लातूर) हा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर वारंवार संशय घेत होता. याच रागतून रविवारी (दि.१२) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास त्याने तलवार सोबत आणली होती. त्याने पत्नीच्या डोक्यात तलवारीच्या चपट्या पात्याने मारून गंभीर जखमी केले.

याप्रकरणी पीडितेचा लहान भाऊ गणेश सुभाष श्रीमंगले (रा. साळे गल्लीहनुमान जवळ, लातूर) यांच्या फिर्यादीवरून आरोपी शंकर श्रीमंगले याच्याविरोधात गुरनं. १९०/२६ कलम ११८ (१), ३५२ (२) व सहकलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल सिद्राम धोपटे करीत आहेत.

### शिवसेनेतर्फे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांचे स्वागत

लातूर : नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांचे स्वागत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, जिल्हा महिला संघटीका डॉ. न शोभा बेंजरगे, उपजिल्हा प्रमुख न बालाजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे तालुका प्रमुख शंकर रांजणकर, शहर प्रमुख शिवराज मुगावकर, माधव कलमुकले, महानगर संघटक रवी पिचारे, विधानसभा न प्रमुख राजू कतारे, विधानसभा समन्वयक सोमनाथ झुंजारे, विष्णू कांबळे, उपतालुका प्रमुख मारूती सावंत, सिद्धेश्र्वर जाधव, अहमदपूर तालुका संघटक अनिकेत फुलारी, सारंग आगलावे, पांडुरंग परीट, महेश आगलावे, विष्णू गायकवाड, शहर संघटक प्रदीप उपासे, समन्वयक संतोष माने, सोशल मीडिया प्रमुख अजय घोणे, उपशहर प्रमुख सुरेश शिंदे, विखार देशमुख, अजय क्षीरसागर व शिवसैनिक उपस्थित होते.

### कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने रक्तदान शिबीर

लातूर : सम्राट अशोक, म. ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत्यांचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, संविधान स्तंभाच्या बाजूस सकाळी ८ ते सायंकाळी ५ दरम्यान, रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

या रक्तदान शिबिरास विविध विभागांतील कर्मचारी, मित्र परिवारातील सदस्य, रक्तदाते व सामाजिक चळवळीतील सर्व शिलेदारांनी उपस्थित राहून रक्तदान करावे. रक्तदान करून गरजवंतांना जीवदान द्यावे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. १४ एप्रिल रोजी आयोजिलेल्या शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष मस्के, राहुल गायकवाड, महेश कांबळे, डी. एस. नरसिंगे, संजय राऊत, छगन घोडके, सतीश मानकुसकर, तुकाराम बलांडे, बळीराम भोगे, बाबासाहेब इंगळे, विशाल जोगदंड, तुळशीराम घोडके, यशवंत सूर्यवंशी, जगन्नाथ ठोंबरे, संजयकुमार सूर्यवंशी, दिलीप गायकवाड, राजकुमार गुंजरगे, महिला आघाडीच्या सुनीता कांबळे, सरोजा भोसले, शीला उघाडे, रंजिता शिंदे, पंचशिला मस्के, जयश्री बनसोडे, वैशाली कांबळे, वनमाला उघाडे, सुरेखा गायकवाड यांनी केले आहे

### डॉ. शिरसीकर यांची ४५० किमी शांतीधम्म पदयात्रा

लातूर : नुकत्याच झालेल्या गुलबर्गा बुद्ध विहार ते हैदराबादमार्गे बुद्धवनम नागार्जुन सागर या शांती धम्म पदयात्रेत होल्डिंग हँड्सचे संस्थापक अध्यक्ष तथा लातूरचे सुपुत्र डॉ. सुरेश शिरसीकर यांनी ४५० किलो मीटरचे अंतर पार केले.

शांती, करुणा आणि मैत्री या पदयात्रेचा संदेश होता. ही शांती पदयात्रा गगन मलिक फाउंडेशन आणि थायलंडच्या दोन संस्थांनी आयोजित केली होती. यात पाच देशातील भिक्खूगण सहभागी झाले होते. थायलंड, व्हिएतनाम कंबोडिया, इंग्लंड, अमेरिका आणि भारत अशा शंभर भिक्खूंचा समावेश होता. गुलबर्गा–कमलपूर–हुमनाबाद–मन्नाखेली–सांगारेड्डी–हैदराबाद–चिंतापल्ली–बुद्धवनम असा मार्ग होता रोज १६, १८ व २३ किलो मीटरचे विश्रांतीचे टप्पे ठेवले होते.

दक्षिणेच्या तापत्या उन्हात यांच्य समवेत डॉ. शिरसीकर यांनी ही ४५० किलो मीटरचे अंतर पार केले. यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिथ शांती, करुणा, मैत्री, प्रेम, माणुसक आणि संविधानाचा संदेश असेल तिथ नेहमीच होल्डिंग हँड्स सहभागी होऊन पाठिंबा देईल, होल्डिंग हँड्सचा उद्देशच्च मानवता आहे, असे डॉ. शिरसीकर यांनी सांगितले. पदयात्रेचे उद्घाटन काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरग यांच्या पत्नी राधाबाई खरगे, तेलंगणाचे खनिजमंत्री व्यंकय्या स्वामी यांच्य हस्ते झाले. समारोपाला व्यंकय्या स्वामी उपस्थित होते.

## दोन वर्षात शंभर टक्के शेत रस्ते पक्के होणार : आ. रमेशअप्पा कराड

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यात प्रत्येक मंडळात २५ किलोमीटर रस्त्याचे काम हाती घेतले घेतले जाणार असून येत्या दोन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातला एकही शिव रस्ता शिल्लक राहणार नाही सर्व रस्ते मजबूत होतील असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातील समाधान शिबिरात येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे समाधानाच झाले पाहिजे अडीअडचणी, तक्रारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी केले.



छत्रपती शिवाजी महाराज महारजस्व अभियान अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते सोमवारी झाले. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्या सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, जिप सदस्य महादेव साळुंके, मंडल अध्यक्ष उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भादा गावचे उपसरपंच बालाजी शिंदे, सहा. गटविकास अधिकारी मनोज राऊत, तालुका कृषी अधिकारी दत्ता हाके, महावितरणचे आर. एम. शेंडे, महिला व बालविकास विभागाच्या मंदाकिनी हिरके, महादेव गुरुशेट्टे, रविंद्र पाटील, देवराव मोहिते, गिरिधर पवार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी अनेक गावचे सरपंच नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या केंद्र आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम सरकारच्या माध्यमातून होत आहे. शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी समाधान शिबिर हा एक त्याचाच भाग आहे. शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे बोलून दाखवले.

समाधान शिबिराचा निश्र्चितपणे अनेकांना लाभ मिळेल फायदा होईल नागरिकांनी आपल्या तक्रारी अडीअडचणी प्रश्र्न शिबिरातील संबंधिताकडे मांडावेत दोन दिवसात निकाली निघतील असे सांगून आ. रमेशअप्पा कराड यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्याकडून योजनेच्या अंमलबजावणीची माहिती दिली काही अधिकार्यांनी मोघम उत्तरे दिली असता माझं समाधान करू शकत नाहीत तर जनतेचे कसे समाधान करणार असा प्रश्र्न उपस्थित करून चुकीची आणि अपुरी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना यापुढे खपवून घेतले जाणार नाही अशी सर्वांसमोर समज दिली.

अतिक्रमीत झालेले सर्व शेतरस्ते सहज खुले झाले तर ठीक नाहीतर कायदेशीर कार्यवाही करून ३० एप्रिल पर्यंत सर्व शेतरस्ते मुक्त करावेत, कबाल्या अभावी घरकुल मिळत नसलेल्या नागरिकांना शासनाच्या नियमानुसार जागा देऊन घरकुलाचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करावे, शासनाच्या धान्य वाटप यंत्रणेत होणारा काळाबाजार तात्काळ थांबवावा, महावितरणने शेतकऱ्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना आ. रमेशअप्पा कराड यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केल्या.

प्रारंभी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली. शिबिर परिसरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलला भेट देऊन आ. कराड यांनी समाधान व्यक्त केले. शेवटी पद्माकर चिंचोलकर यांनी आभार मानले. या समाधान शिबिरात संगायो लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, ट्रॅक्टर वाटप, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भादा महसूल मंडळात असलेल्या २६ गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौरकृषीपंप लाभार्थ्यांसाठी तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१३ एप्रिल : सौरकृषीपंपाबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने लाभार्थी शेतकऱ्यांच्या सौरकृषीपंपाबाबत असलेल्या विविध तक्रारींची दखल घेत महावितरणच्या वतीने गुरूवार ( दि.१५ एप्रिल ते २२ एप्रिल) पासून उपविभागीय स्तरावर तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन केले आहे. सौरकृषीपंपाबाबत तक्रार असलेल्या लाभार्थ्यांनी याच लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

लातूर विभाग अंतर्गत येणाऱ्या लातूर ग्रामीण व मुरूड या उपविभागांमध्ये बुधवारी (दि.१५ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. तसेच रेणापूर व औसा उपविभागात गुरूवारी (दि.१६ एप्रिल) तर कासारशिरसी, किल्लारी या उपविभागात शुक्रवारी (दि.१७ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. त्याचबरोबर निलंगा व शिरूरअनंतपाळ उपविभागात सोमवारी (दि.२० एप्रिल) मेळावा आयोजीत केला आहे. तर उदगीर शहर, उदगीर ग्रामीण व देवणी या उपविभागात मंगळवारी (दि.२१ एप्रिल) आयोजन करण्यात आले आहे. तसेच शिरूर ताजबंद व अहमदपूर या उपविभागांमध्ये बुधवारी (दि.२२ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे.

दि. १५ ते २२ एप्रिल दरम्यान आयोजीत तक्रार निवारण मेळाव्यास लाभार्थी सौकृषीपंप धारक शेतकऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे. सौकृषीपंपाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शाखा प्रमुख व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शक्य तेवढ्या तक्रारींचे निवारण जागेवरच होणार असल्याने वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

## रक्तदान करून क्रांतीसूर्याला अभिवादन




त.भा. वृत्तसेवा

लातूर दि १३ एप्रिल : शहराच्या अंजली नगर येथील संविधान बौद्ध विहारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात १५ जणांनी सहभागी होत रक्तदान केले.

या विहाराच्यावतीने आयोजित शिबिरात जितेंद्रसिंग जर्नलसिंग ठाकूर, फारूख शेख, विशाल धावारे, अकबर शेख, समीर पठाण, अमित सूर्यवंशी, एजाज शेख, उमेश गायकवाड, जहिरोद्दीन सय्यद आदींनी सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान करून महात्मा फुलेंना अभिवादन केले. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शुभम श्रृंगारे, उपाध्यक्ष अल्ताफ शेख, कोषाध्यक्ष राजखान पठाण, सचिव परमेश्र्वर दरकसे, देवानंद मोठेराव, सहसचिव मोहन भालेराव, रक्त संकलनासाठी संजीवनी ब्लड सेंटरचे किरण कांबळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. सितम सोनवणे, तंत्रज्ञ यांच्यासह अंजलीनगर भागातील नागरिक उपस्थित होते.

## 'भीम के लख्ते जिगर' चित्रपटासाठी ऑडिशन



त.भा. वृत्तसेवा

लातूर दि १३ एप्रिल : 'भीम के लख्ते जिगर' या हिंदी चित्रपटासाठी येथील शिवाजी विद्यालयात कलाकारांची ऑडिशन घेण्यात आली. या ऑडिशनला स्थानिक कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात सुमारे २०० पेक्षा जास्त कलाकारांनी सहभागी होऊन काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यापैकी १२ कलाकारांची चित्रपटासाठी निवड करण्यात आली. नवोदित कलाकारांना मोठ्या पडद्यावर काम करण्याची संधी मिळणार आहे. या चित्रपटाचे लेखक, निर्माता व दिग्दर्शक विलास गाडगे यांनी स्वतः उपस्थित राहून ऑडिशन घेतले. कार्यक्रमाचे आयोजन प्रभाद गौतम व शिवाजी कोंडमगिरे रेड्डी यांनी केले होते. शिवाजी विद्यालयाचे संस्था सचिव अजय जाधव, मुख्याध्यापक ज्योत्सना पाटील, प्रशासकीय अधिकारी अशोक तोगरे या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले.

## महापालिकेची कर वसुली मोहीम थंडावली

त.भा. वृत्तसेवा


लातूर दि. १३ एप्रिल : महापालिकेचा आर्थिक गाडा अवलंबून असलेल्या लातूर महापालिकेने गेल्या वर्षी तब्बल ८० कोटी रुपयांची मालमत्ता कर वसुली केली होती. परंतु, यावर्षी निवडणुका आल्याने वसुलीचे उद्दिष्ट गाठता आले नाही. आर्थिक वर्ष संपूनही ५० टक्के शास्ती माफी योजना काही दिवस सुरू ठेवली होती. तरीही केवळ एका कोटीची भर पडली. यामुळे आर्थिक वर्ष २०२५२६ मध्ये केवळ ७६ कोटींचीच मालमत्ता कराची वसुली झाली आहे. आता नवीन आर्थिक वर्षातील कराच्या नोटिसा तयार करण्यास सुरुवात झाली आहे. त्याचप्रमाणे थकबाकीदारांच्या मालमत्ताही सील करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्यावतीने सांगण्यात आले.

शहरात सुमारे ८५ हजार गेल्या आर्थिक वर्षातील वसुली ७६ कोटींमध्येच अडकली मालमत्ताधारकांची नोंदणी आहे. नवीन मालमत्ताधारकांचा सर्व्हे आता करण्यात येणार आहे. त्यानंतर नवीन मालमत्तांची भर पडणार आहे. करदात्यांकडून वर्षाकाठी १२५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल होणे अपेक्षित आहे. परंतु, तो वसूलच होत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या पगारीलाही पैसे मिळत नाहीत. यामुळे महापालिकेने वसुलीवर जोर लावला होता. परंतु, यावर्षी गेल्यावर्षीचे ८० कोटी वसुलीचे उद्दिष्ट पालिकेला गाठता आले नाही. यावर्षी तर किमान १०० कोटी कर वसुलीची अपेक्षात असताना उद्दिष्टाच्या तब्बल २५ कोटी रुपयांनी कमी वसूली झाली आहे. सत्ताधाऱ्यांसह विरोधी नगरसेवकांनी राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून निधी खेचून आणण्याची गरज आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : आधुनिक भारताचे सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून महात्मा फुलेंनी शिक्षण, समता व मानवी हक्कासाठी दिलेला लढा ऐतिहासिक असून भारताच्या जडणघडणीत त्यांचे बहुमोल योगदान आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सिद्राम डोंगरगे यांनी केले. महात्मा बसवेश्र्वरमहाविद्यालयातील समाजकार्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा याजनाच्यावतीने आयोजित महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. यावेळी मुख्यसमन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. व्ही. आर सोनी, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, रसायनशाख विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी, गणित




विभाग प्रमुख डॉ. सुजित हांडीबाग, प्रा. काशीनाथ पवार, डॉ. संजय गवई, ग्रंथपाल डॉ. प्रमोद सर फि, कार्यालय प्रमुख नामदेव बंदरगे, प्रा. आशिष स्वामी, प्रा. प्रकाश राठोड यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. समाजक्रांतीचे जनक, थोर विचारवंत आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व क्रांतिवा ज्योतिबा फुले सर्व भारतीयांचे भूषण आहेत. खिया आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांनी सावित्रीमाईंच्या सोबतीने समाजपरिवर्तनाचा जो आदर्श उभा केला, तो आजही अजोड आसल्याचे सांगून प्राचार्य डॉ. डॉगरगे म्हणाले की, आधुनिक भारताच्या जडणघडणीत खियांना बरोबरीचे स्थान देणाऱ्या या महान क्रांतिकारकाचे विचार आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहेत. असेही ते म्हणाले यावेळी समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने यांनी महात्मा ज्योतिवा फुले यांच्या साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा लेखाजोखा सभागृहासमोर मांडला. तसेच प्रा. काशीनाथ पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गवई यांनी केले, सूत्रसंचालन कार्यालयीन प्रमुख नामदेव बंदरगे यांनी केले तर आभार प्रा. आशिष स्वामी यांनी मानले.

### जनकल्याण निवासी विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त

## दयानंद विज्ञानमध्ये व्याख्यान, निबंध स्पर्धा

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : दयानंद विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता कार्यक्रम अंतर्गत दोन दिवसीय उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. ८०० ते १२०० शब्द मर्यादेत असलेल्या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. भारतीय संविधान मूलभूत अधिकार आणि कर्तव्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते. व्याख्याते म्हणून डॉ. युवराज सारणीकर म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. भारतीय राज्यघटनेमुळेच सर्वसामान्य माणसाला माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार मिळाला. तसेच भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हे नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, स्वातंत्र्यासाठी आवश्यक असलेले सर्वोच्च हक्क आहेत. या मूलभूत अधिकार व कर्तव्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशा ही बळकट झालेली आहे. राज्याच्या मनमानी कारभारावर निर्बंध घालून कायद्याचे राज्य स्थापन करून सामाजिक व राजकीय समता निर्माण केलेली आहे. भारतीय संविधान हेच लोकशाहीचे खरे आधारस्तंभ आहे. याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्यंकटेश कैले यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. सूरज कोल्हे यांनी केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदचे आयोजन

त.भा. वृत्तसेवा
अहमदपूर १३ एप्रिल : विचार विकास मंडळ द्वारासंचलित महात्मा गांधी महाविद्यालयामध्ये १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने डॉ बाबासाहेब आंबेडकर: जीवन, विचार आणि वारसा या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील परिषद ही ऑनलाईन व आफलाईन अशा दोन्ही पातळीवर संपन्न होत असून, संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांच्या अध्यक्षतेखाली व स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील डॉ. दिलीप चव्हाण यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन प्रत्यक्षदर्शी (आफलाईन) होणार आहे. तसेच नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील डॉ. मिलिंद आव्हाड व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील डॉ दिपाली प्रतापराव पाटील हे आभासी (ऑनलाईन) मार्गदर्शन करणार आहेत. विचार विकास मंडळाचे सचिव, अँड पी. डी., कदम, उपाध्यक्ष अँड विजयकुमार देशमुख व उपाध्यक्ष मा. युवराज पाटील हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. परिषदेमध्ये जास्तीत जास्त प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन

### सिद्धिविनायक पतसंस्थेची दमदार झेप २१ कोटींचा टप्पा पार

औसा :
येथील श्री सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवत प्रगतीची नवी उंची गाठली. संस्थेने यावर्षी २९.७२ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवला. एकूण व्यवसायाने २१ कोटींचा टप्पा यशस्वीरीत्या ओलांडला. संस्थेच्या आर्थिक शिस्तीचेही दर्शन घडत असून, केवळ ५ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्यात संस्थेला यश आले. संस्थेच्या एकूण ठेवी १२.२१ कोटींवर पोहोचल्या असून, कर्जवाटप ८.७५ कोटी रुपयांपर्यंत झाले आहे. विशेष म्हणजे मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ठेवींमध्ये १०५ टक्के तर एकूण व्यवसायात तब्बल ११८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देत संस्थेने रटर बँकिंग, दफ कोड यासारख्या आधुनिक सुविधा सुरू केल्या. ग्राहकांना जलद व सुलभ सेवा उपलब्ध करून दिल्या. संस्थेच्या या यशात संचालक मंडळ, सभासद व कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान असल्याचे नमूद करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष श्रीशैल उटगे म्हणाले, विश्र्वास आणि तत्पर सेवेच्या बळावर ८० टक्क्यांहून अधिक व्यवसायवाढ साध्य झाली. औसा शहर व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार सेवा देत छोट्या व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्य करणे हेच खऱ्या अर्थाने सहकाराचे प्रतीक आहे.
संस्थेच्या या यशामुळे औसा परिसरात सहकार क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही अशीच प्रगती कायम राहील, असा विश्र्वास व्यक्त केला जात आहे.

### हाळी येथील शिबिरात ३० जणांचे रक्तदान

हाळी हंडरगुळी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त दबंग ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात ३० जणांनी रक्तदान केले.
या शिबिरास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ३० जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. विशेष म्हणजे सर्व जाती-धर्मातील युवकांनी एकत्र येत या उपक्रमात सहभाग नोंदवून सामाजिक एकतेचा संदेश दिला.
रक्तदानासारख्या पवित्र कार्यातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार आहे. या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. दबंग ग्रुपच्या या स्तुत्य पुढाकारामुळे जयंती साजरी करताना समाजसेवेचा आदर्श निर्माण झाला. यावेळी माजी जि. प. सदस्य दयानंद कांबळे, अशोक माने, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष खाजा मैनुद्दीन तांबोळी, युवा सेना उपजिल्हाप्रमुख रमण माने, सतीश काळे, शहाजी पाटील, मसुरे, गौतम सोनकांबळे, प्रा. धर्मा कांबळे, , माधव सोनकांबळे, प्रदीप सोनकांबळे, बालाजी शिंदे, रमाकांत माने यांच्यासह नागरिक उपस्थित होते-रक्त संकलन राधाई ब्लड बँकेच्या वतीने करण्यात आले.

# हिंदू धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्र यावे : इंद्रजीतसिंह बैस

त.भा.वृत्तसेवा
चाकूर दि १३ एप्रिल :जातीपातित विभागून न जाता हिंदू धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्र यावे.भारताला विश्र्वगुरू बनवायचे असेल तर प्रत्येक कुटुंबातील मुलांना छत्रपती शिवाजी महाराज व प्रभू श्रीरामचंद्र यांच्या कार्याची ओळख करून देणे आवश्यक आहे असा मोलाचा संदेश हिंदू संमेलनात इंद्रजीतसिंह बैस यांनी दिले.



चाकूर शहरातील जगत जागृती विद्या मंदिराच्या प्रांगणात भव्य विराट हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. संमेलनाच्या ठिकाणी भगव्या वातावरणाची छटा पाहायला मिळाली असून, तालुक्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने महिला, पुरूष ,तरुण,आणि नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.चंद्रप्रकाश नागिमे होते. प्रमुख वक्ते म्हणून देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख इंद्रजीतसिंह बैस उपस्थित होते.श्री १००८ सद्गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपाळकर व ह.भ.प. भागवताचार्य आनंत महाराज बेलगावकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.
कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली.त्यानंतर प्रभू श्रिरामांचे भजन व्हायोलिन वर देविदास कुलकर्णी यांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.प्रस्ताविक रामनाथ जाधव यांनी केले.
प्रमुख वक्ते इंद्रजीतसिंह बैस यांनी आपल्या भाषणात जातिपातीत विभागून न जाता हिंदू धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्र यावे,भारताला 'विश्र्वगुरू' बनवायचे असेल, तर प्रत्येक कुटुंबातील मुलांना छत्रपती शिवाजी महाराज व प्रभू श्रीराम यांच्या कार्याची ओळख करून देणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक घरात 'जिजाऊ'सारखी संस्कारक्षम माता घडणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. देशहितासाठी स्वदेशी वस्तूंचा वापर वाढवण्याचे आवाहनही त्यांनी केले.
ह.भ.प. भागवताचार्य अनंत महाराज बेलगावकर यांनी आपल्या प्रभावी भाषणातून मातृभूमीप्रेम, संस्कार आणि धर्माभिमान यांचे महत्त्व स्पष्ट केले. जन्म देणारी आई आणि जन्मभूमी सर्वश्रेष्ठ ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे, असे सांगताना त्यांनी तरुण पिढीवर विशेष भर दिला. आजची तरु-णाई व्यसनांच्या विळख्यात अडकत असल्याची खंत व्यक्त करत, त्यांना योग्य संस्कार देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मुलांना दररोज आई-वडिलांचे दर्शन घेण्याची सवय लावणे, धर्मग्रंथांचे वाचन करण्यास प्रवृत्त करणे आणि गीता, ज्ञानेश्र्वरी यांसारख्या ग्रंथांचा अभ्यास घडवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्र स्वच्छ व सशक्त बनवण्यासाठी नद्यांचे संवर्धन, तसेच मतदानाचा अधिकार योग्य पद्धतीने वापरण्याचेही आवाहन त्यांनी केले.
श्री.शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनात स्वधर्मीयांमध्ये आर्थिक व्यवहार वाढवण्यावर भर दिला. दैनंदिन जीवनातील गरजांच्या वस्तू शक्यतो हिंदू व्यावसायिकांकडून खरेदी कराव्यात, तसेच शिक्षण घेताना योग्य मित्र परिवाराची निवड करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे सामाजिक एकात्मता वाढेल आणि विविध समस्यांवर नियंत्रण मिळवता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.
अध्यक्षीय समारोपात डॉ. चंद्रप्रकाश नागिमे यांनी एक रहोगे तो सेफ रहोगे हा संदेश देत एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले.
चाकूर येथील वकील संघाचे माजी अध्यक्ष ड.ज्ञानेश्र्वर कापसे यांचे निधन झाल्याने व उदगिर येथील गोरक्षकांची हत्या झाली आहे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहीली व पसायदानाने हिंदू संमेलनाची सांगता झाली.
कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजीव पिटलावार व रणजीत घुमे यांनी केले, तर आभार एकनाथ चाकूरकर यांनी मानले.
संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण दिसून आले,उपस्थितांनी संदेश आत्मसात करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## मंगेशकर महाविद्यालयात आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली



निलंगा: तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण तथा महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी आशा भोसले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संगीत विभागप्रमुख प्रा.दुर्गादास सबनीस यांनी आपल्या मनोगता-तून आशा भोसले यांच्या संगीत क्षेत्रातील देदीप्यमान वाटचालीचा आढावा विशद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजयकुमार पवार यांनी केले. याप्रसंगी डॉ.जाफर चौधरी, डॉ.प्रदीप पाटील, प्रा.विकास पाटील, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.रवींद्र अंबुलगे, डॉ.विकास कुलकर्णी, प्रा.अंजना मुळे, संजीवकुमार होसुरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

मंगेशकर परिवार व शारदोपासक शिक्षण संस्थेचे ऋणानुबंध असून ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या दु:खद निधनामुळे शारदोप-ासक शिक्षण संस्था व मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय शोकाकुल आहेत. भोसले व मंगेशकर परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी असून आशा भोसले यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्र्वरचरणी प्रार्थना. - शिवाजीराव जाधव, माजी प्राचार्य, मा.दी.मं.महाविद्यालय, औराद शहाजानी.

# ग्रामीण रुग्णालयात रुग्णांसाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध होणार : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

त.भा.वृत्तसेवा
चाकूर दि १३ एप्रिल : चाकूर अहमदपूर येथील ग्रामीण रुग्णालयात लवकरच अत्याधुनिक यंत्रसामुग्री एका संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करत असून लवकरच ही यंत्रसामग्री आपल्या सर्वांच्या सेवेत येणार आहे .यामुळे अनेकांच्या आरोग्याचे निदान या माध्यमातून होणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी शंकरवाडी तालुका चाकूर येथे केले.शंकरवाडी येथे मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत दहा लक्ष रुपयाच्या सभागृहाचा लोकार्पण सोहळा व स्व. नारायणराव चाटे यांच्या स्मरणार्थ जिल्हा परिषद सदस्य रंजना चाटे, सरपंच भालचंद्र चाटे, यांच्या वतीने देण्यात आलेल्या संरक्षण भिंतीचा उद्घाटन सोहळा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी ते बोलत होते.



व्यासपीठावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्ती कासले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे , उपसभापती भुजंग शिंदे, जिल्हा परिषद सदस्य रंजना चाटे, सरपंच भालचंद चाटे, प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे , अनिल वाडकर, यशवंतराव जाधव, राहुल सुरवसे, संदीप शेटे, मनोज पाटील,पंचायत समिती सदस्य गजानन होनराव, नरेंद्र हाक्के, प्रतिक केदार, काँमेश कसबे, बाळासाहेब जाधव, बसवराज गंगापुरे, श्रीनाथ सावंत, शैलेश कदम, डी.के. कासले, संदीप बाचपल्ले, आय.डी. शेख, रामचंद्र तिरुके, विश्र्वनाथ पाटील, नारायण काचे, नाथा मद्रेवार, शिवशंकर मुधाळे सह विविध मान्यवर उपस्थित होते.
यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, मागील काळात लाईटचा मोठ्या प्रमाणात प्रश्र्न होता तो सोडवण्यास आपणा सर्वांना यश आलेला आहे . आता आज शेतकऱ्यांसाठी शेतरस्ते हा महत्त्वाचा विषय असून शंकरवाडी भागातील सुद्धा असेच रस्त्याचा प्रश्र्न अग्रक्रमाने सोडवण्याचा आपण प्रयत्न करू. शंकरवाडी हे गाव दुधासाठी प्रसिद्ध असून दुग्ध व्यवसायासाठी कर्ज हव असेल तर त्यासाठी सुद्धा आपण शेतकऱ्यांना कर्ज देऊ ,त्याचबरोबर जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांनी त्यांना दिलेल्या संधीचे त्यांनी सोनं करून लोक कल्याणासाठी काम करावे अशी अपेक्षा सुद्धा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केली. तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल सुद्धा मतदारांचे आभार मानले.
यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, धनंजय चाटे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच डॉक्टर भालचंद्र चाटे यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश स्वामी व आभार संतोष कोल्हे यांनी मांनले.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंकरवाडी येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता.

## काळेवाडी येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा उत्साहात

त.भा. वृत्तसेवा,
रेणापूर दि. १३ एप्रिल : येथुन जवळच असलेल्या काळेवाडी येथील पवनसुत हनुमान मंदिर येथे सुरू असलेला श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पडत आहे.हभप गुरुवर्य प्रेममूर्ती अरुण महाराज बर्दापूरकर यांच्या मधुर वाणीतील भागवत कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.
बुधवार दि.८ एप्रिल २०२६ रोजी या सोहळ्याचा सुरुवात झाली दि. १२ एप्रिल रोजी श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.मंदिर परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली.
'नंद घर आनंद भयो' या जय घोषात भगवान श्रीकृष्णाचा जन्म उत्सव सोहळा साजरा करण्यात आला.यावेळी भजन, कीर्तन व



प्रसाद वितरणाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी आपल्या प्रवचनात अरुण महाराज बर्दापूरकर यांनी श्रीकृष्ण जन्माचे आध्यात्मिक महत्त्व विशद केले.अन्याय,अधर्म आणि अत्याचार वाढला की परमात्मा विविध रूपात अवतार घेतो,हा संदेश श्रीकृष्ण जन्मातून मिळतो असे त्यांनी सांगितले.मनातील कंस रूपी अहंकार,लोभ व क्रोध नष्ट करून भक्ती, प्रेम व सदाचार अंगीकारल्यास प्रत्येकाच्या जीवनात 'कृष्ण जन्म' होऊ शकतो असे त्यांनी प्रभावी शब्दांत सगितले.
सत्य,धर्म आणि भक्तीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहनही त्यांनी भाविकांना केले.या सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

### शहरात गस्त वाढविण्याची मागणी

लातूर : शहराच्या अनेक भागात रात्रीच्यावेळी पथदिवे सुरू नाहीत. अशातच रात्रीच्यावेळी मद्यधुंद गल्लीदादांची संख्या अचानक वाढते. अशा गल्लीदादांची दहशत परिसरात वाढत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## जिद्द आणि मेहनतीच्या बळावरील यशस्वी झेप युवकांना प्रेरणा देणारे : लखनगावे



त.भा. वृत्तसेवा,
शिरूर अनंतपाळ, दि. १३ एप्रिल : शिरूर अनंतपाळ शहरातील प्रभाग. १३ मधील रहिवाशी बांधकाम व्यवसायिक. ईमाम शेख यांची स्नुषा. नर्गिस शेख यांनी जिद्द व अथक परिश्रमाने नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग सरळ सेवा भरतीच्या माध्यमातुन घेण्यात आलेल्या सरळ सेवा भरती मध्ये पहिल्याच प्रयत्नात धर्मादाय आयुक्तालय, मुंबई येथे निरीक्षक पदावर यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल नगरसेवक. सुधीर लखनगावे यांच्या वतीने नर्गिस शेख यांच्या सपत्निक कोटुंबिक सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते..
या वेळी नगरसेवक. सुधीर लखनगावे यांनी कोटुंबिक दैनंदिन कामे करुन यश संपादन करणे अशक्य वाटत असले तरी दृढ निश्र्चय,जिद्द, कठोर परिश्रम,चिकाटी व योग्य नियोजनाच्या जोरावर उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून अभ्यासातील सातत्य ठेवत यशाची शिखरे सहज गाठता येतात नर्गिस शेख यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग सरळ सेवा भरती स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातुन घेण्यात आलेल्या भरतीमध्ये धर्मादाय आयुक्तालय, निरीक्षक पदी संपादन केलेले यश सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना, महिलांना प्रेरणादायी आहे अशी भावना व्यक्त करून नगरसेवक. सुधीर लखनगावे यांनी शुभेच्छा दिल्या..
यावेळी काँग्रेस शहराअध्यक्ष. अशोक कोरे,मुख्याध्यापक. माधव बेल्लेवाड, सोमनाथ तोंडारे,केंद्रिय. मुख्याध्यापक. सोमनाथ घटकार , व्यंकट हंद्राळे,व्यंकट दाहिगुंडे,वैभव बेल्लेवाड, दिपक घटकार, रमजान शेख, आसिफ उजेडे,प्रभाकर धुमाळे, ईमाम शेख, यांच्यासह प्रभागातील नागरिकांची उपस्थिती होते.

## शेती पिकावरील प्रक्रियामुळे शेतकरी समृद्ध होतील : आ. सदाभाऊ खोत

त.भा. वृत्तसेवा
शिरूर अनंतपाळ १३ एप्रिल : शेतकऱ्यांच्या शेतातील हायब्रीड ज्वारी,मका आशा पिकावर सरकारने प्रक्रिया करून इथेनॉल निर्मिती करुन देशात इथेनॉल वर चालणारी वाहने निर्माण करावी त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला बाजारपेठेत चांगला भाव मिळेल यातून शेतकऱ्यांना मोठा पैसा मिळल्याने शेतकऱ्यांना सोन्याचे दिवस येतील असे मत रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार सदाभाऊ खोत यांनी मत व्यक्त केले.



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे धामणगाव येथे शनिवारी सायंकाळी शिरुर अनंतपाळ तालुका रयत क्रांती संघटनेच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद मेळावा कार्यक्रमात बोलतांना मत व्यक्त केले.
यावेळी व्यासपीठावर माजी सरपंच ज्ञानोबा बोळंगे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश उपाध्यक्ष राहुल मोरे, विज्ञान तंत्रज्ञान आघाडी प्रमुख मिलिंद दामले, युवा प्रदेश अध्यक्ष अरविंद पाटील, मराठवाडा अध्यक्ष शिवाजी पेटे, अध्यात्मिक प्रदेश अध्यक्ष बालाजी महाराज येरोळकर, जिल्हा अध्यक्ष गणेश सुर्यवंशी, तालुका अध्यक्ष गुडेराव चौसष्टे, पंचायत समिती सदस्य हामीद पटेल, जिल्हा परिषद सदस्य माणिक गायकवाड,विजय निवले उपस्थित होते.
पुढे बोलताना आमदार खोत म्हणाले शेतकऱ्यांना स्वतः चे प्रश्र्न सोडविण्यासाठी गावगाढ्यातील शेतकरी संघटीत होऊन मोठा लढा उभारुन लढण्याची गरज असून ज्या शेतकऱ्यांच्या कुंटूबामध्ये एकही नौकरदार नाही त्या शेतकऱ्यांना त्यांचे मुलबाळ शिक्षण देऊन मोठे करण्यासाठी आशा कुटुंबाला दर महिन्याला सरकारने पंचवीस हजार रुपये मदत देण्याची मागणी करणार असून सरकारने शेतकरी विरोधी कायदा रद्द करावा अशी मागणी सरकारकडे करणार असल्याचे सांगितले.

## पट पडताळणी मोहिमेत अहमदपूर शाळांची तपासणी यशस्वी : गटशिक्षणाधिकारी काळे

त.भा. वृत्तसेवा
अहमदपूर १३ एप्रिल : अहमदपूर शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक नोंद सुनिश्र्चित करण्यासाठी शिक्षण विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सक्तीच्या विशेष पट पडताळणी मोहिम २०२६ ही दि. ११ एप्रिल रोजी उत्साहात सुरुवात झाली.तीन टप्प्यांत पार पडणाऱ्या या मोहिमेसाठी अहमदपूर शिक्षण विभाग पूर्णपणे सज्ज असून शहरातील पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या मोहिमेअंतर्गत ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी इयत्ता १ ली ते ८ वी तसेच ९ वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी केली जात आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील शाळांची तपासणी करण्यात आली असून या प्रक्रियेसाठी ३३ विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. प्रत्येक पथकात २ ते ३ सदस्यांचा समावेश करून त्यांना ठराविक शाळांची जबाबदारी देण्यात आली होती.
दि. ११ एप्रिल रोजी ३३ पथकांनी शहरातील ५३ शाळांना भेट देत विद्यार्थ्यांची उपस्थिती तपासली. या तपासणीत अनेक शाळांमध्ये शंभर टक्के उपस्थिती आढळून आली, तर काही शाळांमध्ये ९५ टक्क्यांपर्यंत उपस्थिती नोंदविण्यात आली.
संत ज्ञानेश्र्वर विद्यालय १००%, विमलाबाई देशमुख कन्या शाळा १००%, यशवंत विद्यालय ९९%, रवींद्रनाथ टागोर विद्यालय ९८%,याप्रमाणे एकूणच शहरातील सरासरी उपस्थिती अंदाजे सुमारे ९५ टक्के असल्याचे स्पष्ट झाले आहे.
मोहिमेचा मुख्य उद्देश शाळांमधील बनावट नोंदी रोखणे, विद्यार्थ्यांची अचूक संख्या निश्र्चित करणे आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणणे हा आहे. यामुळे शिक्षकांवर काही प्रमाणात अतिरिक्त कामाचा ताण वाढत असला तरी शैक्षणिक विश्र्वासार्हता वाढविण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची ठरत आहे.
गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे यांनी सांगितले की, शासनाच्या आदे-शानुसार पट पडताळणी मोहिमेसाठी शिक्षण विभाग पूर्णतः सज्ज असून, इतर विभागांच्या मनुष्यबळाचीही मदत घेण्यात येत आहे. प्रत्येक टप्प्यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.
आता उर्वरित टप्प्यांत १५ व २२ एप्रिल रोजी ग्रामीण भागा-तील शाळांची पट पडताळणी केली जाणार असून, या मोहिमेमुळे संपूर्ण तालुक्यातील शैक्षणिक नोंदी अधिक अचूक व पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.
अहमदपूर शहरात मोहिमेचा पहिला टप्पा यशस्वी ठरल्याने शिक्षण क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पठाण यांना जि.प. स्वीकृत सदस्यपद देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ एप्रिल -**

गेली ३५ वर्षे 'मातोश्री'च्या विचारांशी निष्ठा राखून एक कट्टर शिवसैनिक म्हणून प्रामाणिकपणे काम करणारे माजी जिल्हा परिषद सदस्य राजअहमद पठाण यांची धाराशिव जिल्हा परिषदेमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी तुळजापूर तालुक्यातील शहापूर पंचायत समितीच्या सदस्या जयश्री कोळी यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन त्यांनी जिल्ह्याचे खा. ओमराजे निंबाळकर तसेच आमदार व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कैलास पाटील यांना दिले आहे.

निवेदनात जयश्री कोळी यांनी नमूद केले आहे की, राजअहमद पठाण यांनी मागील ३५ वर्षांपासून पक्षाशी निष्ठा ठेवत संघटनात्मक पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच जिल्हा परिषदेमधील समन्वय अधिक प्रभावीपणे साधता येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

जयश्री कोळी यांच्यासह तुळजापूर तालुक्यातील बहुतांश शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनीही राजअहमद पठाण यांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करावी, अशी एकमुखी मागणी केली आहे.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# चोराखळीतील 'महाकाली' कला केंद्रावर तुफान राडा; तलवारी-कोयत्यांचा धाक

## धाराशिव जिल्ह्यातील वादग्रस्त कलाकेंद्र बंद असताना महाकाली कला केंद्राला वरदहस्त कुणाचा ?






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**

जिल्ह्यातील येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या चोराखळी येथील महाकाली कला केंद्रावर शनिवारी रात्री सशस्त्र टोळक्याने धुडगूस घातल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. किरकोळ वादातून झालेल्या या राड्यात महिला कलाकारांना बेदम मारहाण करण्यात आली असून, सोन्याचे दागिने व रोकड लुटल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी येरमाळा पोलिसांनी ७ ते ८ जणांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता येडशी येथील काही तरुण वाहनांनी कला केंद्रावर आले. यावेळी किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला.

त्यानंतर संतापलेल्या तरुणांनी तलवारी, कोयते व लोखंडी रॉड हातात घेऊन केंद्रात घुसून उपस्थित महिला कलाकारांना मारहाण केली.

यावेळी एका महिलेच्या गळ्याला कोयता लावून जीवे मारण्याची धमकी देत कपाटातील सुमारे २ लाख रुपयांची रोकड व अंदाजे ३ लाख १० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने असा मोठा ऐवज लुटून नेल्याचा आरोप आहे.

घटनेदरम्यान आरोपींनी केंद्रातील मालमत्तेचीही मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. यात कार्डिओ (रनिंग) मशीन, टीव्ही, फ्रीज, एसी व कपाटांचे नुकसान करण्यात आले. तसेच सुमारे ७० प्लास्टिक खुर्च्या, पाण्याचे जार व खिडक्यांच्या काचा फोडण्यात आल्या. पार्किंगमध्ये उभी असलेली महिंद्रा दणत ५०० (एमएच १४ डीएन ६८०९) ही गाडीही फोडून अंदाजे ३ लाख रुपयांचे नुकसान करण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेबाबत दोन्ही बाजूंकडून वेगवेगळे आरोप करण्यात येत आहेत. कला केंद्र चालक महिलांनी मारहाण व लुटीचा आरोप केला असताना, येडशी गावातील तरुणांच्या म्हणण्यानुसार, केंद्र चालकांनी त्यांच्या एका साथीदाराला आधी मारहाण केल्याने जाब विचारण्यासाठी गेल्यावर वाद चिघळला.

दरम्यान, जिल्ह्यात प्रशासनाने अनेक ठिकाणी कला केंद्रांवर बंदी घातलेली असताना चोराखळी येथील महाकाली कला केंद्र सुरू कसे राहिले, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या केंद्राला नेमका कुणाचा वरदहस्त आहे? असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात असून, संबंधित प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

याअधी ही या महाकाली कला केंद्रातील नर्तकेमुळे बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांचे आत्महत्या प्रकरण, उमरगा येथील संबंधीत खून प्रकरण, वेश्या व्यवसायास प्रवृत्ती केल्याचे प्रकरण, ढोकी येथील येथील तरूणाची नर्तकेच्या त्रासामुळे केलेली आत्महत्या असे गंभीर स्वरूपाचे गुन्हा या महाकाली कला केंद्राशी निगडीत असताना प्रशासन अणखी काय मोठे घडण्याची वाट पाहत आहे, अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

### येरमाळा पोलिसात गुन्हा दाखल...

या प्रकरणी फिर्यादी कशिश राजेश शेरकर (वय २०, रा. इंगळे गल्ली, धाराशिव) यांच्या तक्रारीवरून सुनील शेळके, जयंत भोसले, नागेश लोखंडे, हनुमंत शेळके, योगेश चव्हाण, दिनेश चव्हाण, सोनू पवार व इतर अज्ञात ५ ते ७ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्या रुपाजी भाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील लक्ष्मण भोजगुडे करत आहेत.

# १५६ कोटींच्या रस्ते कामात घोटाळ्याचा आरोप

## तुळजापूर येथे महाविकास आघाडीच्या वतीने पत्रकार घेत चौकशीची मागणी....



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**

शहरातील नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या १५६ कोटी रुपयांच्या रस्ते कामांमध्ये मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या वतीने १३ एप्रिल रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या पत्रकार परिषदेस नगरसेवक अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, आनंद जगताप व ऋषिकेश मगर उपस्थित होते. तुळजापूर हे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीचे पावन क्षेत्र असून येथे राज्यासह देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. शहरातील रस्त्यांच्या विकासासाठी नगरविकास विभागामार्फत १५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांच्याकडे आहे. मात्र, स्थानिक सत्ताधारी लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांवर दबाव टाकून या निधीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला. शहरातील लोकवस्ती असलेल्या भागांमध्ये रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था असतानाही तेथे कामे न करता खाजगी विकासकांच्या प्लॉटिंगमध्ये रस्ते करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

नगरविकास विभागाच्या नियमांनुसार खाजगी विकासकांनी लाईट, नाली व रस्त्यांची कामे स्वतः करणे बंधनकारक असताना शासनाच्या निधीतून ही कामे करून शासकीय पैशांचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, मे.के.एस. कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने निविदा प्रक्रियेत बनावट कागदपत्रे सादर करून राजकीय दबावातून काम मिळवल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. यासंदर्भातील काही पुरावे जोडून मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## धोकादायक पार्किंगप्रकरणी उमरग्यात गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ एप्रिल -**

उमरगा शहरातील इंदिरा चौक मेन रोडवर सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने ऑटो रिक्षा उभी केल्याप्रकरणी बाबुराव लक्ष्मण विभुते (वय ७३, रा. चिंचोली जाहगीर ता. उमरगा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




१२ मार्च रोजी सायंकाळी ही घटना उघडकीस आली. उमरगा पोलिसांनी प्रथम खबऱ्यावरून भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये गुन्हा नोंदवून पुढील कारवाई सुरू केली आहे.

# रुईभर येथे श्री सिद्धिविनायक प्राणप्रतिष्ठापना सोहळा उत्साहात; १०१ सेवेकऱ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**

रुईभर येथे श्री सिद्धिविनायक प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री सिद्धिविनायकाच्या प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहनाने झाली. भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप. प्रकाश बोधले महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. रुईभर व पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायात कार्य करणाऱ्या १०१ सेवेकऱ्यांचा शाल, पुष्पहार व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

याचबरोबर हभप. डॉ. ईश्वर महाराज कुंभार लिखित संत गोरोबा काका यांच्या जीवनावर आधारित चरित्रग्रंथाचे प्रकाशनही या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. हभप. प्रकाश बोधले महाराज यांच्या हृदयस्पर्शी हरिकीर्तनाने भक्तिमय वातावरण अधिकच भारावून गेले.

विशेष म्हणजे, रुईभर गावात श्री सिद्धिविनायकाचे मंदिर नव्हते. ही उणीव ओळखून डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषदादा कोळगे यांनी स्वखर्चातून मंदिर उभारून एक प्रेरणादायी कार्य साकारले आहे. त्यांच्या या निस्वार्थ सेवेने गावाला नवे आध्यात्मिक केंद्र लाभले आहे.

कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास वारकरी संप्रदायातील भाविक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, सेवा आणि समर्पणाचा सुंदर संगम रुईभर येथे अनुभवायला मिळाला.

# आंबेडकर जयंती पार्श्वभूमीवर तेरखेड्यात पोलिसांचे पथसंचलन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ एप्रिल -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त (दि. १३ एप्रिल) येरमाळा पोलिसांकडून पथसंचलन करण्यात आले. सणाच्या पार्श्वभूमीवर गावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



पोलीस निरीक्षक संग्राम भालेराव यांच्या नेतृत्वाखाली हे पथसंचलन पार पडले. यावेळी उपनिरीक्षक स्वप्निल बोजगुडे, उपनिरीक्षक देविदास आवारे, तेरखेडा बीटचे सुरजीत कदम तसेच पोलीस स्टेशनचे अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पथसंचलनादरम्यान पोलिसांनी गावातील प्रमुख रस्ते, चौक व संवेदनशील भागातून फेरी काढत नागरिकांना शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

या पथसंचलनामुळे गावात पोलीस बंदोबस्ताची जाणीव निर्माण झाली असून नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले.

# ईट येथे राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; विजेत्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१३ एप्रिल -**

ईट येथे साहेब महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय सामूहिक व वैयक्तिक बाल व प्रौढ नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राज्याचे आरोग्यमंत्री तथा माजी मंत्री आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रवीण देशमुख यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, दि.११ एप्रिल रोजी बाल गटातील सामूहिक व वैयक्तिक नृत्य स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

राज्यातील विविध भागांतून स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. स्पर्धकांनी सादर केलेल्या थरारक आणि आकर्षक नृत्य सादरीकरणांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. या प्रसंगी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक केशव सावंत, जिल्हा परिषदेचे माजी सभापती अण्णासाहेब देशमुख, माजी सदस्य सुनील भोईटे, माजी उपनगराध्यक्ष नागनाथ नाईकवाडी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चना दराडे, युवा सेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब मांगले, वाशी तालुकाप्रमुख सत्यवान गपाट, भूम तालुका प्रमुख बालाजी गुंजाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विशाल ढगे, युवा सेना वाशी तालुका अध्यक्ष प्रवीण गायकवाड, भाऊसाहेब मारकड, राहुल डोके, बालाजी काळे, ज्येष्ठ नेते केशव चव्हाण आदी उपस्थित होते.

### स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे...

सामूहिक गट: प्रथम नृत्य निकेतन अकॅडमी, द्वितीय साया अकॅडमी, तृतीय ऑसम ग्रुप, चतुर्थ नवाकुर ग्रुप.
वैयक्तिक गट: प्रथम विराट काळे, द्वितीय अदिती जाधव, तृतीय शौर्य गोडबोले, चतुर्थ अदिव्यता कांबळे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हनुमंत गवळी यांनी केले, तर परीक्षण रोहित राठोड व सिद्धी गाडेकर यांनी केले. विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ईश्वर देशमुख, बंटी देशमुख, अक्षय शिंदे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# महिला ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरोधात तक्रारी; चौकशीची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ एप्रिल -**

परंडा पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या एका महिला ग्राम पंचायत अधिकाऱ्यांविरोधात गैरवर्तन व अनियमित कारभाराच्या तक्रारी समोर आल्याने संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत अधिकारी संघटना डीएनई-१३६ शाखा परंडा यांच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, त्यामध्ये संबंधित महिला अधिकारी कार्यालयीन कामकाजादरम्यान विविध विकासकामांमध्ये अनियमितता करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच, त्यांच्या वर्तणुकीमुळे इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्रास होत असून चौकशी करण्याचा प्रयत्न केल्यास धमकी दिली जात असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विशेषतः सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी, विशेषतः महिलांशी अयोग्य वक्तव्य केल्याचेही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

या प्रकारामुळे कार्यालयीन वातावरण बिघडत असून प्रशासनाच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

या निवेदनावर तालुकाध्यक्ष गरड डी. आर., हरिचंद्र चौधरी, मदने व्ही. व्ही., जिल्हाध्यक्ष भोसले वाय.बी., कावळे सु.एस., यादव के.के., राठोड एस.एस., शहापुरे एस.एन., भांडवलकर व्ही.एम., नंदनवार एन.बी., शिंदे ए.एन., शिंदे एस.बी., कांबळे बी.एम., माने के. व्ही., गरड पी.व्ही., गिरी एस.बी., बेद्रे एस.बी., सातपुते आर.एन., जाधव व्ही.पी., वेदपाठक डी. एस., घुबे जी.व्ही., माडजे बी.आर., परखंडे आर.एम. यांच्यासह संघटनेच्या अनेक पदाधिकारी व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करून गटविकास अधिकारी संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करतात, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# काळभैरवनाथ यात्रेनिमित्त पाणपोई सुरू; भाविकांसाठी थंड पाण्याची सोय



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ एप्रिल -**

परंडा शहरातील बस स्थानक परिसरात दि.१३ एप्रिल रोजी थंड पाण्याची पाणपोई सुरू करण्यात आली. श्री काळभैरवनाथ यात्रेनिमित्त शहरात येणाऱ्या भाविक भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कै. माजी आमदार ज्ञानेश्वर (तात्या) पाटील यांच्या समर्थनार्थ ही पाणपोई सुरू करण्यात आली असून ओंकार भाऊराव भानवसे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विश्वजित पाटील, आगारप्रमुख मुळे साहेब, वाहतूक नियंत्रक जीनेरी, प्रितम डाके, रणधीर मिसाळ, अक्षय बनसोडे, जगदीश विद्वत, गोविंद देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हभप. कल्याण चव्हाण व आशा भोसले यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे हभप. स्व. कल्याण (आबा) चव्हाण तसेच गानकोकिळा स्व. आशा भोसले यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

हभप. कल्याण (आबा) चव्हाण यांचे १३ एप्रिल रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. ते संत गोरोबाकाका संस्थान, पंढरपूरचे उपाध्यक्ष होते. तसेच रुईभर येथील डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे माजी संचालक व ग्रामपंचायतीचे माजी सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले होते. अध्यात्म, भजन व





सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान असून त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

यावेळी विविध मान्यवर, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



## संक्षिप्त वृत्त...



### राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत बसवेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थिनींचे यश

**उमरगा, दि.१३ एप्रिल -**
येथे आयोजित राज्यस्तरीय कराटे क्रीडा स्पर्धेत श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रणिता सूर्यवंशी व श्रेया अंकुश यांनी १५ वर्षे वयोगटात उत्कृष्ट कामगिरी करत दोन रौप्य (सिल्वर) व एक कांस्य (ब्राँझ) पदक पटकावून शाळेचे नाव उज्ज्वल केले. या यशाबद्दल शाळेत विद्यार्थिनींचा वरिष्ठ लिपिक रमेश होदलूरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक नेताजी गायकवाड तसेच संजय कोथळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन दंडगे, डॉ. कपिल महाजन आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.



### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मान्यवरांकडून स्वागत

**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज धाराशिव विमानतळावर हेलिकॉप्टरने आगमन झाले. यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी आ. राणाजगजितसिंह पाटील, मा.ख. रवींद्र गायकवाड, मा.आ. ज्ञानराज चौगुले, पं.स. सभापती ॲड. आकांक्षा चौगुले उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर व पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनीही स्वागत केले.



### नवोदय विद्यालयात स्थापना दिन साजरा

**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**
तुळजापूर - नवोदय विद्यालयात १३ एप्रिल रोजी नवोदय स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने नवोदयचे निर्माते, स्वर्गीय माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डी.व्ही. बडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला एस.डी. खोबरागडे, सी.एस. गोमारे, एच.जी. जाधव, पी.एन. जोशी, बसवराज कोरकर, निषाद भुते यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्थापना दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी सत्यम शिंदे याने नवोदय विद्यालयावर आधारित प्रश्नमंजुषा सादर केली, तर ध्रुव डिकले याने नवोदय शाळेविषयी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना आदरांजली वाहण्यात आली.

### शुभांगी देशमुख यांची निवड

**भूम, दि.१३ एप्रिल -**
धाराशिव जिल्हा परिषदेच्या अर्थ बांधकाम व आरोग्य समिती समिती सदस्य पदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या जिल्हा परिषद सदस्या शुभांगी सुनील देशमुख यांची निवड झाली आहे. त्या मा.आ. राहुल मोटे विश्वासु सहकारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनिल देशमुख यांची पत्नी आहेत. शुभांगी देशमुख या विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय असून, शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणे व विकासकामांना गती देण्यासाठी त्या प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.





### जलशुद्धीकरण यंत्र बसवून उपक्रम

**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**
तुळजापूर येथे माजी नगरसेवक कै. पांडुरंग (तात्या) नन्नवरे यांच्या स्मरणार्थ नारायण नन्नवरे यांच्या वतीने न.प. शाळा क्र.३ येथे ५०० लिटर प्रति तास क्षमतेचे जलशुद्धीकरण (आरओ) यंत्र स्वखर्चातून बसविण्यात आले. महात्मा जोतिबा फुले जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करून या यंत्राचे उद्घाटन नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक, पदाधिकारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# गोरोबाकाकांच्या संजीवन समाधी सोहळ्यास भक्तांची मांदियाळी

वारकऱ्यांचा महासागर तेरणा तीरावर दाखल... समाधी स्थळाची महापूजा... २१०० किलो फुलांनी सजविला मंदिराचा गाभारा...

**विकास भोरे**
**तेर, दि.१३ एप्रिल -**
संत परीक्षक व वारकरी संप्रदायातील थोर संत गोरोबा काकांच्या ७०९ व्या संजीवन समाधी सोहळ्यास तेर नगरीत उत्साहात प्रारंभ झाला.

वरुथीनी एकादशीनिमित्त पहाटेची महापूजा जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील, प्रशासक रूपाली कोरे, दत्तात्रेय मुळे, रघुनंदन महाराज पुजारी व मल्हार पाटील यांच्या हस्ते पार पडली. या संजीवन समाधी सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून शेकडो वारकरी दिंड्या व हजारो भाविक हातात भगव्या पताका घेऊन तेर नगरीत दाखल झाले आहेत. टाळ-मृदंगाच्या गजरात गोरोबा-ज्ञानोबाच्या जयघोषात वारकऱ्यांनी नगर प्रदक्षिणा घालत भक्तिमय वातावरण निर्माण केले. उन्हाच्या तीव्रतेचा विचार करून ग्राम पंचायतीच्या वतीने नगर प्रदक्षिणा मार्गावर पाणी शिंपडून वारकऱ्यांची सोय करण्यात आली. तसेच तेर येथील नागरिकांनी विविध चौकांत महाप्रसादाची व्यवस्था केली होती. यामध्ये केळी, साबुदाणा, लिंबू सरबत, चहा, थंड ताक व पिण्याच्या पाण्याचा समावेश होता. गावातील महिलांनीही वारकरी दिंड्यांच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दुतर्फा सडा टाकून रांगोळ्यांच्या सुंदर पायघड्या घालत भाविकांचे मनोभावे स्वागत केले.

दरम्यान, दानशूर भाविकांच्या सहकार्याने शेवंती, अष्टर, झेंडू, डच गुलाब, निशिगंध, मोगरा व जिप्सी अशा सुमारे २१०० किलो फुलांनी मंदिराच्या गाभाऱ्याची आकर्षक सजावट करण्यात आली. ही सजावट बार्शी येथील सदाविजय फ्लावर मार्टचे सुभाष भोसले यांनी साकारली.



सोहळ्यामुळे तेर नगरीत सर्वत्र भक्तिमय व उत्सवी वातावरण अनुभवायला मिळत आहे.

## आळणी शाळेची 'हायटेक' भरारी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आळणी येथे महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतून अत्याधुनिक 'प्री-फॅब' वातानुकूलित क्लासरूम उभारण्यात आले असून, त्याचे लोकार्पण जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेत स्मार्ट बोर्ड, डिजिटल प्रोजेक्टर, ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा लाभ मिळत आहे. तसेच 'इनोव्हेशन सेंटर', डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सायन्स अँड इनोव्हेटिव्ह सेंटर, ॲस्ट्रॉनॉमी लॅब आणि कॉम्प्युटर सेंटरचेही उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, सय्यद असरार, मुख्याध्यापक बशीर तांबोळी, दत्तप्रसाद जंगम, प्रकाश पारवे, चौरे, उषा सर्जे, प्रमोद वीर, संतोष चौगुले, कृष्णा गाडे, संजीवनी पौळ, अफसाना शेख आदि उपस्थित होते.

## कळंब पं.स. क्वार्टर ओस पडले; अधिकारी अपडाऊनमुळे नागरिक त्रस्त






**परवेज मुल्ला**
**कळंब, दि.१३ एप्रिल -**
जवळपास ९२ गावांचा कारभार पाहणाऱ्या कळंब पंचायत समितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची सोय नसल्याने प्रशासनाचा कारभार विस्कळीत होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. निवासस्थानांच्या अभावामुळे काही अधिकारी अपडाऊन करतात, तर काही भाड्याच्या घरात राहत असल्याने कार्यालयीन वेळेत अधिकारी उपलब्ध नसतात. याचा फटका थेट ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना बसत आहे.

२००९ पूर्वी पंचायत समिती अंतर्गत सभापती, गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थानांची व्यवस्था होती. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही क्वार्टर आता मोडकळीस आली आहेत. काही ठिकाणी घरे पूर्णपणे नष्ट झाली असून काही पडीक अवस्थेत आहेत, तर काही ठिकाणी उकिरडे झाले आहेत. या परिस्थितीमुळे नागरिकांना कामानिमित्त पंचायत समितीत आल्यानंतर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी कुठे भेटतील, याचा शोध घ्यावा लागत आहे. वारंवार चकरा मारूनही कामे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन निवासस्थानांची दुरुस्ती किंवा नव्याने उभारणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बालाजी ब्रह्मोत्सवाची शोभायात्रा व महाप्रसादाने सांगता

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ एप्रिल -**
कळंब येथे बालाजी देवस्थानच्या वतीने आयोजित वार्षिक ब्रह्मोत्सवाची सांगता भव्य शोभायात्रा व महाप्रसादाने उत्साहात करण्यात आली. वेंकटरमणा गोविंदाच्या गजरात पारंपारिक वाद्यांसह शहरातून शोभायात्रा काढण्यात आली.

९ एप्रिलपासून सुरू झालेल्या या ब्रह्मोत्सवात विविध धार्मिक विधी पार पडले. हैदराबाद येथील पुजार्यांच्या उपस्थितीत अभिषेक, होमहवन, यज्ञ आदी विधी तिरुपतीप्रमाणे करण्यात आले.

११ एप्रिल रोजी बालाजी भगवानांची मूर्ती रथावर विराजमान करून शहरातील प्रमुख मार्गांवरून शोभायात्रा काढण्यात आली. मार्गात ठिकठिकाणी रांगोळ्या काढून व पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. युवक, महिला व नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला.



यानंतर मांजरा नदीत चक्री स्नान घालून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या ब्रह्मोत्सवासाठी स्थानिक भक्तांनी विशेष परिश्रम घेतले.

## अंगाची लाहीलाही : वाशी तालुक्यात उन्हाचा कडाका; तापमान ४० अंशांच्या पुढे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ एप्रिल -**
धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात सध्या उन्हाचा तीव्र कडाका जाणवत आहे. दि.१३ एप्रिल रोजी तापमानाने तब्बल ४० अंश सेल्सिअसचा टप्पा पार केल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.



अंगाची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेमुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक झाडांची सावली, तसेच घरातील फॅन, कुलर आणि एसीचा आधार घेत असल्याचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी थंड पेयांच्या दुकानांवरही गर्दी वाढताना दिसत आहे.

दरम्यान, तज्ज्ञांनी नागरिकांना दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे तसेच हलके व सैल कपडे वापरावेत, असा सल्ला दिला आहे.

वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

## कन्हेरवाडीत 'पालकमंत्री चषक २०२६' क्रिकेट स्पर्धेसाठी जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ एप्रिल -**
कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथे आई सटवाई देवी यात्रा व पालकमंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्या वाढदिवसानिमित्त 'पालकमंत्री चषक २०२६' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून तयारी पूर्ण झाली आहे.



ही स्पर्धा १५ ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान देवी सटवाई मंदिर परिसरात होणार आहे. जिल्ह्यातील अनेक संघ या स्पर्धेत सहभागी होत असून परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख अजितदादा पिंगळे, उमरगा नगराध्यक्ष किरण गायकवाड, बाजार समिती सभापती शिवाजी कापसे, पंचायत समिती सभापती राजश्री वरपे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५१ हजार, द्वितीय ३१ हजार, तृतीय २१ हजार व चतुर्थ १५ हजार रुपये ठेवण्यात आले आहेत. शिवसेना (शिंदे गट) कन्हेरवाडी व ग्रामस्थांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## कानेगाव येथे साऊ समितीच्या वतीने महिला मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ एप्रिल -**
तालुक्यातील कानेगाव येथे साऊ एकल महिला पुनर्वसन समितीच्या वतीने शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात समितीचे जिल्हाध्यक्ष तथा मिशन वात्सल्य समितीचे सदस्य विजय जाधव यांनी विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



यावेळी त्यांनी बाल संगोपन योजना, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, श्रावणबाळ योजना तसेच दिव्यांगांसाठी असलेल्या योजनांची माहिती उपस्थित महिलांना दिली. काही एकल महिलांनी सासरच्या मालमत्तेत हिस्सा मिळत नसल्याची समस्या मांडली. यावर समितीच्या वतीने संबंधित महिलांना कायदेशीर वारसा हक्क व फोडपत्र प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच एका दिव्यांग महिलेची पेन्शन DBT प्रक्रियेअंतर्गत बंद झाल्याचे समोर आले. आधार अपडेट करताना बोटांचे ठसे व डोळ्यांचे स्कॅन होत नसल्याने अडचणी येत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन समितीच्या वतीने देण्यात आले.

या मेळाव्याला काशिनाथ पाटील, ज्योती राजपूत, ज्योती माने, लता काळदाते, गौरी पंडित, कानेगावच्या सरपंच पूनम लोभे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, मारुती महाराज मंदिर समितीचे कर्मचारी तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक व महिला उपस्थित होत्या.

## पार्किंगवरून तिघांना मारहाण; बेंबळीत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**
बेंबळी येथे वाहन पार्किंगच्या कारणावरून झालेल्या वादातून तिघांना मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी लहु दाणे व गणेश दाणे (रा. बेंबळी) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

१२ एप्रिल रोजी सायंकाळी फिर्यादी सुधाकर भोजणे यांना वाहन लावण्याच्या कारणावरून आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या त्यांच्या पत्नी व मुलालाही मारहाण करून धमकी देण्यात आली.

या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहे.

## तुळजापूर तालुक्यात प्रत्येक गणात होणार 'जनता दरबार'

नागरिकांच्या समस्या जागेवरच सोडवणार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**
सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील प्रत्येक गणात 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

एप्रिल महिन्यात पंचायत समिती सभापती विक्रमसिंह देशमुख व उपसभापती रोहिणीताई मेलगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १८ 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार आहेत. तुळजापूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व १८ गणांमध्ये हे दरबार भरवले जाणार असून, नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ मिळवून देणे आणि त्यांच्या प्रलंबित अडचणी सोडवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



या 'जनता दरबार'च्या माध्यमातून पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांबाबतच्या तक्रारी तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळ्यांवर तात्काळ कार्यवाही केली जाणार आहे. संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी जागेवरच ऐकून त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतील.




आ. पाटील म्हणाले, नागरिकांना त्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी 'जनता दरबार' ही संकल्पना राबवली जात आहे. प्रत्येक गणात जाऊन लोकांशी थेट संवाद साधला जाईल आणि त्यांच्या अडचणींना प्राधान्याने न्याय दिला जाईल.

या उपक्रमामुळे तुळजापूर तालुक्यातील विकासकामांना गती मिळेल तसेच शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.